आवर्जून वाचावे

मेहता मराठी ग्रंथजगत

ऑगस्ट, २०१८ • पृष्ठे १३२ • किंमत : ₹ १५
• वर्ष अठरावे • अंक आठवा

सुधा मूर्ती यांच्या इन्फोसिस फाउंडेशनतर्फे बंगळुरूमधील इलेक्ट्रॉनिक सिटी कोनप्पन अग्रहारा येथे मेट्रो स्टेशनच्या उभारणीसाठी २०० कोटी रुपये देण्याचे जाहीर करण्यात आले आहे. त्या संदर्भात कर्नाटकचे मुख्यमंत्री एच. डी. कुमारस्वामी यांची सुधाताईंनी भेट घेतली.

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या संपादक योजना यादव यांच्या 'मरी मरी जाय सरीर' या काव्यसंग्रहास आपटे वाचन मंदिर आणि इचलकरंजी साहित्य संमेलन स्मृती ट्रस्ट यांच्यातर्फे नुकताच 'उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार' प्रदान करण्यात आला. ९१व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना योजना यादव.

मेहता मराठी ग्रंथजगत

। ऑगस्ट २०१८ । वर्ष अठरावे । अंक आठवा ।

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४, २४४७५४६२
E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक	: सुनील मेहता
कार्यकारी संपादक	: शंकर सारडा
संपादन साहाय्य	: अंजली पटवर्धन
अंकाची किंमत	: १५ रु.
वर्गणी	: मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.
प्रसिद्धी	: दरमहा ११ तारखेस

अनुक्रमणिका

संपादकीय	४
साहित्यवार्ता	१०
अभिनंदन	२०
पुरस्कार	२१
उपक्रम	२२
पुस्तक परिचय	
तिमिरपंथी	३०
पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब	४४
द ब्रोकर	५६
गार्डिअन	७०
मुघल सत्तेचा सारिपाट	७६
रेड टेप	९०
बेधुंद	१००
रिक्त	११०
अभिप्राय	१२६

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411030. Editor – Sunil Anil Mehta.

संपादकीय

पुस्तकांचं व्यापक विश्व

मानवी मन आणि त्याचं जीवन लेखकांना साद घालत असतं. मानवी जीवनाचं आणि अर्थातच मानवी मनाचं यथार्थ दर्शन घडविणारी पुस्तकं आम्ही वाचकांच्या भेटीला आणली आहेत. तिमिरपंथी, पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब, रिक्त, द ब्रोकर, गार्डिअन, मुघल सत्तेचा सारिपाट, रेड टेप, बेधुंद ही त्यांतील काही पुस्तकं. जीवनाचे आणि माणसाच्या मनाचे कंगोरे टिपणारी, काही ठिकाणी सामाजिक वास्तवाचं दर्शन घडविणारी ही पुस्तकं आहेत.

'तिमिरपंथी' हा ध्रुव भट्ट यांच्या मूळ गुजराती कादंबरीचा सुषमा शाळिग्राम यांनी केलेला अनुवाद आहे. पोटापाण्यासाठी गावोगावी वसती (दंगा) हलवणाऱ्या भटक्या जमातीतील मुख्यत्वे सती आणि तिच्या अनुषंगाने येणाऱ्या व्यक्तिरेखांभोवती ही कादंबरी गुंफली आहे. ध्रुव भट्टांनी या भटक्या जमातीचे तपशील विविध प्रकारे गोळा करून ही कादंबरी सिद्ध केली आहे. या भटक्या जमातीचं जीवन आणि सतीसह यातील अन्य व्यक्तिरेखा मुळातून जाणून घेण्यासाठी ही कादंबरी अवश्य वाचावी अशी आहे. वाचकांना ती एका वेगळ्या विश्वात घेऊन जाते.

'पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब' हे पिंकी विराणी यांनी लिहिलेलं पुस्तक मराठीत अनुवादित केलं आहे रेश्मा कुलकर्णी-पाठारे यांनी. ज्यांना अपत्यप्राप्ती होत नाही, अशा दाम्पत्यांना आयव्हीएफ, सरोगसी, शुक्राणूदान, अंडीदान इ. कृत्रिम उपाय गेल्या काही वर्षांपासून उपलब्ध आहेत; जाहिरातबाजीमुळे आयव्हीएफकडे वळणाऱ्या जोडप्यांची संख्या वाढू लागली आहे; पण प्रत्यक्ष आयव्हीएफचा अवलंब करताना स्त्रीला जो शारीरिक आणि मानसिक त्रास सोसावा लागतो तो, शिवाय आयव्हीएफसह अन्य उपायांचे दुष्परिणाम समाजासमोर आणले जात नाहीत. ते दुष्परिणाम समोर आणण्याचं काम पिंकी

विराणी यांनी त्यांच्या 'पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब' या पुस्तकातून केलं आहे. विराणी यांनी या विषयाची खूप व्यापक आणि सखोल मांडणी केली आहे. अपत्यप्राप्ती या विषयाची विविधांगाने चर्चा करणारं आणि त्यातील दाहक वास्तव अधोरेखित करणारं हे पुस्तकही नक्कीच वाचलं पाहिजे.

'रिक्त' हा कथासंग्रह मोहना प्रभुदेसाई जोगळेकर यांच्या लेखणीतून उतरला आहे. त्यांच्या कथासंग्रहातील कथांतून मानवी मनाच्या सूक्ष्म व्यापारांचं आणि जीवनाचं वास्तव दर्शन घडतं. विविध स्वभावाच्या विविध व्यक्तिरेखा या कथांमधून भेटतात आणि जीवनाचे विविध रंग त्यांच्या माध्यमातून प्रत्ययाला येतात. माणसाची अगतिकता या कथांमधून अधोरेखित होते. वाचनीय असा हा कथासंग्रह आहे.

'द ब्रोकर' ही जॉन ग्रिशॅम लिखित आणि अशोक पाध्ये अनुवादित रहस्यमय कादंबरी आहे. तुरुंगात असलेला राजकीय दलाल बॅकमन याला त्याची शिक्षा संपण्यापूर्वीच तुरुंगातून बाहेर काढलं जातं. त्याला एक नवीन ओळख दिली जाते. कशासाठी? अमेरिकन गुप्तहेर संस्थेची ही एक खेळी असते, बॅकमनचा जीव पणाला लावणारी. बॅकमनला ही खेळी कळते का? तो काय करतो या जाळ्यातून निसटण्यासाठी, याचं उत्कंठावर्धक चित्रण करणारी ही कादंबरी वाचकाला शेवटपर्यंत खिळवून ठेवते.

'गार्डिअन' हा सुधा रिसबूड यांचा विज्ञानकथासंग्रह आहे. विविध विज्ञान संकल्पनांवर आधारित या कथांमधूनही मानवी प्रवृत्तींचं दर्शन घडत राहतं.

'मुघल सत्तेचा सारिपाट' ही ऐतिहासिक कादंबरी आहे. मुघलसम्राट शहाजहान अंथरुणाला खिळलेला असताना दारा, शुजा, औरंगजेब आणि मुराद या त्याच्या मुलांमध्ये रंगलेलं सत्तानाट्य या कादंबरीत रंगवलं आहे श्रीनिवास राव अडिगे यांनी. अनुवाद आहे उदय भिडे यांचा. एका महत्त्वाच्या ऐतिहासिक कालखंडावर प्रकाश टाकणारं हे पुस्तक आहे.

'रेड टेप' ही महेश या एका आयएएस अधिकाऱ्याची संघर्षगाथा आहे. मुंबईतील एक भूखंड हस्तगत करू पाहणाऱ्या राजकारण्यांना महेश शह देऊ पाहतो आणि शह-काटशहाचं राजकारण वेग घेतं. महेशची ही झुंज रंगवली आहे अभिजित कुलकर्णी यांनी.

'बेधुंद' ही कादंबरी कॉलेज जीवनावर आधारलेली आहे. रॅगिंग, व्यसनं, प्रेमप्रकरणं, अश्लील चित्रपट पाहणे, मुलामुलींनी एकमेकांना अश्लील

एसएमएस पाठवणे, मुलांनी दारूच्या पार्ट्या करणे, सेक्सचा अनुभव घेणे, जातीवरून मुलांची भांडणं होणे, त्यांची टपोरी भाषा इ. काळ्या बाजूंचं चित्रण या कादंबरीत केलेलं आहे. अक्षा-सुऱ्यासारख्या भरकटलेल्या मुलांचं विश्व या कादंबरीतून साकारलं आहे अविनाश लोंढे यांनी.

शोषण, उपेक्षा, वैज्ञानिक उपायांचा गल्ला भरण्यासाठी उपयोग करण्याची मानसिकता, सत्तासंघर्ष, सत्तेसाठी एखाद्या माणसाला 'लक्ष्य' करण्याची प्रवृत्ती, रोबोटच्या जगातही मानवात जाग्या असणाऱ्या भावना आणि विकृती, मानवतेला पायी तुडवणारी सत्ता, संपत्ती, मद्य आणि स्त्रीची अभिलाषा, सार्वजनिक मालमत्ता स्वतःच्या घशात घालू पाहणारी भ्रष्ट यंत्रणा, दारू-सेक्ससारख्या बेभान करणाऱ्या गोष्टींच्या आहारी गेल्यामुळे भरकटलेल्या तरुणांचं जीवन इ.बाबींतून माणसाच्या मनाचे पापुद्रे आणि त्याचं आयुष्य उलगडणारी ही पुस्तकं वाचकांच्या हाती सोपवताना आम्हाला आनंद होतो आहे. जीवनाचं इतकं व्यापक दर्शन घडविण्याचं सामर्थ्य पुस्तकांमध्ये असतं.

गुजरातमधील एखाद्या भटक्या जमातीपासून ते अमेरिकेतल्या आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंत, पांढरपेशा माणसाच्या जीवनापासून वैज्ञानिक संकल्पनांपर्यंत, मुघलांच्या सतराव्या शतकातील राजकारणापासून ते एकविसाव्या शतकातील आयव्हीएफ तंत्रज्ञानापर्यंत, तरुणांच्या बहकलेल्या विश्वापासून प्रामाणिक आयएएस अधिकाऱ्याच्या संघर्षापर्यंत, अशा जीवनाच्या संमिश्र, व्यामिश्र स्वरूपाचं दर्शन घडतं या पुस्तकांमधून. उपरोल्लेखित आठही पुस्तकांचा संपादित अंश आम्ही सदर अंकात समाविष्ट केला आहे. तो वाचल्यानंतर ही पुस्तके वाचण्यास वाचक नक्कीच उद्युक्त होतील, असा आम्हाला विश्वास वाटतो.

अर्थातच कथा-कादंबऱ्यांच्या माध्यमातून अशा अनेक व्यक्तिरेखा, त्यांच्या भावभावना, त्यांचं जीवन, त्यांची संस्कृती, लेखकांचे विविध विषयांवरील विचार वाचकांपर्यंत पोचवण्याचा आनंद आम्ही १९७६पासून घेत आहोत. वाचकांचा उदंड प्रतिसाद आम्हाला पुढे चालत राहण्याची प्रेरणा देत असतो. तेव्हा पुस्तकांच्या या विश्वात वाचकांचं सदैव स्वागत आहे.



मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाच्या त्रैवार्षिक आणि पंचवार्षिक वर्गणीत आम्ही १५ ऑगस्ट २०१८ पासून बदल करत आहोत,
याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

आमच्या छापील अंकाच्या वर्गणीतील बदल खालीलप्रमाणे

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये
पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

वाचकांसाठी सुवर्णसंधी!

WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स
अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात
उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी
अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे
कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९
अधिक माहितीसाठी संपर्क
wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook
https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएसी, एमपीएसी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१

Email : mehtabooksellers@gmail.com

amazon

GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि अँन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

eBooks

इथे मिळतील ई-बुक्स...

www.amazon.in

play.google.com

Online पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

साहित्य वार्ता

ग्राहकांना मिळतेय 'साहित्य' भेट

निसर्गरम्य वातावरण, वाऱ्यासवे झुलायला झोका....बाजूलाच तळे, सेंद्रिय शेती आणि सोबतीला पुस्तक भांडार! पुणे-सोलापूर महामार्गावरून प्रवास करीत असताना तुम्ही कुरकुंभजवळ मिसळ खाण्यासाठी थांबलात... मिसळ खाऊन झाल्यावर बिलासह एखादे पुस्तक तुमच्या हाती पडले तर...नवल वाटेल ना! हा केवळ कल्पनाविलास नव्हे, तर एका पुस्तकवेड्याने प्रत्यक्षात आणलेली क्लृप्ती आहे. पोटपूजेबरोबर ग्राहकांना वैचारिक समृद्धीची भेट देता यावी, यासाठी रोहित खर्गे या पुस्तकवेड्या हॉटेलचालकाने ग्राहकांना 'साहित्य' भेट देण्याचा अनोखा उपक्रम अवलंबिला आहे.

रोहित खर्गे हे मूळचे जुन्नर तालुक्यातील पिंपरी पेंढार या गावाचे रहिवासी. अनेक वर्षांपासून ते पिंपरी-चिंचवड येथे स्थायिक झाले आहेत. पुरुषोत्तम सदाफुले यांच्यामुळे खर्गे यांना साहित्याची आवड जडली. या आवडीमुळे त्यांनी अनेक मराठी साहित्य संमेलनांनाही हजेरी लावली आहे. पुणे-सोलापूर रस्त्यावरून अनेकदा प्रवास करताना त्यांना कुरकुंभ येथील निसर्गरम्य वातावरणाची भुरळ पडली. या मार्गावर हॉटेल व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांनी सहा-सात महिने धावपळ केली आणि १ जून रोजी साई सह्याद्री हे हॉटेल सुरू केले. पोटपूजेबरोबरच वाचनाची गोडी जपली जावी, यासाठी पहिल्या दिवसापासूनच त्यांनी ग्राहकांना पुस्तकांची भेट द्यायला सुरुवात केली.

साहित्य संमेलन भरविणार

भविष्यात या निसर्गरम्य स्थळी कविसंमेलन, अभिवाचन, नाटक सादरीकरण असे साहित्य उपक्रम राबविण्यासाठी पुढाकार घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये मित्रांच्या मदतीने छोटेखानी साहित्य

संमेलन भरविण्याचा त्यांचा मानस आहे.

खर्गे म्हणाले, ''आजकाल वाचन कमी झाले आहे, अशी खंत व्यक्त केली जाते. मात्र, यावर आपणच उपाय शोधायला हवेत. त्यानुसार मी पुस्तकभेटीची कल्पना प्रत्यक्षात आणण्याचे ठरविले. मित्रांच्या मदतीने उतमोत्तम पुस्तके हातात पडली. सुरुवातीला केवळ एक-दोन महिने हा उपक्रम चालविण्याचा मानस होता. मात्र, अनेक लेखक, प्रकाशक मित्रांच्या मदतीमुळे वर्षभर पुरेल एवढी साहित्यसंपदा जमा झाली आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेक वाचकांपर्यंत हा उपक्रम पोहोचल्याने या संकल्पनेला आणखी बळकटी दिली आहे.''

('लोकमत'मधून साभार)

✍ संमेलनाध्यक्षपदासाठी निवडणूक न घेण्याचा मसापचा ठराव सन्मानाने बहाल करणार पद

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक न होता आता सन्मानाने निवड केली जाणार आहे. साहित्य महामंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. २०२०मध्ये होणाऱ्या संमेलनापासून हा निर्णय लागू होणार आहे. संमेलनाध्यक्षपदाची निवडणूक न होता सर्वानुमते निवड व्हावी, यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने पुढाकार घेण्यात आला होता.

संमेलनाध्यक्षपदाच्या निवडीचा ठराव मसापच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत ८ एप्रिल रोजी एकमताने मंजूर करण्यात आला होता. याबाबत मराठवाडा साहित्य परिषद, विदर्भ साहित्य संघ आणि मुंबई मराठी साहित्य संघाशीही संपर्क साधण्यात आला होता. महामंडळाच्या बैठकीत दोन तृतीयांश बहुमताने हा ठराव मंजूर झाला. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीपासून अनेक साहित्यिक दूर राहतात. समाजमानस लक्षात घेऊन संमेलनाचे अध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिकाला सन्मानपूर्वक देण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. याबाबतची आग्रही भूमिका मातृसंस्था म्हणून साहित्य परिषदेने घेतली होती. या ठरावाला

सहमती दर्शवण्यासाठी सर्व घटक साहित्य संस्थांशी आणि महामंडळाशी चर्चा करण्यात आली. विदर्भ साहित्य संघानेही यासाठी आग्रही भूमिका लावून धरली होती.

संमेलनाध्यक्षपदासाठी होऊ दे चर्चा!

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक न होता, कर्तृत्ववान साहित्यिकांची सन्मानाने निवड केली जाणार असल्याचा ऐतिहासिक निर्णय महामंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानंतर लगेचच 'पुढील संमेलनाध्यक्ष कोण?'

या चर्चेला सोशल मीडियावर उधाण आले. साहित्य संमेलनाला 'रिकामटेकड्यांचा उद्योग म्हणणाऱ्या नेमाडेंपासून ना.धों. महानोरांपर्यंतच्या साहित्यिकांच्या मांदियाळीला वाचकांकडून, नेटिझन्सकडून पसंती दर्शविली जात आहे.

साहित्य संमेलनाच्या निवडणुकीची खालावलेली पातळी, मतदानपत्रिकांच्या गठ्ठ्यांची पळवापळवी, आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी, विविध पातळ्यांवर रंगणारे राजकारण यामुळे अनेक वर्षांपासून अनेक ज्येष्ठ साहित्यिक संमेलनाध्यक्ष पदापासून दूर राहणे पसंत करीत होते. त्यामुळे संमेलनाध्यक्षपद विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, विजय तेंडुलकर यांसारख्या दिग्गज साहित्यिकांपासून वंचित राहिले. निवडणूक प्रक्रिया बदलावी, अशी मागणी अनेक वर्षांपासून होत होती.

या पार्श्वभूमीवर, साहित्य महामंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत यापुढे संमेलनाध्यक्षाची निवड सन्मानाने बिनविरोध केली जाईल, असा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला.

नेमाडेंनी साहित्य संमेलनाचा उल्लेख 'रिकामटेकड्यांचा उद्योग' असा केला होता. त्यामुळे ते अध्यक्षपदापासून दूर राहतील की आता संमेलनाध्यक्ष हा निवडीने ठरणार असल्याने कदाचित त्यांचे मत बदलू शकते, असा मतप्रवाह पाहायला मिळत आहे. नेमाडेंनी होकार दर्शविल्यास ते आजवरचे सर्वांत वादग्रस्त संमेलनाध्यक्ष ठरतील, असा कयासही वाचकांकडून बांधला जात आहे.

नेमाडेंप्रमाणेच ना.धों. महानोर यांच्या नावाची सोशल मीडियावर जोरदार चर्चा आहे. त्यापाठोपाठ डॉ. गणेश देवी, रंगनाथ पठारे, विठ्ठल वाघ, रामदास फुटाणे, शफाअत खान, प्रेमानंद गज्वी, अशोक नायगावकर, विश्वास पाटील या नावांना वाचकांची पसंती आहे.

बालभारतीचा माहितीपट

शाळेच्या पहिल्या दिवसापासून चिमुरड्यांचे पाठ्यपुस्तकांशी अतूट नाते जुळते. अक्षरओळख करून देणारी पाठ्यपुस्तके हे त्यांच्या आयुष्यातील पहिलेवहिले साहित्य. 'बालभारती'तर्फे उत्तम संस्कारांची शिदोरी देणारी पाठ्यपुस्तके तयार होतात. प्रतिवर्षी राज्यातील लाखाहून अधिक शाळांमधील शिक्षक, कोट्यवधी विद्यार्थी आणि पालक यांच्याशी आपुलकीच्या अतूट धाग्यांनी बालभारती जोडली गेली आहे. बालभारतीचा हा वैभवशाली इतिहास एका माहितीपटाच्या माध्यमातून समोर आला आहे.

बालभारतीच्या या वैभवशाली इतिहासाचे दस्तऐवजीकरण करण्याच्या दृष्टीने माहितीपटाची संकल्पना साकारली गेली. राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या आदेशानंतर तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात आली. समितीत बालभारतीमधील अधिकाऱ्यांसोबतच ज्येष्ठ साहित्यिक महावीर जोंधळे, जाहिराततज्ज्ञ मिलिंद लेले, अभिनेते राहुल सोलापूरकर, फोटोग्राफीतज्ज्ञ आशिष केसकर यांचा समावेश होता.

बालभारतीचे संचालक डॉ. सुनील मगर अध्यक्ष असलेल्या या समितीच्या सदस्य सचिवपदाची जबाबदारी किरण केंद्रे यांनी सांभाळली. हा प्रकल्प सुमारे सहा महिने सुरू होता. जवळपास पन्नास व्यक्तींच्या मुलाखती, जुने संदर्भ आणि साहित्याचा अभ्यास, छायाचित्रांची संकलननिवड, पुस्तकाचे लेखन, अनुवाद, डिझाईन अशा टप्प्यांतून 'बालभारती- इयत्ता पन्नास' ही फिल्म तयार झाली. या माहितीपटाचे दिग्दर्शन भाई डोळे यांनी केले असून, माधव अभ्यंकर, संज्योत हर्डीकर आणि कवी संदीप खरे यांची मुलगी रुमानी खरे यांनी भूमिका केल्या आहेत.

बालभारतीच्या 'किशोर' मासिकाचे संपादक किरण केंद्रे बालभारतीविषयी

आणि या माहितीपटाविषयी बोलताना म्हणाले ''दरवर्षी कोट्यवधी पुस्तकांची छपाई करून त्यांचे वितरण बालभारतीमार्फत केले जाते. पाठ्यपुस्तके हा प्रत्येकाच्याच जिव्हाळ्याचा विषय असतो. आपल्या मनाचा एक कोपरा लहानपणी शिकलेल्या पाठ्यपुस्तकांसाठी कायम राखीव असतो. लहानपणी शिकलेल्या कथा, कविता, चित्रे यांचा एक विलोभनीय ठसा मनावर उमटलेला असतो. पाठ्यपुस्तकांतून भाषेचे, साहित्याचे आणि वाचनाचे संस्कार तर होतातच, शिवाय जीवनाचे, जगण्याचे अनेक संस्कारही याच पाठ्यपुस्तकांतून होत असतात. राज्याच्या शैक्षणिक जडणघडणीत आणि प्रगतीत बालभारतीची भूमिका मोलाची आहे. बालभारतीचा माहितीपट राज्याच्या शैक्षणिक, सामाजिक वाटचालीचा महत्त्वाचा दस्तऐवज ठरणार आहे.''

नाटक रंगणार आता प्रेक्षकांच्या घरी

एखादा मोठा स्क्रीन लावून प्रत्यक्षात थिएटरमध्ये चित्रपट पाहत असल्याचा 'फिल' आज आपण घरबसल्या घेऊ शकतो; पण नाटकाबाबत हे शक्य झाले तर...? जरा गोंधळलात ना? पण हो, नाटकाचासुद्धा जिवंत अनुभव घरबसल्या आपल्याला सहजपणे मिळू शकतो. नाटकांकडे प्रेक्षक फिरकत नाहीत, अशी ओरड नेहमीच केली जाते; पण केवळ टीका करण्यापेक्षा थेट कृतीतून सकारात्मक पाऊल उचलणे गरजेचे आहे, या जाणिवेतून काही रंगकर्मी नाटकच प्रेक्षकांच्या घरी घेऊन जाण्याचा प्रयोग करीत आहेत.

नाटक कंपन्यांना निर्मितीचा खर्च न परवडणे किंवा नाटकाच्या अवाजवी तिकीट दरांमुळे नाटकांकडे प्रेक्षकांनी पाठ फिरवणे या गोष्टींमुळे नाट्यनिर्मितीचे न जुळणारे अर्थकारण हा कळीचा मुद्दा ठरत आहे. काही मोजकी नाटके सोडली तर उर्वरित नाटकांना प्रेक्षकवर्ग मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून २० वर्षांपूर्वीच ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. देवदत्त पाठक यांनी 'गुरुकुल' संस्थेच्या माध्यमातून घरोघरी जाऊन नाटक करण्याचा प्रयोग केला होता. कालांतराने तो बंद झाला; पण आता पुन्हा नव्याने या अभिनव प्रयोगाची ते रुजवात करीत आहेत. काही तरुण रंगकर्मींनीही ही वाट चोखाळली आहे.

नुकतीच साधना मीडिया सेंटरतर्फे 'ओळख' ही दोनपात्री एकांकिका सादर

दुसरी आवृत्ती

अस्मिता

लेखक

सूर्यकांत जाधव



किंमत : ३४०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.

अस्मिता फुरसुंगीकर, भारतीय लष्करातील कर्नलच्या मुलीचे अपहरण झाले. शोध घेण्याची जबाबदारी संजय पाटील या पोलीस अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली.
मालाड नदी, जहागीरदार अहवाल, मुशी कट्यार, मृत्युंजय यज्ञ, घारापुरी बेट, इराडी देवी, अलिबाग किल्ल्यातील तळघर यातील गूढरहस्य, मुंबईपासून अलिबागपर्यंतच्या शोध मोहिमेत संजयची गाठ पडली आहे अघोर पंथातील सिद्ध पुरुष सर्पराज महाराजांशी, त्याला तोंड देण्यासाठी मदत घ्यावी लागली ती अध्यात्म जगातील श्री गुरुमणी यांची आणि सुरू झाला जीवघेणा संघर्ष.
सर्पराज महाराज कोण? श्री गुरुमणी कोण?
आणि या सर्व प्रकरणाची सुरुवात करणारे माणगावकर वकील कोण?
रक्तरंजित थरारक प्रकरणात संजय अस्मिताची सुटका करण्यात यशस्वी होतो का?
रोमहर्षक, नाट्यमय, वेगवान साहित्यकृती.

झाली. ही एकांकिका घरोघरी सादर करण्यासाठी प्रेक्षकांकडून कलाकारांना आमंत्रण मिळत आहे. या संकल्पनेबाबत प्रा. देवदत्त पाठक म्हणाले, ''सुरुवातीला 'जीएं'च्या कथांच्या वाचनाचा कार्यक्रम, मंगेश पाडगावकर यांच्या 'बोलगाणी' आणि 'सलाम' कवितांचा नाट्याविष्कार घरात करायचो. मी जवळपास १५० कुमार नाटके लिहिली. २० वर्षांपूर्वी जी ५० नाटके लिहिली त्यातील दहा नाटकांचे प्रयोग घरोघरी केले. मुलांपर्यंत नाट्यकला पोहोचावी, हा त्यामागचा हेतू होता.

दृष्टीकोन असा आहे, की लोक घरातच नाटक पाहण्याचा आनंद घेतात. त्यामुळे गुरुकुलच्या विद्यार्थ्यांना घेऊन पाच नाट्यप्रयोग बसविले आहेत. मोठ्यांमध्ये जे विषय चर्चिले जातात त्यात देव मानणारे, न मानणारे आणि संभ्रमात असणाऱ्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे असे 'देवा रे देवा' नाटक बसविले आहे. संभ्रमात न राहता देव आणि देवत्वाची व्याख्या करण्यापेक्षा ते माणसात शोधावे, असा संदेश यातून दिला आहे. या नाटकाचे पाच प्रयोग घरोघरी झाले. परगावीदेखील मिरज, सांगली व साताऱ्यात प्रयोग होणार आहेत. सोशल मीडियावर या नाटकांची प्रसिद्धी केल्याने त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

''नाट्यकलेची ही रुजवात आहे. मुलांसमोर नाटक करायचे म्हटले, तर त्यांना ती समजून सांगणे गरजेचे आहे. ही सजीव कला आहे. ती कुठे पाहायला मिळत नाही. अशा अभिनव प्रयोगांमुळे उद्याचा प्रेक्षकवर्ग तयार होऊ शकतो. मध्यंतरी जे लुप्त झाले आहे, ते नव्याने रुजू लागले असल्याची अनुभूती मिळत आहे.''

सौंदर्याची परिभाषा बदलणारे प्रदर्शन

''सौंदर्याच्या ठराविक चौकटीमुळे आपण खऱ्या सौंदर्याच्या आस्वादाला मुकत असतो. स्त्री सौंदर्याच्या बाबतीतही हेच म्हणावे लागेल; मात्र या प्रदर्शनातील छायाचित्रांमधून म्हाताऱ्या, जीर्ण आणि सुरकुत्या पडलेल्या स्त्रियांच्या सौंदर्याचे प्रतिबिंब अनुभवता येते आहे. कारण हे सौंदर्याची परिभाषा बदलणारे प्रदर्शन आहे,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. विद्या

बाळ यांनी व्यक्त केले.

हौशी आणि मुक्त छायाचित्रकार प्रियांका सातपुते यांच्या 'अन्‌टायटल' या छायाचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन डॉ. विद्या बाळ यांच्या हस्ते झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्ष प्रतिमा परदेशी आणि सामाजिक कार्यकर्त्या गीताली वि.म., तसेच कवी अशोक थोरात, चित्रकार श्रीधर अंभोरे आणि संदेश भंडारे आदी मान्यवर उपस्थित होते. ग्रामीण भागातील स्त्रीजीवनाचे दर्शन घडविणारे हे छायाचित्र प्रदर्शन बालगंधर्व कलादालनात आयोजिण्यात आले होते.

निसर्ग वगळता अन्य विविध प्रकारची सुमारे अडीचशे ते तीनशे छायाचित्रे पाहण्याची संधी रसिकांना या प्रदर्शनामुळे मिळाली.

विद्या बाळ म्हणाल्या, की या प्रदर्शनातील छायाचित्रांच्या माध्यमातून जीवनातील विविध रंग, प्रसंग, संस्कृती, दारिद्र्य अशा अनेक गोष्टी वेगळेपणाने मांडल्या आहेत. प्रियांका सातपुते यांना मिळालेला त्यांच्या कुटुंबाचा पाठिंबादेखील तितकाच महत्त्वाचा आहे. गीताली वि.म. आणि प्रियांका सातपुते यांनी देखील मनोगत व्यक्त केले.

प्रतिमा परदेशी म्हणाल्या, की लेखक, कवी किंवा अन्य कोणताही कलाकार आपली कलाकृती पूर्ण करून समाजापुढे ठेवतो, त्यावेळी त्याचा त्या कलेवरचा अधिकार संपतो आणि त्या कलेचे विश्लेषण करण्याचा अधिकार समाजाला मिळतो. त्याच पद्धतीने समाजाने छायाचित्र प्रदर्शनाचे विश्लेषण केले पाहिजे.

छायाचित्र क्षेत्रात निर्माण झालेली व्यावसायिकता बाजूला ठेवून मीचा शोध या छायाचित्रांनी घेतला आहे. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर गावांचा देखील चेहरा बदलला आहे, असे आपल्याला वाटते. मात्र, आपल्या ग्रामीण संस्कृतीचा गावगाडा टिकवून ठेवण्याचा प्रयत्न आजही अनेक जण कसोशीने करत आहेत, असेच या छायाचित्रांमधून स्पष्ट होते.

साहित्य महामंडळाला प्रथमच लाभणार भाषाविषयक धोरण

बदलत्या काळात भाषा, साहित्य आणि संस्कृतीचा समग्र आढावा, मराठीच्या विकसनावर भर, अनुवाद चळवळीला बळकटी देणे अशा विविध

बाबींवर भर देण्याच्या उद्देशाने अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळातर्फे भाषा, साहित्य आणि संस्कृतीविषयक धोरण तयार केले जाणार आहे. १९६१मध्ये झालेल्या स्थापनेपासून प्रथमच महामंडळाला स्वतःचे भाषा, साहित्य व संस्कृतीविषयक धोरण लाभणार आहे. धोरण मसुदा समितीच्या सभेत भाषाविषयक धोरणाचा मसुदा निश्चित करण्यात आला.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या घटनेतील तरतुदींपैकी भाषा, साहित्य आणि संस्कृतीविषयक धोरण ठरवणे, ही महत्त्वाची बाब होती. मात्र, अद्याप अंमलबजावणीचे कार्य हाती घेतले नव्हते. महामंडळाचे कार्यालय विदर्भ साहित्य संघाकडे आल्यानंतर १७ जुलै २०१६ रोजी झालेल्या बैठकीत धोरण मसुदा समिती स्थापन झाली. या समितीच्या आजवर दोन सभा होऊन धोरणाचा मसुदा निश्चित केला. महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी यांच्यासह उपाध्यक्ष सुधाकर भाले, कार्यवाह डॉ. इंद्रजित ओरके, कोशाध्यक्ष डॉ. विलास देशपांडे या पदाधिकाऱ्यांसह महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी व मुंबई मराठी साहित्य संघाच्या अध्यक्ष प्रा. उषा तांबे उपस्थित होत्या.

गेल्या अर्धशतकात बदललेल्या भाषा, साहित्य, संस्कृतीविषयक सद्यःस्थितीचा समग्र आढावा घेणाऱ्या स्टेटस रिपोर्टप्रमाणे श्वेतपत्रिका तयार करण्याचे कार्य करण्यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करणे, भाषा, साहित्याच्या वेगाने बदलत्या रूपाचा संवेदनशीलतेने शोध घेत नव्या संवादमाध्यम, तंत्रज्ञान युगाच्या संदर्भात करून घेण्यासाठी प्रयत्न करणे, मराठी ही आधुनिक ज्ञानविज्ञान, तंत्रज्ञान, नवतंत्रज्ञानाची भाषा व्हावी यासाठी संबंधित संस्था आदी बाबींचा धोरण मसुद्यामध्ये समावेश केला आहे.

भाषा, साहित्य, संस्कृतीविषयक धोरणाचा मसुदा आता सर्व घटक, समाविष्ट आणि संलग्न संस्थांकडे पाठविण्यात येणार आहे. त्यांच्याकडून अधिकच्या सूचना असल्यास त्यांची भर घालून महामंडळाच्या सभेसमोर ठेवण्यात येईल. महामंडळाच्या स्वीकृतीनंतरच त्याचे धोरणात रूपांतर होईल, अशी माहिती महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी यांनी दिली.

❖

दुसरी आवृत्ती

हराळी



लेखक

अनंत भोयर

किंमत : २४०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.

या गावशिवाराचा आवाका खूप मोठा.
कवट्यात मावणार नाही एवढा
त्या गावशिवेत बिखरलेली हराळीची नाना ठिगळं.
या ठिगळात भेटतात
मुरगाळलेली, गांजलेली माणसं
कधी ठणठण कोरडेपण उदासवाणं
तर कधीकाळी सुखावणारा आंजुळभर ओलावा
अशाच हराळीच्या दुर्वांची ही जुडी.
''अनंत भोयर त्यांच्या कथेत बोलक्या तपशिलांचा चांगला उपयोग करतात. प्रसंगांच्या उतरंडीऐवजी बारीक; पण कलात्मक तपशिलांनी ते कथा साकार करतात. ते करताना कृत्रिमतेची कुबडी घेत नाहीत आणि रचनेचा खटाटोपही जाणवत नाही. कथांची जडणघडण सहज होते. जीवनातल्या भडक प्रसंगांपेक्षा माणसांच्या मनातील दुःखाचा वेध घेणं आणि अशा मनाचे पापुद्रे उलगडणं हा त्यांच्या लेखणीचा एक छंद आहे.''

- शंकर पाटील

अभिनंदन

बंगळूरूमधील मेट्रो स्टेशनच्या उभारणीसाठी सुधा मूर्तींनी दिली २०० कोटी रुपयांची मदत

लेखिका म्हणून सुधा मूर्ती जेवढ्या सुपरिचित आहेत, तेवढ्याच त्या समाजसेविका म्हणूनही लोकांना परिचित आहेत. त्यांच्या इन्फोसिस फाउंडेशनच्या माध्यमातून त्या अनेक समाजोपयोगी कामं आणि सामाजिक कामासाठी आर्थिक साहाय्य करत असतात. त्यांच्या या समाजसेवेच्या मार्गावर त्यांनी आणखी एक पाऊल पुढे टाकलं आहे. सुधाताईंच्या इन्फोसिस फाउंडेशनतर्फे बंगळुरूमधील इलेक्ट्रॉनिक सिटी कोनप्पन अग्रहारा येथे मेट्रो स्टेशनच्या उभारणीसाठी २०० कोटी रुपये देण्याचे जाहीर करण्यात आले आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री एच. डी. कुमारस्वामी यांनी याबद्दल इन्फोसिस फाउंडेशनची प्रशंसा केली आहे. केवळ या मेट्रो स्टेशनच्या उभारणीतच इन्फोसिस फाउंडेशनचा सहभाग असेल असं नाही, तर येत्या तीस वर्षांत या स्टेशनच्या देखभालीचं कामही हे फाउंडेशन करणार आहे.

सुधाताईंचे मैसूर येथील एक चाहते आणि वाचक केळकर यांनी या अनुषंगाने सुधाताईंबद्दलच्या भावना मेहता पब्लिशिंग हाऊसला कळविल्या आहेत. ते लिहितात,'त्यांना पाहिले की आपल्या घरातील प्रेमळ आई, मावशी, आत्या, काकूला पाहिल्यासारखे मला वाटते.मला त्यांचा हा स्वभाव त्यांच्या साहित्यामध्ये प्रतिबिंबित होताना दिसतो.'

आपल्या या सामाजिक बांधिलकीचं कुठेही प्रदर्शन न करता सच्चेपणाने, विनम्रतेने समाजसेवा करणाऱ्या सुधाताईंचं मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मेहता बुक सेलर्सतर्फे मन:पूर्वक अभिनंदन!

❖

पुरस्कार



योजना यादव यांच्या 'मरी मरी जाय सरीर' या कवितासंग्रहास आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी यांच्यातर्फे पुरस्कार प्रदान

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या संपादक योजना यादव यांच्या 'मरी मरी जाय सरीर' या काव्यसंग्रहास आपटे वाचन मंदिर आणि साहित्य संमेलन स्मृती ट्रस्ट यांच्यातर्फे नुकताच 'उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

९१व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते हे पुरस्कार वितरण करण्यात आलं. या प्रसंगी आपले विचार व्यक्त करताना देशमुख म्हणाले,''केवळ मनोरंजनासाठी साहित्य ही भूमिका आता कालबाह्य झाली आहे. आता मानवतावादी साहित्याची निर्मिती होत आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व हा जगण्याचा भाग आहे. याचा लेखकांनी आग्रह धरावा. तसेच समाजात विज्ञाननिष्ठा जोपासण्यासाठी कटिबद्ध राहावे.'' स्वागत इचलकरंजी साहित्य संमेलन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. विलास शहा यांनी केले. तर प्रास्ताविक ग्रंथालयाचे अध्यक्ष स्वानंद कुलकर्णी यांनी केले. ❖

स्त्रीमुक्तीचं बाळकडू कोळून प्यालेल्या
समर्थ स्त्रीची कविता

मरी मरी जाय सरीर

योजना यादव

किंमत : १४०/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.

उपक्रम

दिनविशेष

दिसामाजि काहीतरी ते लिहावे।
प्रसंगी अखंडीत वाचीत जावे।।

श्री समर्थ रामदास स्वामी

❊ वाचकांसाठी सुवर्णसंधी ❊
करा मैत्री पुस्तकांशी
'मेहता पब्लिशिंग हाऊस'चा
नवीन उपक्रम
१६ ऑगस्ट २०१८ ते १५ सप्टेंबर २०१८
दरम्यानचा दिनविशेष

आपल्या लाडक्या लेखकांना वा अनुवादकांना शुभेच्छा
या ईमेलवर पाठवा.

authors@mehtapublishinghouse.com

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

१७ ऑगस्ट - अभिनेता सचिन पिळगांवकर यांचा जन्मदिन

सचिन पिळगांवकर लिखित 'हाच माझा मार्ग' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - ५४०/-

१७ ऑगस्ट ते १९ ऑगस्टपर्यंत

सवलत किंमत ३५९/-

१८ ऑगस्ट - कवी गुलज़ार यांचा जन्मदिन

'त्रिवेणी', 'रावीपार', 'गुलजार पटकथा संच', 'धागे' या अनुवादित पुस्तक संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - १८६५/-

१८ ऑगस्ट ते २० ऑगस्टपर्यंत

सवलत किंमत ११४९/-

१८ ऑगस्ट - विलास गीते यांचा जन्मदिन

विलास गीते अनुवादित 'उधाण वारा', 'द्विखंडित' या पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ९५०/-

१८ ऑगस्ट ते २० ऑगस्टपर्यंत

सवलत किंमत ५९९/-

१८ ऑगस्ट - अवंती महाजन यांचा जन्मदिन

'मी कधीही माफी मागणार नाही', 'चिकन सूप फॉर द टीनएज सोल भाग-२ व भाग ३' या अनुवादित पुस्तकांवर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ७१०/-

१८ ऑगस्ट ते २० ऑगस्टपर्यंत

सवलत किंमत ४२९/-

१९ ऑगस्ट - ज्येष्ठ समाजसेविका सुधा मूर्ती यांचा जन्मदिन

सुधा मूर्ती लिखित **१९** अनुवादित पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - २९२०/-

१९ ऑगस्ट ते २२ ऑगस्टपर्यंत

सवलत किंमत १८९९/-

१९ ऑगस्ट - जॅक कॅनफिल्ड यांचा जन्मदिन

चिकन सूप मालिकेतील **४३** अनुवादित पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

संचाची मूळ किंमत - ८५६५/-

१९ ऑगस्ट ते २१ ऑगस्टपर्यंत

सवलत किंमत ५०९९/-

२० ऑगस्ट – नारायण मूर्ती यांचा जन्मदिन

'नारायण मूर्ती : मूल्यं जपणारं एक अद्वितीय आयुष्य, अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - ४२५/-

२० ऑगस्ट ते २२ ऑगस्टपर्यंत

सवलत किंमत २८९/-

२५ ऑगस्ट – तसलिमा नासरिन यांचा जन्मदिन

तसलिमा नासरिन लिखित 'लज्जा, फेरा, निर्बाचित कलाम, नष्ट मेयेर नष्ट गद्य, निर्बाचित कविता, आमार मेयेबेला, उधाण वारा, द्विखंडित, फरासि प्रेमिक' या अनुवादितपुस्तकसंचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - २२००/-

२५ ऑगस्ट ते २७ ऑगस्टपर्यंत

सवलत किंमत १३४९/-

२५ ऑगस्ट – फ्रेडरिक फॉर्सिथ यांचा जन्मदिन

फ्रेडरिक फॉर्सिथ लिखित 'नो कम बॅक्स','द अफगाण', 'द फिस्ट ऑफ गॉड', 'मध्यस्थ', 'द ओडेसा फाइल' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - १८७५/-

२५ ऑगस्ट ते २८ ऑगस्टपर्यंत

सवलत किंमत १४९/-

३१ ऑगस्ट – शिवाजी सावंत यांचा जन्मदिन

शिवाजी सावंत लिखित 'Srikrishna : The Lord of the Universe या इंग्रजी पुस्तकावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - ९९५/-

सवलत किंमत ५४९/-

शिवाजी सावंत लिखित 'मोरावळा, शेलका साज, 'कांचनकण' 'अशी मने असे नमुने' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत - ६२५/-

३१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरपर्यंत

सवलत किंमत ३९९/-

१ सप्टेंबर – अरुंधती चितळे यांचा जन्मदिन

'समुद्राकाठचे एक वर्ष' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - १६०/-

२ सप्टेंबर ते ५ सप्टेंबरपर्यंत

सवलत किंमत ९९/-

२ सप्टेंबर – नसीमा हुरजूक यांचा जन्मदिन

नसीमा हुरजूक लिखित 'चाकाची खुर्ची' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - २५०/-

२ सप्टेंबर ते ५ सप्टेंबरपर्यंत

सवलत किंमत १४९/-

२ सप्टेंबर -शुभदा गोगटे यांचा जन्मदिन

'सांधा बदलताना', 'वसुदेवे नेला कृष्ण', 'अस्मानी', 'घर', 'हृदयविकार निवारण','निरामय यशासाठी ध्यान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

सवलत किंमत ८९९/-

संचाची मूळ किंमत – १४६०/-

८सप्टेंबर ते ९ सप्टेंबरपर्यंत

३ सप्टेंबर -डॉ. जयश्री गोडसे यांचा जन्मदिन

'साधने', 'द मदर डान्स' या अनुवादित पुस्तकांवर विशेष सवलत.

सवलत किंमत ३४९/-

संचाची मूळ किंमत – ५७०/-

३ सप्टेंबर ते ५ सप्टेंबरपर्यंत

५ सप्टेंबर - शिक्षक दिन

'टू सर विथ लव्ह', 'चिकन सूप फॉर द सोल इंडियन टीचर्स' 'स्टोन्स इन्टू स्कूल्स', 'थ्री कप्स ऑफ टी' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

सवलत किंमत ६४९/-

संचाची मूळ किंमत - ११४०/-

५ सप्टेंबर ते ६ सप्टेंबरपर्यंत

८ सप्टेंबर - लीना सोहोनी यांचा जन्मदिन

लीना सोहोनी यांच्या ४० अनुवादित पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

सवलत किंमत ६०५५/-

संचाची मूळ किंमत – १०,४९०/-

८सप्टेंबर ते १० सप्टेंबरपर्यंत

८ सप्टेंबर - जागतिक साक्षरता दिन

'स्टोन्स इन्टू स्कूल्स', 'मी मलाला', थ्री कप ऑफ टी'

या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत – ९९५/-
८सप्टेंबर ते ९ सप्टेंबरपर्यंत

सवलत किंमत ५९९/-

१४ सप्टेंबर - विजया जहागीरदार यांचा जन्मदिन

'कर्मयोगिनी' या मराठी
पुस्तकावर विशेष सवलत.
मूळ किंमत – ३५०/-
१४ सप्टेंबर ते १५ सप्टेंबरपर्यंत

सवलत किंमत १९९/-

'Karmayogini' या संगीता सोमण अनुवादित
इंग्रजी पुस्तकावर विशेष सवलत.
मूळ किंमत – ३५०/-
१४ सप्टेंबर ते १५ सप्टेंबरपर्यंत

सवलत किंमत १९९/-

१४ सप्टेंबर - कांचन घाणेकर यांचा जन्मदिन

कांचन घाणेकर लिखित 'नाथ हा माझा', 'रेशीमगाठी'
या पुस्तकांवर विशेष सवलत.
मूळ किंमत – ४७०/-
१४ सप्टेंबर ते १६ सप्टेंबरपर्यंत

सवलत किंमत २४९/-

१४ सप्टेंबर -दीपक कुळकर्णी यांचा जन्मदिन

'डेथ ऑफ अ कॅड', 'डेथ ऑफ अ गॉसिप', 'डेथ ऑफ अ
परफेक्ट वाइफ', 'डेथ ऑफ ॲन आउटसायडर', 'डेथ ऑफ अ
हसी', 'प्लेइंग इट माय वे','रुल्स ऑफ डिसेप्शन्स',
'स्क्रीम फॉर मी', 'सिक्स मशिन' या
पुस्तकांवर विशेष सवलत.
मूळ किंमत – २८४५/-
१४ सप्टेंबर ते १६ सप्टेंबरपर्यंत

सवलत किंमत १८४९/-

१५ सप्टेंबर - दया पवार यांचा जन्मदिन

सवलत किंमत ३९९/-

'विटाळ', 'चावडी', 'जागल्या','पासंग', 'कोंडवाडा', 'पाणी कुठवर आलं गं बाई' या पुस्तक संचावर विशेष सवलत.

मूळ किंमत – ६७५/-

१५ सप्टेंबर ते १७ सप्टेंबरपर्यंत

१५ सप्टेंबर – जागतिक लोकशाही दिन

सवलत किंमत १०९९/-

'लढा लोकपालचा : उद्रेक आम आदमीचा', 'Be the change - भ्रष्टाचाराशी लढा', इमॅजिनिंग इंडिया','अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड', 'वुई द नेशन','वुई द पिपल्स',

संचाची मूळ किंमत - १९०५/-

१५ सप्टेंबर ते १७ सप्टेंबरपर्यंत

१५ सप्टेंबर –श्याम भुर्के यांचा जन्मदिन

सवलत किंमत ९९९/-

'खुमासदार अत्रे', 'गोष्टींचं एटीएम','पुल : एक आनंदयात्रा', 'पुणं एक साठवण','द माइंड जिम', 'सभेत कसे बोलावे', 'मंत्र श्रीमंतीचा', 'आनंदाचं पासबुक', 'द स्टार प्रिन्सिपल' या पुस्तक **संचाची मूळ किंमत - १६००/-**

१५ सप्टेंबर ते १७ सप्टेंबरपर्यंत

आमचे लेखक-अनुवादक यांचा जन्मदिन वा स्मृतिदिन यानिमित्त तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.

❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖

अधिक माहितीसाठी संपर्क : फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / What's App No. **९४२०५९४६६५**

website : www.mehtapublishinghouse.com

दुसरी आवृत्ती

''मी अनीता राकेश सांगतेय...''

लेखक
अनीता राकेश

अनुवाद
रजनी भागवत



किंमत : २००/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

तुम्ही ज्यांच्यावर बेहद्द प्रेम करता
ते तुमच्यावर रुसून निघून जातात... असं का होतं?
तुम्ही आपल्या जवळपास असलेल्या लोकांकडून
प्रेमाची मागणी करता आणि ते सरळ सळसळणाऱ्या
हवेबरोबर तुमच्या जवळून निघून जातात... असं का होतं?
प्रेमावाचून तुम्ही एक शुष्क, वठलेलं झाड होऊन जाता...
असं का होतं?
तुम्हाला एकटेपणी वेड लागायची पाळी येते... असं का होतं?
प्रेमावाचून तुम्हाला जगणं अशक्य का होतं?
प्रेमावाचून तुम्हाला मरून जावंसं का वाटतं?
लोक तुम्हाला समजून घेऊ शकत नाहीत...
असं का होतं?
असं का होतं...?

पुस्तक परिचय

तिमिरपंथी

आशयघन, गूढरम्य कविता आणि मोजक्याच पण अत्यंत अर्थपूर्ण कादंबऱ्या लिहिणारे ध्रुव भट्ट हे गुजराती साहित्यात थोड्याच वर्षांमध्ये एक महत्त्वाचे, अग्रगण्य लेखक म्हणून प्रसिद्ध झाले. 'समुद्रान्तिके' (मराठी अनुवाद : 'सागरतीरी') ही त्यांची पहिलीच कादंबरी अनेक पुरस्कार मिळवून गेली आणि त्यानंतरच्या 'तत्त्वमसि'ला तर 'साहित्य अकादमी पुरस्कार' मिळाला. त्यानंतर आली आणखी एक वेगळीच कादंबरी 'अतरापी', आणि प्रस्तुत 'अकूपार' ही त्यांची कादंबरी प्रसिद्ध झाली. कदाचित ही त्यांची आत्तापर्यंतची सर्वांत चांगली कादंबरी म्हणता येईल; कारण ती वाचकांना एका वेगळ्या वातावरणातील, मन गुंतवून ठेवणारी कथा तर देतेच; पण त्याचबरोबर पर्यावरण, मनुष्य आणि इतर प्राणी यांच्यामधील संबंध यांविषयी विचार करायला लावते. त्यांचा खास असा एक गूढधागा कथेत मिसळलेला आहे.

ध्रुव भट्टांच्या कादंबऱ्यांचं एक वैशिष्ट्य हे की, त्यांमध्ये कथानायक स्वत:च कथा सांगतो; परंतु त्याचं नाव शेवटपर्यंत समजत नाही आणि दुसरं वैशिष्ट्य हे की, ज्या प्रदेशातील कथा ते सांगतात, तेथे स्वत: जाऊन, राहून, अनुभव घेऊन, मगच लिहितात.

गीर अभयारण्यात माहिती गोळा करायला गेलेले भट्ट पतिपत्नी एक लहानसं घर बांधून काही महिने तेथेच राहिले होते.



लेखक
ध्रुव भट्ट

अनुवाद
सुषमा शाळिग्राम

भटक्या-विमुक्त म्हटल्या जाणाऱ्या जाती-जमातींच्या लोकांना प्रत्यक्ष भेटून लिहिल्या गेलेल्या या कथेचे नायक आपला चिरंजीव ठसा उमटवून जातात. चौर्यकलेचे नियम, त्यातील बंधनं, मर्यादा, गुरूंच्या आणि पूर्वजांच्या आज्ञा इत्यादी गोष्टी वाचकाला एका आगळ्याच भावविश्वात घेऊन जातात, जिथं राहून त्याला नवनवीन सत्यांचा अनुभव येतो.

कायद्यानं ज्यांना जन्मजात गुन्हेगार मानलं, त्या चौसष्टाव्या कलेच्या कलाधरांच्या मनोभूमीवर आणि कर्मभूमीवर प्रकाश टाकणारी, तसेच पूर्वापार चालत आलेला आपल्यावरचा शिक्का पुसून टाकण्यासाठी धडपडणाऱ्या तरुणांच्या प्रयत्नांची ही कथा वाचताना वाचक त्या शर्विलकी विद्येच्या जाणकार महानायकांकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहू लागतो. प्रत्येक वेळी एक वेगळा, नावीन्यपूर्ण विषय घेऊन येणारे ध्रुव भट्ट यांची ही अनोखी कथा, एका अनोख्या जगाची कहाणी घेऊन आली आहे.

लहानगी सती सकाळी उठून पाहते तो 'मा' हजार कामांत गुंतलेली. इतक्यात पाहिलं तर कुठून तरी पाणी घेऊन आली. आता चूल पेटवेल. मग हे... ते... दुपार होईतो असंच चालेल. कार्तिकातल्या या सकाळच्या सुंदर, गुलाबी थंडीत अवघ्या 'दंग्या'त पसरणाऱ्या धुराच्या वासानं आणि भाकरी भाजल्याच्या खमंग दरवळानं मन तृप्त होईल.

खाटेवरून उतरून सती 'मा'च्या कुशीत शिरली. खाटेखालून टिनाचा डबा ओढत 'मा'नं किंचित कंटाळवाण्या स्वरात म्हटलं, ''आली लगेच चिकटायला.''

सती काही बोलली नाही. जरा सरकून बसली. तेवढ्यात रघू जागा झाला. सती बापाला पाणी द्यायला उठली तोच 'मा'नं म्हटलं, ''कणसं आणावीच लागतील.''

''आज रातच्याला नाहीतर उद्या.'' रघू नायक झोपाळू आवाजात म्हणाला.

'मा' करवादत पुटपुटली ते शेजारी बसलेल्या सतीला स्पष्टपणे ऐकू गेलं. ''जे पाहावं ते उद्या! इथं डबडी रिकामी झालीत सगळी. कसं रेटतेय ते माझं मलाच ठाऊक!''

तापीचे शब्द रघूच्या कानांपर्यंत पोहोचले नसले तरी तिची नाराजी त्याला कळली होती. त्या शब्दांमागची वेदना त्याला जाणवली नसती तर सकाळी सकाळी कटकट सुरू केल्याबद्दल त्यानं तापीला चांगलंच फैलावर घेतलं असतं. आत्ता मात्र त्यानं हळुवारपणे म्हटलं, ''धोळे ट्यारधे नाहळी जेहर ने की न्हौ देप्पोडी. अब टोही भोगव. (दिवसाढवळ्या कुठे न जायची शपथ तूच घातलीस ना? भोग आता!)

'भान्तु'ऐवजी 'नारसी' बोलीत रघू हे बोलला. नारसी बोलीतला त्याचा हेल आणि 'ट'चे उच्चार ऐकून तापीला हसू फुटलं.

सतीला 'मा'चं हसणं फार मोहक वाटलं. ती पुन्हा 'मा'ला बिलगली. जणू तिला म्हणायचं होतं, 'मा गं, सगळ्या 'दंग्या'तच काय, जेवढी दुनिया मी पाहिलीये त्या समस्त दुनियेत कोणी तुझ्याइतकं छान हसत नाही.'

सती 'मा'कडे एकटक बघत राहिली. 'मा'च्या चेहऱ्यावरचं हास्य एकाएकी मावळलं. निर्विकार चेहऱ्यानं तिनं डब्यातून पीठ काढलं. परातीत मळायला घेतलं. जोरजोरात मळू लागली. सगळा राग पिठावर काढल्यागत तिनं भाकरी थापली अन् धप्पकन खापरावर टाकली. धक्क्यानं खापर फुटता फुटता राहिलं.

तापीला काय झालंय ते सरस्वती आणि रघू दोघांना माहीत होतं. जेव्हा जेव्हा हा उल्लेख होतो तेव्हा तेव्हा तापीचा संयम सुटतो. तिचं मन तिच्या ताब्यात राहत

* चरोतर – गुजरातेतील खेडा जिल्ह्यातील प्रदेश.

नाही; मग मनात उसळलेल्या अपराधीपणाला, नि:शब्द बेचैनीला ती अशा निष्फळपणे वाट करून देते. घडली तेव्हा ती घटना केवळ दुर्दैवी वाटली होती. त्यामागचं खरं कारण कळलं त्या वेळी तापी दोन दिवस मुकाट बसून राहिली होती. ना रडली, ना बोलली. ना तिनं काही काम केलं. आकाशाकडे बघत नुसती बसून राहिली. बारा वर्षांच्या, हाताशी आलेल्या मुलाचं विनाकारणच अशा रीतीनं निघून जाणं कोणत्या 'मा'ला सहन होईल?

चरोतर* भागातल्या गावाच्या कडेला 'पेडा' पडला होता. त्याच दिवशी संध्याकाळी गावात कुणाचंसं लग्न होतं. दुरून ऐकू येणारी वाजंत्री, सांजवेळचं आकाश उजळवणारी आतशबाजी... सगळं बघायला म्हणून पोरगा गावाकडे केव्हा गेला ते मा-बापाला कळलंच नाही.

रघू नायकाच्या पोरात एक 'हट्टचौरक' (बाजारात अथवा जत्रेत चोरी करणारा) होण्याची सगळी लक्षणं आहेत, हे जरी खरं असलं तरी आत्ता तो तसल्या कामगिरीवर गेला नाहीये. काहीतरी गंमत बघायला गेला आहे एवढंच!

लग्नाच्या जागी दरवाजावर रखवालदार असल्यामुळे जास्त जवळ जाऊन बघणं शक्य नव्हतं. पोरगा दरवाजासमोर जरा अंतरावर उभा राहिला. आत लग्नाच्या वऱ्हाडातल्या माणसांची लगबग चालली होती. नजरेत भरणारा त्यांचा भपकेबाज थाटमाट पोरगा डोळे भरून पाहून घेत होता. रखवालदार जरासा दृष्टीआड झाला तसं, आत आणखी काय चाललंय ते जवळ जाऊन बघायचा मोह पोराला अनावर झाला. नेमक्या त्याच वेळी वऱ्हाडातल्या लोकांत कुजबुज सुरू झाली होती, 'नवरीच्या दागिन्यांची पेटी दिसत नाहीये कुठे!'

दुसरंतिसरं काही नाही अन् नेमकी नवरीचीच पेटी गायब? अरे देवा! नवरीला द्यायचे कपडेलत्ते, दागदागिने सगळंच त्या पेटीत होतं की हो!

वरातीच्या वेळी तेच तर नेसवायचं होतं नवरीला. वऱ्हाडी अगदी बावचळून गेले. लगेच आरडाओरडा सुरू झाला. नवरीच्या पेटीवर कोणीतरी डल्ला मारलाय... पळवली गंऽऽ बाई नवरीची पेटी... मुलीकडच्याच कोण्या मेल्याचं काम असणार म्हणते मी... अरे ए, तिकडे बघ नीट... अजून इथेच असेल कुठेतरी भामटा... फार तर रस्त्यापर्यंत गेला असेल... अरे हो रे हो... पळत असेल रस्त्यावर... दूर नसेल गेला अजून... जा पळा जा मागे... हा निघालोच...

एकाएकी गोंधळ माजलेला पाहून पोरगं सावध झालं. आपण दारातच सापडलो तर विनाकारण गोत्यात येऊ हे त्याच्या लक्षात आलं. अशा वेळी

पकडल्या गेलेल्यांची काय दशा होते, याचा अनुभव पोराला अजून आलेला नसला तरी 'दंग्या'त त्यानं असल्या खूप कहाण्या ऐकल्या आहेत. पोलिसात दिला तर वाचला म्हणायचा, नाही तर काय होईल ते न सांगितलेलंच बरं!

पूर्वजांची आणि गुरुजनांची पक्की शिकवण हीच की, अशा वेळी जीव मुठीत घेऊन पळावं. शास्त्रातसुद्धा हेच सांगितलंय की, 'त्रप'ने (स्वत:च्या निष्काळजीपणामुळे अचानक अडचणीत सापडलेला चोर) कुठेही थांबायचं नसतं. पोरानं जीव मुठीत घेऊन आपल्या 'दंग्या'च्या दिशेनं धूम ठोकली.

'तोच तो... पळतोय बघा. अरे चालला, धरा कोणी तरी' असं ओरडत बरेचसे वऱ्हाडी आणि त्यांच्या पाठोपाठ गावातले काही शूरवीर, जो तो धावतोय पोरामागे. पळत्या आडोडियाच्या पायाच्या गतीला मागे टाकणारा अन्य कुळातला माणूस अजून जन्माला यायचा आहे, हे त्या पोराचा पाठलाग करणाऱ्यांच्या फार लवकर ध्यानात आलं. त्याच्यामागे धावून त्याला पकडणं शक्य नाही. एकदा का दृष्टीआड झाला की, हातचा गेलाच समजा. म्हणून आता दगड-धोंडा जे हाती लागेल ते फेका त्याच्यावर आणि पाडा त्याला खाली. नाहीतर गेलाच समजा. देव भलं करो त्या समोरून येणाऱ्या गावकऱ्याचं, त्यानं नेम धरून सण्णकन काठी फेकली म्हणून बरं, नाहीतर ते भामटं पोरगं अंधारात कुठंतरी रानावनात नाहीसं झालं असतं. काठी सण्णकन पायावर बसली तसा पोरगा कोलांटी खात रस्त्यावर पडला. तो उठून, तोंड उघडून लोकांना काही सांगणार, समजावणार त्याआधीच ते संपूर्ण टोळकं त्याच्यावर तुटून पडलं.

त्यानंतर जे झालं त्याचं वर्णन करण्यासाठी ज्ञानी पुरुषांनी 'अमानुष' हा शब्द लिहून ठेवला आहे. खरंतर त्यांनी 'अपिशाची' हा शब्द योजायला हवा होता, कारण ज्यांनी ते घडताना बघितलं त्या सगळ्यांना जन्मजन्मांतरातही पिशाचसुद्धा असं करणार नाही हे पक्कं ठाऊक आहे. पिशाच काय, ना कोणी पशू, ना राक्षस, ना इतर योनीतले कोणी!

समग्र ब्रह्मांडात मनुच्या वंशजांखेरीज असलं आचरण कोणीच करत नसावं. मागचापुढचा विचार न करता विनाकारण, नि:शंकपणे... कोणी म्हणेल, मनुष्य म्हणवणारे स्वत: जी अनेकदा करून चुकलेत अशा कृत्यांना अमानुष कसं काय म्हणू शकतात?

एखादं ढोरसुद्धा सहन करू शकणार नाही असला मार खात असलेला तो पोरगा किंचाळून किंचाळून काहीतरी सांगू पाहत होता. कोणीही काहीही ऐकायला

तयार नव्हतं. त्या पोराचा आक्रोश आणि मारणाऱ्या जमावाच्या शिव्यांचा भडिमार या गदारोळात काही स्पष्ट ऐकू येत नव्हतं. सगळ्या गोंधळात नवरीच्या पेटीची बाब इतकी गौण ठरली होती की, पोराच्या हातात किंवा जवळपास कोठेच पेटी का दिसत नाही हेही कोणाला सुचलं नाही.

शब्द थंडावत होते. पोरग्याच्या तोंडातून फक्त स्वर आणि त्यानंतर दुसरं भलतंच काही बाहेर पडू लागलं, तेव्हा कोणाला तरी पवित्र विचार सुचला. ''जाऊ द्या रे, लग्नाच्या मांडवात पोरगं मेलंबिलं तर उगाच शुभकार्याला अपशकून व्हायचा.''

असं शुभशकुनाचं स्मरण काही करून दिलं नसतं तर कदाचित त्या पोराचं आयुष्य तिथल्या तिथंच संपलं असतं. माणसं पांगू लागली तेवढ्यात त्यांच्यातल्याच एका मानकऱ्याला एक जण बोलवायला आला. ''अहो, लवकर चला. तिकडे फोन आलाय तुमच्या घरून.''

फोनसुद्धा दुसऱ्यांदा-तिसऱ्यांदा आला होता. सुरुवातीला फोनची घंटी कोणी ऐकलीच नव्हती. सगळं टोळकं त्या वडीलधाऱ्या मानकऱ्यापाठोपाठ गेलं. फोन कानाशी धरतात तोच पलीकडून आवाज आला, ''कमाल आहे रे बाबा तुमची. नवरीची पेटी घरीच विसरून गेलात लग्नाला? नवरीचे कपडे-दागिन्यांची पेटी पडलीये इथंच. आता असं करा, मुहूर्ताला करा काहीतरी. वरातीचं नंतर बघू. सोयीचं काय ते बघायचं आणि वेळ निभवायची, दुसरं काय?''

सगळे सुन्न झाले. एक विचित्र शांतता सगळीकडे पसरली. कोणी शरमले. काही थोडे पस्तावले. बाकीच्यांना बाहेर रस्त्यावर पडलेल्या पोरामुळे उभ्या ठाकलेल्या संकटाची जाणीव झाली. त्या बाबतीतही आता सोयीचं काय ते बघायची वेळ आली होती. वधूपक्षानं धीर दिला. 'बघू, करू काहीतरी. तुम्ही नका काळजी करू. होईल, जमेल. गावात खूप एकजूट आहे. आपल्या गावात आलेल्या वऱ्हाडापर्यंत पोलीस पोहोचणार नाहीत हे बघायचं काम आमचं. इथे तसलं काही होणार नाही, मामला इथल्या इथंच दबला म्हणून समजा. निश्चिंत व्हा. तुमच्याकडच्यांना तुम्ही सांभाळा. आमच्यातलं कोणी अवाक्षर काढणार नाही.'

ऐन मांडवात, नाक वर करून मिरवणाऱ्या वऱ्हाड्यांना अगदी दीन झालेले बघायची संधी भाग्यवान लग्नघरालाच मिळते. अशा वेळी जे म्हणून बोलता येईल ते बोलून टाकायलाच हवं. संधीचा लाभ घ्यायला नको? कोणीसं म्हटलंच, ''काय बुवा हे? असं करतात का? विचारणं नाही, पुसणं नाही अन् अगदी हे असं? जाऊ

द्या. झालं ते झालं. विसरा आता.''

नवरदेवाचा बाप खाली मान घालून बसून राहिला.

बरंतर बरं, तिकडे बेशुद्ध पडलेला तो जीव या गावचा नाही. नशीबच म्हणायचं. वेशीपलीकडे दूर त्या तिकडे दुपारीच पालं पडलीत. त्यांच्यातलाच असेल कदाचित. पण तिथे जाऊन सांगावं तर पंचाईत. अशा अवस्थेत त्याला 'दंग्या'तल्या लोकांच्या हाती सोपवायला नेणं म्हणजे उभ्या गावाला यमाच्या दारी नेणं!

आडोडियांच्या गोफणी सुटल्या तर नवरदेवासकट सगळ्यांचा कपाळमोक्ष ठरलेला. त्यामुळे, पोराला दवाखान्यात नेऊन टाकावं आणि मुकाट्यानं परत यावं यातच शहाणपणा आहे. पुढचं पुढे. इकडे 'पेड्या'तली पुरुषमाणसं रात्रभर पोराला शोधत होती. पोरगा दवाखान्यात असल्याची खबर दुसऱ्या दिवशी दुपारी मिळाली. दोन दिवस तापी छोट्या सरस्वतीला मांडीवर घेऊन रडत बसून राहिली. नेमकं काय घडलं ते डॉक्टरांना, नर्सला कोणालाच ठाऊक नाही. रस्त्यानं जाणाऱ्या वाहनानं उडवलं असावं किंवा कुठेतरी झाडावरून पडलाबिडला असावा. बरं झालं कुणा भल्या माणसाच्या हृदयात देव जागा झाला अन् तो परोपकारी माणूस त्याला इथे घेऊन आला. एरवी रस्त्यावर पडल्या पडल्या मरून गेला असता बिचारा. पोराला शुद्ध यावी म्हणून प्रयत्न करताहेत, औषधपाणी देताहेत.

त्या कोण्या तिऱ्हाइताला तापी दुवा देत राहिली.

तापीला नशीबवान म्हणावं की पोराला ते सांगता येणार नाही, पण तिसऱ्या दिवशी माय-लेक दवाखान्याच्या जंजाळातून मोकळे झाले. गावातल्या दयाळू लोकांनी दवाखान्याचं बिल परस्पर भागवलं. खत्री हवालदार भला निघाला. त्याच्या सांगण्यावरून पोलिसांनी फारसा त्रास न देता पोर हवाली केलं. ढळत्या सांजेला पोराला शेवटचा निरोप दिला न् सकाळी पालं उठली. शेळ्या-बकऱ्या, गाढवं-कुत्री आणि माणसं... एकमेकांच्या सोबतीनं सगळा तांडा वेस मोकळी करून दुसरीकडे मुक्काम शोधायला निघून गेला.

तेव्हा सती होती दीडेक वर्षाची. आईच्या मांडीवर बसून तिला रडतागागताना बघत राहायची. काय चाललंय ते तिला कळतच नव्हतं.

एखाद्या घटनेची गुप्तता जेवढी अधिक तेवढीच ती पाळली जाण्याची शक्यता कमी आणि पसरायची गती जास्त असं कुठल्या तरी शास्त्रात नोंदलेलंच असावं. असा नियम असला तरी त्या घटनेबद्दल गाव बराच काळ गप्प राहील. अर्थात,

दुसरी आवृत्ती

अखेरचा प्रयोग

लेखक

डॉ. बाळ फोंडके



किंमत : २५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.

माणसाचं भावविश्व ही मोठी अजब चीज आहे. काळाच्या ओघात माणसाचं बाह्यरूप कितीही बदललं असलं, तरी त्याच्या भावविश्वावरचा काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या षड्रिपूंचा पगडा तसाच कायम आहे. त्यामुळं कोणत्याही परिस्थितीतील त्याच्या प्रतिक्रियेचा उगमाचा शोध घेतल्यास तो या षड्रिपूंपाशीच येऊन थबकतो. आज प्रस्थापित झालेल्या, तसेच भविष्यात येऊ घातलेल्या विज्ञानाच्या नवनूतन आविष्कारांच्या प्रभावाखाली माणसाच्या भावविश्वात आजवर कधीही न अनुभवलेल्या आगळ्यावेगळ्या वादळांचा संचार होऊ शकतो. पण त्यांना तोंड देताना होणारी माणसाची वागणूक मात्र फारशी अनोखी असणार नाही. असूच शकणार नाही. कारण उत्क्रांतीच्या ओघात माणूस शरीरानं कितीही बदलला असला, विचारांशी संबंधित असलेलं त्याचं बौद्धिक सामर्थ्य कितीही विकसित झालेलं असलं, तरी विकारांशी नातं सांगणारं त्याचं मानसविश्व मात्र होतं तसंच आहे.

विज्ञानप्रसाराचा सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार, तसंच इंदिरा गांधी विज्ञान पुरस्कार यांचा सन्मान लाभलेले आजचे आघाडीचे विज्ञानकथाकार डॉ. बाळ फोंडके यांच्या मनोहारी विज्ञानकथांवर त्यांच्या या भूमिकेची छाप पडलेली नेहमीच आढळते.

तापीनं आपल्या पोराला पार विसरून जावं इतका काळ गुप्तता राहणं कठीणच. नियतीचा खेळ असं मानून बिचारी समजावायचा प्रयत्न करत होती. अशातच कुठूनशी अफवा पसरली. गावात गुप्तपणे होणारं बोलणं दुसऱ्या गावापर्यंत पोहोचलं. कर्णोपकर्णी 'दंग्या'पर्यंत आलं. पोराला ना वाहनानं उडवलं होतं, ना तो झाडावरून पडला होता. अफवाच ती. पुरावा कुठून असणार? पण पुष्कळ चौकशी केली, खात्रीपूर्वक सगळं जाणून घेतलं, मगच तापीला सांगितलं.

हतबुद्ध झालेली तापी रडली नाही. अनोळखी लोकांच्या नावानं बोटं मोडत नव्हती की शिव्या देऊ शकत नव्हती. बोलू लागली तेव्हा एवढंच म्हणाली, ''यापुढे 'दंग्यात' राहायचं नाही. सरकारनं आपल्यासाठी खास विभाग ठेवलाय. असू दे गलिच्छ घाणेरडा. नसू दे इतर ठिकाणसारखे रस्ते न् गल्ल्या. सरकारच्या सतत नजरेखाली असला तरी हरकत नाही, तरीही तिथेच राहू. पोलीस स्टेशनावर हजेरी लावावी लागेल एवढंच ना?

''नाहीतरी मला पोराला शिकवायचं होतं. दिवस-रात्र छळत असतात पोलीस. पोराला शिकवून वकील केलं असतं म्हणजे पोलिसांनाही कळलं असतं चांगलं. पोरगा नसला तर नसू दे. आता माझ्या सतीला शिकवीन. होऊन होऊन काय होईल? जातवाले शिव्या घालतील. खुशाल घालू देत. तेंद्री नाही का शिकली? मीही सतीला शिकवणार.

''हे कामदेखील सोडून द्यायचंय. शहरात गेल्यावर जे जमेल ते करू. काही नाही तर शेवटी दारू गाळू.'' दारू बनवण्यात आडोडियांच्या बायकांचा कोणी हात धरू शकत नाही. त्यातही तापीसारखं इतर कोणालाच जमत नाही.

रघूनं, 'दंग्या'तल्या इतरांनी, फार काय शहरातून आलेल्या पाहुण्यांनी तापीला खूप समजावलं. ''आयुष्याची दोरी तुटली होती पोराची म्हणून गेला तो. या नाही तर दुसऱ्या कोणत्या कारणानं मेला असता.

''यापेक्षाही वाईट गोष्टी घडल्यात एकेक. तुझी ती मैत्रीण गोदावरी, तिच्या दोघी मावश्या नाही का अर्ध्या संसारातून गेल्या? सिंधहून कच्छमध्ये उतरत होत्या न् वाटेत पाणीच संपलं. गोदीची 'मा' वाचली कशीबशी, पण दुसऱ्या दोघी पाण्यावाचून तडफडत तडफडत सगळ्यांच्या डोळ्यांदेखत मेल्या. अख्ख्या 'पेड्या'तली एकजात सगळी माणसं झटली, पण ओंजळभर पाणी काही कोणाला सापडलं नाही. दोघींना तिथंच रणात गाडून यावं लागलं. नशिबात तसंच लिहिलं असेल तर कोण काय करणार?

‘‘हल्ली मिलिटरीवाले कोणाला तिकडे जाऊ देत नाहीत. एरवी त्या वाटेनं जात राहिलो असतो. रण काय, रानंवनं काय, सोडून देतात का कोणी?

‘‘जिवंत असलेल्यांना मरण पावलेल्यांबद्दल असाच विचार करावा लागतो. असंच मानून चालावं लागतं. हजारो वर्षांपासून असंच चाललंय.’’

अनेक तऱ्हेनं समजूत घालून झाली तरी तापी शहरात जायचा आपला हेका सोडत नव्हती. गेली आठ वर्षं एकच धोशा लावलाय. चार पैसे गाठीला जमू देत, मग शहरात जाऊन घर म्हणा, खोली म्हणा, मिळेल ते घेऊन तिथेच राहायचं. ‘दंगा’ सोडून द्यायचा. शहर बरं की ‘दंगा’ बरा... वादच नको.

त्या दिवसापासून रघूकडून वचन घेतलंय... दिवसाउजेडी कुठेही निघणार नाही. रात्रीच्या काळोखातच काम करेन. रात्री एखाददुसऱ्याला, समजा, अगदी पाच-सहा जणांना जरी जाग आली तरी त्यांच्याशी दोन हात करणं शक्य आहे. बोलून, सांगून वेळ मारून नेणं शक्य आहे. दिवसा मात्र बघता बघता हीऽऽ गर्दी जमते. मुलगा गमावला तसा नवरा गमावायला तापी तयार नव्हती.

भाऊ गेला ते सतीनं पाहिलं होतं. त्या वेळी तिला कळत नव्हतं, आता कळतंय. ‘दंग्या’त अनेकदा उल्लेख झालाय. विनाकारण धोका पत्करणाऱ्याला अडवताना तापीच्या पोराचं उदाहरण नेहमी दिलं जातं.

म्हणून तर ‘मा’नं अशा तऱ्हेनं राग काढावा ते सतीला आवडत नाही. अशा वेळी ती खेळायला निघून जाते अथवा कुठलं तरी काम घेऊन बसते. ‘मा’नं भाजलेल्या भाकरीचा चतकोरभर तुकडा घेऊन सती निघून गेली.

सकाळी सकाळी खेळायला कोणी सापडलं नाही. प्रत्येक जण आपापल्या कामात गुंतला होता. कोणी अजून निजलेलेच होते. धाटं, काड्या असं काहीबाही घेऊन सती खेळणी बनवू लागली. तिनं कधी कुठे शाळा बघितली कोणास ठाऊक, पण पाहावं तेव्हा ती मास्तरीण बनून जमेल तसं आपल्या खेळण्यांना शिकवत असते.

खेळात दंग असलेल्या सतीला जसली म्हणाली, ‘‘तुझ्या ‘मा’ला म्हणावं दुपारी न्हायला जायचंय. बायामाणसांनी न्हाण्याजोगी जागा खूप दिवसांनी सापडलीये. तिकडे विहिरीपाशी एक डोणी आहे. अशी तशी नाही, नळवाली!’’

सतीनं धावत जाऊन ‘मा’ला खबर दिली. बाकी साऱ्याही जमल्या. निवांतपणे न्हाणीधुणी करता येतील अशा जागेचा फारा दिवसांनंतर माग लागलाय. पाणी भरायला गेली होती, तेव्हाच जसलीनं विहिरीच्या मालकाला विचारून ठेवलंय.

''मी रिठेसुद्धा भिजवलेत,'' कावी म्हणाली, ''एकमेकींचे केस धुऊ नीट अन् कपडेसुद्धा धुऊन टाकू तिथेच. पोरीबाळींच्या अंघोळी उरकून घेऊ आधी, मग आपली पाळी!''

तेवढ्यात जसली येऊन पोहोचली. म्हणाली, ''ऐका गं, कोयते-विळे सोबत घ्या सगळ्या जणी. तिकडे वावराच्या कडेनं फळझाडं दिसलीत. परतताना थोडी फळंबिळं पाडून आणू.''

जसलीची सूचना सगळ्यांना आवडली. फारा दिवसांनी फळांची दारू मिळणार होती. पेरू असले तरी हरकत नाही. पेरू तर पेरू. काही नसेल तर बोरांचीसुद्धा दारू बनवता येते. येते की नाही? वैराण प्रदेशात गूळ-नवसागराची प्यावी लागते त्यापेक्षा बरं. आज पिऊया फळाची. दुपारी सगळ्या गेल्या. लहानग्या पोरींच्या अंघोळी उरकत गेल्या तशा त्यांच्या आयांनी त्यांना 'दंग्या'कडे जायला सांगून पाठवून दिलं. सतीला न्हाऊ घालून झाल्यावर 'मा'नं म्हटलं, ''सरळ घरी जा. लांब कुठे जाऊ नकोस, नाहीतर जाशील भटकायला.''

घरी जाता जाता वाटेत सतीला शेतं-वावरं दिसली. जरा पुढे, शेतात बाजरी भराला आलीये. सतीला वाटलं, रात्री बापू तिकडे गेला तर बरं होईल. दुसरा कोणी आधीच जाऊन आला तर शेतकरी सावध होईल. मग दुसरं शेत शोधत बापूला आणखी दूर जावं लागेल. तिथे बाजरी अजून शेतात उभी असेल तर मिळायची. एखाद्याची पेरणी उशिरा झाली असेल किंवा कापणीचं जुळलं नसेल आत्तापर्यंत, अशांचीच बाजरी अजून शेतात आहे. बाकी एव्हाना कापणी मळणी होऊन धान्य कोठारात गेलंही असेल. तयार धान्य कोणी शेतात राहू देत नाहीत. शिवाय, इथं या शेतात बाजरी अद्याप उभी आहे, कारण ती विहीरवाल्या वावरातली नाहीये. जिराईत दिसत्येय. बागायतदारांना रब्बीची पेरणी करायची असते. शरद पौर्णिमेला, फार झालं तर उशिरात उशिरा दिवाळीनंतर जमीन तयार करावीच लागते.

केस मोकळे सोडून मनसोक्त न्हालेली सती तशीच शेताजवळ पोहोचली. कापणीला आलेलं उभं पीक वाऱ्याच्या झुळकीसरशी डोलत होतं. भरलेल्या दाण्यांच्या तयार कणसांचा सुगंधी दरवळ वाऱ्यावरून वाहत येत होता. पेटत्या निखाऱ्यांवर ताजी ताजी कणसं भाजून खाण्याचा मोह तिला आवरेना झाला. सतीनं लक्षपूर्वक चहूकडे बघितलं. सर्वत्र नि:शब्द स्तब्धता व्यापून उरली आहे. पीक आपल्यापेक्षा दुप्पट उंच आहे. आत शिरून थोडीशी कणसं कापायला कितीसा उशीर? अडचण एकच आहे की, असली कामं पोरीबाळींनी करायची नसतात.

बघा की, कोणीही नायक, कुठलीच टोळी कामगिरीवर जाताना बाईला सोबत नेत नाहीत. पोरीच्या जातीचं कामच नव्हे हे!

बाईच्या जातीचं काम काय तर दिवसा जाऊन जागा बघून यायची, नवऱ्याला त्या कामावर पाठवायचं अन् त्यानं जे आणलं ते लपवून ठेवायचं. यापेक्षा विशेष काम बाईमाणसांसाठी ठेवलेलंच नाही.

तशीच माना मुरगाळून कणसं तोडता येतील म्हणा, पण बापू म्हणतो, उभ्या पिकाच्या कधी माना मुरगाळायच्या नसतात. कणसं घ्यायची ती कापून घ्यायची. चांगला धारदार कोयता असता तर मजा आली असती.

तिकडच्या वावरातल्या विहिरीपाशी कोयते ठेवलेत ते आठवताच, थोडी तरी कणसं न्यायचीच असं सतीनं ठरवून टाकलं. धावत जाऊन तिनं एक कोयता हलकेच ओढून घेतला. पुन्हा बाजरीवाल्या शेतात गेली. आजूबाजूला कोणी नसल्याची पुन्हा खातरजमा करून घेतली. हातातल्या कोयत्यानंच कुंपणात आत शिरायसाठी वाट करून घेतली आणि सती उभ्या पिकात शिरली. दिवसाढवळ्या शेतातली कणसं कापून नेणं म्हणजे खेळायचं काम नव्हे. शेतमालक कोणत्याही क्षणी येऊ शकतो. तीन-तीन, चार-चार महिने काबाडकष्ट केल्यानंतर पिकलेल्या धान्यावर त्याची लांबूनही नजर असते. वाऱ्यावर डोलणाऱ्या आपल्या शेतातल्या एखाद्या भागात काही वेगळीच हालचाल होत्येय, हे कळायला जातीच्या शेतकऱ्याला वेळ लागत नाही.

शिवाय, आत शिरलेला 'कुसुमाल' (फुलांसारखी लोभस वस्तू चोरणारा) आपला कार्यभाग साधत असतो, तेव्हा त्याच्या शरीराचा स्पर्श घडलेल्या ताटांना त्याचा आधार मिळतो आणि असा आधार लाभलेली ताटं वाऱ्यानं वाकत, डुलत नाहीत. झुकलेल्या बाकीच्या शेतातली एवढीच कणसं नेमकी ताठ उभी दिसतात. म्हणून तर जातिवंत 'कलाकारा'ला शेताच्या प्रत्येक हालचालीशी स्वत:ला जुळवून घ्यावं लागतं. स्वत: काम करत असताना खाली झुकावं लागतं. डुलत्या शेतासरसं स्वत: झुलत राहावं लागतं. वरून उडणाऱ्या कोण्या पाखरांच्या नजरेला पडलं तर ती कलकलाट करून लक्ष वेधतात. टिटवी तरी कमी असते का? 'टि टीडऽ टी विटऽ् टिट्टी विटऽऽ' ओरडत राहते. त्यावर उपाय काही नाही.

या सर्व गोष्टी लक्षात घेणं जमलं तरच तुम्ही दिवसाउजेडी धाड टाकणारे बनू शकता. बाकी बहुतकरून कामगिऱ्या दाट अंधारातच होत असतात. चांदण्याचा उजेडसुद्धा उपयोगाचा नाही. शास्त्र म्हणतं, नवशिक्या कारागिरानं दिवाभीत

(सूर्याला घाबरणारा) असलं पाहिजे.सती आत उभी असल्याचं बाहेरून कळतसुद्धा नाहीये. तिथे वारंदेखील पोहोचू शकत नाही. चहूकडून ओलसर, हिरव्या, उभ्या पिकाच्या मधोमध, धूसर प्रकाशात ती स्वत: वाकतेय, झुकतेय, कणसं नमवत एकेक करत धरतेय. पाखराटिटव्यांनाही संशय येऊ नये अशा रीतीने शेतात आपलं काम उरकत्येय. वाऱ्याच्या गतीला अनुसरत कणसं हलवतेय, कापतेय. अवघ्या शेतात पसरलेल्या निसर्गाच्या लयीत आणि त्या क्षणांच्या कालावकाशात जणू ती विरघळून तदाकार झाली आहे!

जातिवंत कलाकाराला कालक्षणांमध्ये विरघळून गेल्याचा अनुभव केव्हा ना केव्हातरी येतच असतो. असा क्षण सतीनं अनुभवला असला तरी त्याची जाणीव होण्याचं तिचं वय नाही. कोणाची नजर तिच्यापर्यंत पोहोचलीच तर त्या बघणाऱ्यानं दंग होऊन जावं, अशी विलक्षण महान सृष्टी त्या लहानशा पोरीनं भर शेतात उभी केली आहे.मनापासून दाद द्यावी अशी कला केवळ फलकांवर, मैफिलीत, आर्ट गॅलरीत वा पुस्तकांच्या पानांवरच असते असं नाही. कला सर्वव्यापी असते. वाळवंटात, रानावनात, डोंगरदऱ्यांत, जलात वा अंतरिक्षात... ती सर्वत्र असते. कलावंताला वरदान रूपानं जे लाभलेलं असतं, तो या व्याप्त कलेचा अंशमात्र असतो. सफाईदारपणे कोयता चालवत, परकराच्या छोट्याशा घोळात मावतील एवढी कणसं घेऊन सती हळूच बाहेर निसटली. आणखी थोडी कणसं घेता आली असती तर बरं झालं असतं, असं राहून राहून तिला वाटत होतं. 'मा'ला हवी होती तेवढी तरी झाली असती. एकवेळ तेवढी कापलीही असती, पण नेणार कशी? तेवढी सगळी नेता आली नसतीच. त्यामुळे आपल्याच्यानं नेववतील तेवढीच कापलीत. कामगिरी आटोपून सरस्वती बाहेर आली. कुंपणाबाहेर निघून पायवाटेला लागली. हिवाळ्याच्या आगमनाची ललकारी देणाऱ्या मंद, शीतल वायुलहरी निश्चिंतपणे श्वासात भरून घेत चालू लागली, पण पाऊल पुढे पडलं नाही!

❖

दुसरी आवृत्ती

चिरंजीव

लेखक

डॉ. बाळ फोंडके



किंमत : २००/-रु. पोस्टेज : ५०/-रु.

विज्ञानानं कितीही वाटचाल केली, कितीही प्रगती साधली, जीवनशैली कितीही बदलली– तरी मानवी स्वभावावर, त्याच्या गुंतागुंतीच्या स्वरूपावर त्याचा प्रभाव पडणार नाही. विज्ञानाच्या या वाटचालीवरची त्याची प्रतिक्रिया ही मानवी स्वभावाच्या खास वैशिष्ट्यांनुसार, त्यातील गुणदोषांनुसारच होणार आहे. फार तर काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रिपूंच्या बाह्य आविष्काराचं स्वरूप बदलेल; पण त्यांचा मानवी भावजीवनावरचा पगडा कायमच राहणार आहे. विज्ञानकथा ज्या वैज्ञानिक सूत्रांचं बोट धरून वाटचाल करतात, अशी सूत्रं तशी मर्यादितच आहेत. कालप्रवासी, अवकाशप्रवास, परग्रहावरील जीवसृष्टी, अंतराळयुद्ध, यंत्रमानव वगैरे कल्पना शेकडो विज्ञानकथांमध्ये पुनःपुन्हा वापरलेल्या आढळतात आणि तरीही प्रत्येक कथा स्वतंत्र आणि वेगळी, स्वतःचे वैशिष्ट्य असलेली असते. एकाच कल्पनेवर आधारलेल्या कथा वेगवेगळ्या असू शकतात. डॉ. बाळ फोंडके यांच्या या संग्रहातील बहुतांश कथांवर या सर्व दृष्टिकोनाचा प्रभाव आहे.

पुस्तक परिचय

पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब

पिंकी विराणी यांचा जन्म मुंबईमध्ये १९५९ साली झाला. मुंबई, पुणे आणि मसुरी इथे त्यांचं शिक्षण झालं. 'आगाखान फाउंडेशन स्कॉलरशिप' मिळवून अमेरिकेतील 'कोलंबिया युनिव्हर्सिटी'मधून त्यांनी पत्रकारितेतील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला. लंडनमधील एका मान्यवर वृत्तपत्रामध्ये त्यांनी काही काळ नोकरीही केली. ब्रिटनमधील वांशिक दंगलींचे वृत्त देण्याची संधी त्यांना इथे मिळाली. त्यानंतर त्या पत्रकारिता करण्यासाठी भारतात परतल्या. मुंबईतून त्यांनी एक स्थानिक नियतकालिक काढलं; एका स्थानिक वर्तमानपत्राचं संपादन केलं आणि एका राष्ट्रीय साप्ताहिकाच्या विशेष प्रतिनिधी म्हणून देशभरातून बातम्या गोळा केल्या. गेली तीस वर्षं त्या पत्रकारितेमध्ये आहेत. पत्रकारितेतील आपल्या एका सहकाऱ्याशीच त्यांनी विवाह केलेला आहे.लेखनापेक्षा सामाजिक कामामध्ये त्यांचे मन अधिक रमते; परंतु त्यांचे काम निवडक लेखनातूनही प्रकर्षाने समोर येते. उदा. 'अरुणाची गोष्ट' – (एका नर्सवर झालेल्या बलात्कारामुळे तिचा जीवन-मृत्यूशी सुरू असलेला संघर्ष.)

'बिटर चॉकलेट' – भारतातील मुलांवर होणाऱ्या लैंगिक छळाचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांनी या पुस्तकातून केला आहे. 'वन्स वॉज बॉम्बे' – आठवणीतील मुंबई कशी आजच्यापेक्षा निरागस, विशुद्ध होती याचा मागोवा आपल्या आत्मचरित्रात घ्यायचा प्रयत्न त्यांनी केला आहे.



लेखक
पिंकी विराणी

अनुवाद
रेश्मा कुलकर्णी-पाठारे

स्त्री गर्भाशय तसंच आहे. अनादी-अनंत काळापासून जसं होतं तसंच आहे. तितकंच कणखर आणि तितकंच असुरक्षित. बाहेरचे घटक मात्र प्रचंड वेगानं बदलत गेलेले आहेत. समाज... कामाचं ठिकाण... कारकीर्द... ताणतणाव... प्रदूषण... स्त्रीची स्वतःची सामाजिक आणि आर्थिक स्थिती... त्यासाठी कराव्या लागणाऱ्या तडजोडी... या सगळ्याचा परिणाम अखेर स्त्रीच्या प्रजननक्षमतेवर होत आहे. मग जेव्हा तिला नैसर्गिकरीत्या मूल जन्माला घालता येत नाही तेव्हा तिच्यावर औषधांचा मारा केला जातो. नानाविध प्रक्रियांचा भडिमार केला जातो. पण सरतेशेवटी, गर्भाशय तर तेच आहे जसं ते पूर्वी होतं; त्याद्वारा अखेर सगळं बाळाकडेच पोहोचतं.

अखेर स्त्री अशा वळणावर उभी राहते,
जिथे तिला प्रश्न पडतो : वैद्यकीय विज्ञान की नैतिकता?
कशाला महत्त्व द्यावं?

एग्स्प्लॉयटेशन

''आताशा, स्त्री म्हणजे मानवी जनकाणूंची निर्मिती करणारं यंत्र बनून उरली आहे.''

भारतातल्या निरनिराळ्या राज्यांमधल्या, शहरांमधल्या झोपडपट्ट्या अगदी एकसारख्या दिसतात. निळ्या ताडपत्र्यांनी आच्छादलेल्या भिंती, तुटक्याफुटक्या पत्र्याची गळकी छतं, सर्वत्र पसरलेल्या दारिद्र्यामध्ये श्रीमंतीचं एकमेव लक्षण बनून उभ्या राहिलेल्या टीव्हीला जोडलेल्या आणि इथूनतिथून अस्ताव्यस्त धावणाऱ्या वायरी आणि सगळ्या कोलाहलात तगून राहिलेला आशावाद! अशाच एका झोपडपट्टीतल्या झोपडीमध्ये देणगी दिलेल्या जनकाणूमुळे पहिला मृत्यू झाला होता. किंबहुना, तो नोंदवलेला असा पहिला मृत्यू होता. त्यानंतरचा, अंडाशयांच्या अतिउत्तेजनामुळे झालेला म्हणून नोंदवलेला मृत्यू दिल्ली शहरात झाला होता. पण याचा अर्थ असा नाही की त्या दोन घटनांमध्ये इतर असे कुठलेच मृत्यू घडले नसावेत. निश्चितच घडले असतील; आणि यापुढेही घडत राहतील- नुसते मृत्यूच नाही, तर आयुष्यभर चालणारे भयंकर आजार आणि विकतचं घेतलेलं वंध्यत्व, हे सगळं तोपर्यंत चालत राहील, जोपर्यंत मानवी अंड्यांचं बाजारीकरण थांबत नाही.

वाढत्या संख्येनं मुली आणि स्त्रिया आपली अंडी विकायला काढत आहेत. गरिबी हे त्यामागचं एकमेव कारण नाहीये; किंबहुना, झटपट मिळणारा पैसा हे त्यामागचं मुख्य कारण आहे. वेश्याव्यवसाय करून स्वतःच्या संपूर्ण शरीराला त्रास देण्यापेक्षा किंवा धंदेवाईक सरोगेट बनून नऊ महिने त्रास झेलण्यापेक्षा, आपली अंडी विकणं, हा निश्चितच सोपा मार्ग आहे. धक्कादायक गोष्ट अशी की फक्त गरीब घरातल्या मुली आपली अंडी विकत नाहीत; तर, थोडा जास्त पॉकेटमनी मिळावा यासाठी कॉलेजकन्यका; आपल्या महागड्या जीवनशैलीसाठी पैसा मिळावा यासाठी उदयोन्मुख मॉडेल्स किंवा नट्या; आणि डॉक्टरकी, वकिली, अभियांत्रिकी शिक्षण असे महागडे कोर्स करत असणाऱ्या मुलीसुद्धा सर्रास आपली अंडी विकायला काढत आहेत!

अर्थात, हे सगळं गुपचुप केलं जातं. आणि एका ज्येष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितल्याप्रमाणे 'कायदा काही गोष्टींची परवानगी देतो; काही गोष्टींची परवानगी देत नाही.' मानवी अंड्यांची विक्री या दोन्ही सदरांखाली येत

नाही.

मात्र प्रश्न त्या एकल, विवाहित आणि विधवा स्त्रियांचा आहे, ज्यांना आपल्या मनाविरुद्ध, निव्वळ आर्थिक कारणांसाठी, आपली अंडी विकावी लागत आहेत; किंवा त्यांना तसं करण्यासाठी बळजबरी केली जात आहे. म्हणायला त्यांची लेखी संमती घेतली जाते; पण त्यात कितपत तथ्य असतं, हे वादातीत आहे. आणि या अशाच स्त्रियांच्या हक्कांचं रक्षण करण्यासाठी मानवी अंड्यांचं बाजारीकरण तात्काळ थांबवण्याची गरज आहे.

अर्थात, ज्या देशांमध्ये मानवी जिवाची किंमत नगण्य आहे आणि जिथे राजरोसपणे कुणाचा जीव घ्यायला हात कचरत नाहीत, तिथे कुणाच्या हक्कांची आणि काळजीची गोष्ट करणं हास्यास्पद वाटेल. अशा ठिकाणी, पैसा हा एकमेव देव असतो. पाणी, अन्न, निवारा या सगळ्यापेक्षाही पैसा श्रेष्ठ असतो. किंबहुना, पैसा नसेल तर अन्न, पाणी, निवारा वगैरे मूलभूत गोष्टी मिळवण्यासाठी जंग-जंग पछाडावं लागतं, अशा ठिकाणी स्त्रियांना आपली अंडी विकण्याचा मोह होत राहावा यात काय आश्चर्य वाटावं? त्यात जर तुम्ही सुंदर, उंच, चांगल्या बांध्याची, हुशार स्त्री असाल तर तुमच्या अंड्यांसाठी लोकं वाट्टेल ती किंमत मोजायला तयार असतात- तेसुद्धा, नगदी!

वंध्य स्त्रियांचं आयव्हीएफ करताना त्यांच्या अंडाशयांना उत्तेजित करून अंडी मिळवण्यासाठी, त्यांना भरपूर कृत्रिम संप्रेरकं दिली जातात. स्वतःची अंडी विकायला तयार असणाऱ्या प्रजननसक्षम स्त्रियांना शोधण्यासाठी दलालांची नेमणूक केलेली असते. त्यांपैकी बरेचसे दलाल पूर्वी स्वतः अंड्यांची विक्री करणाऱ्या स्त्रिया असतात. ही बाब बऱ्याच वैद्यकीय अहवालांमध्ये नजरेआड केली जाते.

असो! तर वंध्य आणि सुपीक/ प्रजननसक्षम, या दोन्ही स्त्रियांकडून अंडी मिळवण्याची पद्धत एकच असते. भरपूर कृत्रिम संप्रेरकं देऊन त्यांच्याकडून मिळतील तेवढी अंडी काढली जातात. मात्र स्वतःची अंडी विकायला आलेल्या प्रजननसक्षम स्त्रियांना जास्त संप्रेरकं दिली जातात; जेणेकरून त्यांच्याकडून, एकाच वेळी भरपूर अंडी मिळवता येतील. अर्थात, यासाठी ती अंडी खरेदी करणाऱ्याला बक्कळ पैसा मोजावा लागतो. अंडाशयांना तात्पुरतं बंद करण्यात येतं. मग संप्रेरके देऊन त्यांना, एरवी महिन्याला एक बीजकोश आणि त्यातून एक अंडं देतात त्याऐवजी, भरपूर बीजकोश निर्माण करायला लावतात. मग

एका ठरावीक दिवशी, स्त्रीला भूल दिली जाते आणि तिच्या योनीमधून सगळी अंडी बाहेर काढली जातात. वंध्य स्त्रीवर ही प्रक्रिया साधारणतः एकदाच केली जाते; सुपीक स्त्रीवर मात्र ही प्रक्रिया अनेकदा केली जाते- जितक्या वेळा ती आपली अंडी विकायला तयार असते तितक्या वेळा.

आजकालच्या स्त्रियासुद्धा फार 'स्मार्ट' झाल्या आहेत. आपल्याला मिळणार असणाऱ्या घबाडामधून दलालांना उगीच काही रक्कम देण्यापेक्षा त्या स्वतःच या 'अंडी बनवणाऱ्या कारखान्याचे' नियम अंगीकारू लागतात. छान दिसा, निरोगी राहा (किंवा किमान तसा भास निर्माण करा), आणि खोटं बोला. झालं! पाहिजे तेवढा पैसा मिळेल! या खेळाचे नियम माहिती नसलेल्या गरीब स्त्रियांना, त्यांचे दलाल हेच सगळं करण्याची शिकवण देतात. कालांतरानं त्या बायकासुद्धा 'स्मार्ट' बनतात!

एके काळी स्वतः आपली अंडी विकणारी आणि धंदेवाईक सरोगेट म्हणूनसुद्धा राहिलेली एक दलाल हसत सांगते, ''कधी आमची अंडी शाकाहारी असतात, कधी सरकारी नोकरी करणारी असतात, तर कधी एकदम श्रीमंत, उत्तम प्रतीची असतात! काय करणार सांगा? पापी पेट का सवाल होता है! लोकांच्या मतांना महत्त्व द्यायचं, तर पोट रिकामं राहणार. मग आम्ही गरिबांनी कुठल्या गोष्टीला जास्त महत्त्व द्यावं, सांगा? आमच्यासारख्या अंगठाछाप लोकांनाही हे माहिती असतं की रक्ताला जातपात नसते. पण हे शिकलेसवरले जातीचे मूर्ख लोक! यांना सगळं कसं टकाटक पाहिजे असतं! मग सांगायला लागतं सगळं तसं...जसं त्यांना ऐकायला आवडतं तसं!''

ही दलाल चुकचुकत मान्य करते, की सगळेच दलाल समतावादी विचार करणारे नसतात; ते ज्या प्रकारचा 'माल' देऊ करतात त्याप्रमाणे त्यांना वाढीव किंमतसुद्धा मिळते. 'काही फर्टिलिटी क्लिनिक्स किंवा अंड्यांच्या एजन्सीज्', जातीपातीच्या प्रमाणानुसार अंडी मागवतात. जे दलाल त्यांना तशी अंडी आणून देतात, त्यांना मोठी रक्कम मिळते. काही क्लिनिक्स तर आपल्या रुग्णांना कुठल्या प्रकारच्या स्त्रियांची अंडी घ्यायला आवडतील याची यादी काढतात; आणि त्यानुसार जो दलाल अंडी आणून देईल त्याला मोठं घबाड देतात. अर्थात, ते घबाड रुग्णांच्याच खिशातून काढलं जातं; पण जिथे बाईच बाईची शत्रू बनते तिथे समतावादी उच्च विचारांना काय किंमत उरणार हो! काय गंमत असते पाहा- आपल्याला मूल नाही, पण आपण गरीब आहोत म्हणून जी स्त्री

दुसरी आवृत्ती

अद्‌भुत शक्तींचे मायाजाल



लेखक

बाळ भागवत

किंमत : १६०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.

आपल्या या सृष्टीवर आपल्याबरोबरच एका अमानवी, अदृश्य शक्तीचेही अस्तित्व असल्याचे सतत जाणवत असते. हे अस्तित्व नानाविध प्रकारांनी प्रचीत होत राहते. बुद्धिप्रामाण्याच्या आधारे त्याचा शोध विफल ठरतो. तर्कसंगती निष्फळ ठरते. तरीही या शक्तीचे अस्तित्व नाकारता येणे अवघड असते.
जगातील विविध देशांत या अद्‌भुत शक्तीने आपले मायाजाल कसे पसरवले आहे, याचे वेगवेगळ्या कामांतील, वेगवेगळ्या चित्तचक्षुचमत्कारिक अनुभवांचे चित्रण या ग्रंथात आढळेल.
त्यांवरून निष्कर्ष तुम्हीच काढावयाचा आहे.

आपल्याला तिची अंडी देऊ करते, ती गरीब असल्याबद्दल ती निःसंतान पण श्रीमंत स्त्री तिची अवहेलना करते. बऱ्याचदा, निःसंतान स्त्रीची सासू मोठ्ठाली यादी घेऊन बसते. मला आमच्या वारसासाठी अमुक-अमुक जातीच्या स्त्रीची अंडी पाहिजेत, अमुक-अमुक रंग-रूपाच्या स्त्रीची अंडी पाहिजेत... मूल बापासारखं दिसलं पाहिजे ना? नाहीतर समाजामध्ये नाचक्की व्हायची! जी ते मूल आपल्या उदरात वाढवणार असते, त्या सुनेची किंमत कवडीमोल असते. जी आपल्या घराण्याला वारस देऊ शकली नाही, तिचं मत काय विचारायचं? असा सगळा मामला असतो बघा! अजीब आहे दुनिया!

सुदैवानं, अजून तरी ही दलालांची साखळी लहान गावांमध्ये पोहोचलेली नाही. पण तसं व्हायला फारसा वेळ लागणार नाही. शहरी गरिबीमुळे उगम पावलेली ही फळी, गावातल्या गरिबांचा उद्धार करण्यासाठी तिथे पोहोचायला वेळ लागणार नाही. आता जसं शहरी बायका आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी पैसे गोळा करायचे आहेत इत्यादी कारणं सांगून स्वतःची अंडी विकतात, तसंच गावातल्या गरीब बायकांनासुद्धा, त्यांच्या असणाऱ्या-नसणाऱ्या गरजांची ग्वाही देऊन अंड्यांची विक्री करायला लावायला या दलालांना वेळ लागणार नाही. अर्थात, ते होईपर्यंत, अधिक चांगली किंमत मोजणाऱ्या गिऱ्हाइकांना विदेशातून पर्यटनासाठी आलेल्या गोऱ्या स्त्रियांची अंडी मिळवून देण्याचा धंदाही जोरात चालू आहे.

''मला उगीच अपराधी वाटायला लावू नका. काय चूक करतेय मी?'' केसरचनेचा व्यवसाय करणारी एक २२ वर्षांची तरुणी विचारतेय. 'मला कुठे फिरायला वगैरे जायचं असेल आणि त्यासाठी वरचा पैसा हवा असेल, तेव्हाच मी माझी अंडी विकते. हां, आता इतर कुठल्या स्त्रियांना बळजबरीनं आपली अंडी विकायला लागत असतील तर ते चांगलं नाहीये. पण यात माझा काय दोष आहे? आणि माझा संबंध तरी काय? मला पैशाची गरज पडली की मी स्वतःच्या मर्जीनं, अगदी डोळे उघडे ठेवून एक छोटासा व्यवहार करते. त्यात काय एवढं? आतापर्यंत दोनदा मी माझी अंडी विकली आहेत; गरज पडली तर तिसऱ्यांदासुद्धा विकेन. हो, मी सिगारेट ओढते; नाही, मी हे त्यांना सांगितलं नाहीये. त्यात काय? वीर्यदान करणारे कितीतरी पुरुष अमली पदार्थांचं सेवन करतात. ते सांगतात का तसं? ते तर वीर्यदानसुद्धा करतात आणि इतर मुलींसोबत मजासुद्धा करतात. मग? इंजक्शनांचं एवढं काही वाटत नाही;

जरासा ताप येतो; कधीकधी डोकं जड झाल्यासारखं वाटतं, इतकंच. पहिल्यांदा मला शरीराची उष्णता वाढल्यासारखी वाटली, पण दिवसभर एसी सलूनमध्ये काम करत असल्यामुळे, त्याचा फारसा त्रास जाणवला नाही. दुसऱ्यांदा माझं डोकं खूप दुखू लागलं. दृष्टीसुद्धा थोडी कमकुवत झाली होती. बद्धकोष्ठता झाली. काही दिवस कामावरून रजा घ्यावी लागली. क्लिनिकनं मला त्या सगळ्यासाठी निराळी औषधं दिली.''

ती पुढे सांगते, ''त्यांना माझ्याकडून किती अंडी मिळाली हे मी नाही विचारलं. दुसऱ्यांदा गेले तेव्हा तीव्र औषधांचा काय वाईट परिणाम होतो हे मी इंटरनेटवर वाचून गेले होते. त्यानुसार मी त्यांना सांगितलं की मला तीव्र औषधं देऊ नका. म्हणून मला वाटतं, त्या खेपेला त्यांना जास्त अंडी नाही मिळाली. पण तरी ते खूश होते. मला म्हणाले, माझी अंडी 'ए ग्रेड'ची आहेत आणि मी तिसऱ्यांदा नक्की यावं. मी जाईन, पण दुसऱ्या क्लिनिकला जाईन. तिथे जास्त पैसे मिळतात असं ऐकलंय. होऽऽ, मी काही भयंकर गोष्टी ऐकल्या आहेत... एका मुलीने फारच जास्त वेळा अंडी दान केली आणि तिला कसलासा संसर्ग लागला. तिला बरेच दिवस इस्पितळात ठेवावं लागलं; त्याचा खर्च त्यांनीच केला. तिच्या घरी समजलं असेल, तेव्हा त्या मुलीची वाट लागली असेल! मी जेव्हा अंडी देऊन घरी आले तेव्हा खूप थकले होते. आईला वाटलं माझी मासिक पाळी सुरू झालीय म्हणून थकलेय... मला हे सगळं ऐकायला फार 'बोअर होतं' की अशी औषधं घेऊन अंडी दान करत बसले तर पुढे मला स्वतःची पोरं व्हायला त्रास होईल, वगैरे... पुढचं पुढे बघू या यारऽऽ! तसंही, इथे कोणाला रस आहे, मुलंबाळं जन्माला घालण्यात? आयुष्यभराची कटकट आणि खर्च नुसता! कोण इतकं मूर्ख आहे हा त्रास स्वतःहून गळ्यात मारून घ्यायला? मी नाही बाबा... हां, वाट्टेल तेवढा पैसा देऊन माझी अंडी विकत घेणारी ती माणसं निश्चितच मूर्ख आहेत... पैसे भरून स्वतःसाठी आयुष्यभराचा ताप विकत घेतात...हाऽऽ हाऽऽ हाऽऽ''

दिल्लीमधल्या एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मते, सगळीच क्लिनिक्स अंडी घेऊन आयव्हीएफ करतात असं नाही. ''मला वाटतं, हा एक मोठा धंदा आहे. फर्टिलिटी क्लिनिक्सनी त्यांच्या सभ्य मुखवट्याआड चालवलेला अंडा-धंदा. तरुण मुली-स्त्रिया यांच्याकडून अंडी घ्यायची, इतर डॉक्टर्स किंवा फर्टिलिटी क्लिनिक्सना ती अंडी विकायची आणि मोठं कमिशन

खायचं. अर्थात, त्याशिवाय आयव्हीएफसाठी त्यांच्याकडे येणाऱ्या गिऱ्हाइकांना अंडी विकून मिळणारी मोठी रक्कम वेगळी.'' सदर अधिकाऱ्यांच्या मते, अंडा-धंद्यामध्ये बळी जाणाऱ्या अजाणत्या आणि निरागस स्त्रियांना न्याय मिळणं फार कठीण आहे. कारण या धंद्यातल्या लोकांची एकी फार जबरदस्त आहे.''

दुसऱ्या शहरातला एक दलाल सांगतो, ''बायकांना डॉक्टरांकडे किंवा अंडी विकत घेणाऱ्या एजन्सींकडे नेलं जातं. या एजन्सीज् इंटरनेटवर आपली जाहिरात करतात. ज्या स्त्रीची अंडी देण्याची पहिली खेप असेल, तिला सगळ्यात जास्त रक्कम मिळते. खरंतर, स्त्री जितकी 'ताजी' तितका सगळ्यांचाच फायदा होतो. डॉक्टरला, त्या बाईला, आम्हाला सगळ्यांनाच जास्त पैसा मिळतो; गिऱ्हाइकाला चांगलं अंडं मिळतं. सगळेच खूश! पण एकूण, आम्हा दलालांना तशी मगजमारी जास्ती आणि तुलनेने पैसा कमी मिळतो बघाऽऽ. एकेका बाईकडून १५-२० अंडी आरामात निघतात. काही डॉक्टर लोक तर ३५-४० अंडी काढतात. पण साला, इतकी सगळी अंडी जातात कुठे देव जाणे? सगळ्यांची मुलं थोडीच बनतात?''

तात्पर्य असं की, उरलेली अंडी विकून डॉक्टर आणि क्लिनिक स्वतःच्या तुंबड्या भरत बसतात. कुठल्याही स्त्रीकडून काढलेल्या सगळ्या अंड्यांमधून प्रजनन होत नसतं, हे आपल्याला ठाऊक आहेच. पण स्त्रियांकडून काढलेल्या सगळ्या अंड्यांचा वापर प्रजननाच्या किमान प्रयत्नासाठी केला जावा, या नैतिक बाबीचा विसर बऱ्याच डॉक्टरांना पडलेला दिसतो आहे. कायद्यानं कुठलीही बंदी नसल्यामुळे, अंड्यांची सर्रास ने-आण केली जात आहे. याला खरंतर तस्करीच म्हटलं पाहिजे, पण ज्या कृत्याला कायद्यानं बंदी नाही, त्याला गुन्ह्याचं संबोधन तरी कसं द्यावं? स्त्रियांची अंडी देशभरात फिरत असतात. वर्तमानपत्रांनी कित्येकदा हे पुराव्यानिशी सिद्ध केलेलं आहे की डॉक्टर समाजामध्ये आपसात अंड्यांची खरेदी-विक्री चालते. काही डॉक्टरांनी हे बेलाशकपणे मान्य केलं आहे की, ''आम्ही एका वेळी सुमारे ५० अंडी काढतो आणि ज्या डॉक्टर बांधवांना ती हवी आहेत त्यांना विकून टाकतो.''

या चक्रावून टाकणाऱ्या व्यापाराचा, पालकत्वाच्या दृष्टीनं विचार केला तर लक्षात येईल की, एका स्त्रीच्या अंड्यांनी देशाच्या कानाकोपऱ्यात निर्माण झालेली कितीतरी मुलं हे न जाणता फिरत असतील की इतरत्र कुठेतरी त्यांचं अर्ध-भावंडं फिरत आहे! या सगळ्या मुलांचा आपापल्या जन्मदात्या आईशी

डेल कार्नेगी यांचे साहित्य

पाचवी आवृत्ती

अनुवाद

शुभदा विद्वांस

किंमत प्रत्येकी २००/-रु.

पोस्टेज प्रत्येकी : ५०/-रु.

चौथी आवृत्ती

(जी ते विकत घेतलेलं अंडं आपल्या पोटात वाढवते ती) आनुवंशिकतेने काहीच संबंध नसतो; आणि आपली खरी आई कोण हे त्यांना कधीच कळत नाही. पण विचार करा - कर्मधर्मसंयोगानं एकाच स्त्रीच्या अंड्यांमधून निर्माण झालेली दोन अपत्यं, पुढे जाऊन एकमेकांच्या प्रेमात पडली, त्यांच्यात शारीरिक संबंध आले, त्यांनी एकमेकांशी लग्न केलं तर अजाणतेपणानं किती जटिल समस्या निर्माण होतील? अर्थात, कुणी असंही म्हणेल की एवढ्या मोठ्या देशात असं होण्याची शक्यता फार कमी आहे. पण कमी असली, तरी शक्यता आहे ना? मग त्याकडे दुर्लक्ष का करा? फर्टिलिटी क्लिनिक्स ज्या संमतिपत्रांवर स्त्रियांच्या संमतिदर्शक सह्या घेतात, त्यामध्ये ज्या काही अटी आणि मजकूर लिहिलेला असतो तो त्या स्त्रियांनी सही करण्यापूर्वी जरूर वाचावा. वैद्यकीय मानववंशशास्त्रज्ञ सुनीता रेड्डी आणि समाजशास्त्रज्ञ तुलसी पटेल, भारतातल्या वैद्यकीय बाजाराबद्दल बोलताना म्हणतात, ''एका क्लिनिकनं असं सांगितलं होतं की, त्यांच्याकडे बँक नाहीये; त्यांना गरज वाटेल तेव्हा ते अंडी आणि शुक्राणू कुरियरमार्फत मागवून घेतात. अंडी आणि शुक्राणूंच्या देणगीदारांच्या सोबत दिलेल्या वैद्यकीय चाचण्यांचा, आरोग्य-इतिहासाच्या अहवालाच्या आणि इतर घटकांच्या आधारे, क्लिनिकमधले तंत्रज्ञ त्यातल्या त्यात चांगल्या अंड्यांची आणि शुक्राणूंची निवड करतात. कुरियर पोहोचायला किमान एक दिवस लागतो.''

भविष्यात जरी कधी असं घडलं की स्वतः प्रजननासाठी न आलेल्या स्त्रियांची अंडी घेऊन दुसऱ्यांना विकण्यावर कायद्यानं बंदी आणली, किंवा काही ठरावीक 'ओसाइट बँक्स' (जनकाणूंची बँक)मार्फतच असा व्यवहार करण्याची सक्ती केली, तरीसुद्धा हे एक प्रकारचं वैद्यकीय शोषणच आहे. कायद्यामधून पळवाटा काढायला वेळ लागत नाही. समजा, अशा बँकांमार्फत सदर व्यवहार करण्याची सक्ती आलीच, तरी क्लिनिक्स एकाऐवजी अनेक बँकांमध्ये स्वतःला नोंदवून आपला धंदा सुरू ठेवूच शकतात. आणि जरी या बँकांची मालकी एखाद्या डॉक्टरांकडे, स्त्रीरोग तज्ज्ञांकडे नसली तरी त्यामुळे आपली पैशाची बँक भरण्यासाठी ओसाइट बँकेमधला धंदा तेजीनं चालवावाच लागणार!

एवढ्या स्त्रिया आपली अंडी विकत आहेत, पण त्यांना नक्की कोण विकत घेतंय? देशातलीच लोकं? की मग हे कुरियर आंतरराष्ट्रीय सेवासुद्धा पुरवतात? दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटीतील डॉ. मोहन राव हे समाज

शल्यचिकित्सा आणि आरोग्य या विषयांवरचे तज्ज्ञ आहेत. ते म्हणतात, ''जागतिक पातळीवरच्या अब्जांच्या जैविक-अर्थव्यवस्थेमध्ये भारताचं महत्त्व फार मोठं आहे, कारण आपल्याकडे अंड्यांची निर्मिती आणि व्यापार भरपूर प्रमाणात होत असतो. जनकाणू फक्त प्रजननासाठीच लागतात असं नाही, तर स्टेमसेल्सच्या प्रक्रियेसाठीही त्यांची गरज पडते. आपल्याकडेही स्टेमसेल्सची प्रक्रिया केली जाते; त्यावरही कायद्याचं काहीही बंधन नाही आहे. त्यामुळे स्त्रियांकडून घेतलेली अंडी प्रजननासाठी न वापरता स्टेमसेल्स प्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांना चढ्या भावात विकली जात असतील, तर आश्चर्य वाटायला नको. सदर डॉक्टर या अंड्यांचा वापर स्टेमसेल्समध्ये अजूनही सुरू असणाऱ्या प्रयोगांसाठी करत असावेत. किंवा भारताबाहेरच्या कायद्यांचा फायदा घेऊन, या अंड्यांची बाहेर निर्यात होत असावी. बाहेरच्या देशांमध्ये स्टेमसेल्सवर चाललेल्या प्रयोगांसाठी या अंड्यांचा वापर होत असावा. हा सगळा व्यवहार इतक्या छुप्या पद्धतीनं चालतो की त्याबद्दल काही ठोसपणे सांगणं कठीण आहे. एक मात्र नक्की : युक्रेन आणि रशियानंतर भारत हे या बाजारपेठेतलं महत्त्वाचं ठिकाण मानलं जातं.''

मानवी पेशींची आयात-निर्यात ही सामान्य बाब आहे. मग त्या नावाखाली तर मानवी अंड्यांची आणि भ्रूणांची तस्करी तर चालू नाही ना? अर्थात, त्यात कुठल्याच कायद्याचं उल्लंघन होत नसल्यामुळे तस्करी हा शब्द वापरणं चुकीचं ठरेल. कारण विदेशी लोकं जेव्हा स्वतःच्या फलित अंड्यांसाठी सरोगेट शोधायला भारतात येतात तेव्हा ते कायद्यामधल्या या पळवाटेचा उपयोग करून येतात की मानवी भ्रूणाची आयात केवळ एक 'एनओसी' म्हणजे 'ना हरकत प्रमाणपत्र' मिळवून मुक्तपणे करता येते! ही एनओसी, 'इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च' (आयसीएमआर) कडून मिळवायची असते.

देशाच्या उन्नतीच्या दृष्टीने विदेशी देशांशी व्यापाराचे उत्तम संबंध असणे, आयात-निर्यातीवर कमीत कमी बंधने असणे, या सगळ्या चांगल्याच गोष्टी असतात. पण मानवी शरीराला आणि त्यातील घटकांनाही जर वस्तूंचा दर्जा देऊन त्यांचा असा बाजार मांडला जात असेल तर त्याला आपल्या देशाची उन्नती समजावी की तस्करी? आणि सदर व्यापारामध्ये (किंबहुना तस्करीमध्ये) सामील असलेले दलाल, स्त्रिया, डॉक्टर यांना आणि पालक होण्याची आस असणाऱ्या लोकांना, तस्कर मानावं का? ❖

पुस्तक परिचय

द ब्रोकर

८ फेब्रुवारी, १९५५ रोजी जॉन्सबोरो अर्कान्सास येथे जॉन ग्रिशॅम यांचा जन्म झाला. बांधकाम कामगाराचा हा मुलगा 'व्यावसायिक बेसबॉल खेळाडू' व्हायची स्वप्ने बघत होता; परंतु त्यासाठी आवश्यक गोष्टी आपल्याकडे नाहीत, हे लक्षात आल्यावर त्यांनी आपली गाडी दुसऱ्या विषयाकडे वळवली.

कायद्याची पदवी घेतल्यानंतर दहा वर्षं त्यांनी वकिली केली. १९८३ ते १९९० या काळात विधानसभेवर निवडून येऊन त्यांनी कार्य केले. एक दिवस एका बारा वर्षांच्या बलात्कारित मुलीची कहाणी ऐकून त्यांनी त्यावर आधारित कादंबरी लिहायला सुरुवात केली. कामावर जायच्या आधी पहाटे पाच वाजता उठून ते कादंबरी लिहीत असत. तीन वर्षांनंतर ही कादंबरी पूर्ण झाली; पण प्रकाशकांनी लगेच स्वीकारली नाही.'कायदेविषयक रोमांचक वाङ्मय लिहिणारा लेखक' हे बिरुद मिळण्याच्या आधी ते मिसिसिपीमध्ये आठवड्याला साठ ते सत्तर तास काम करणारे वकील होते. त्यांचा सर्व वेळ ऑफिसमध्येच जात असे. कधी कामाला जाण्याच्या आधीचा तर कधी मधल्या सुटीचा वेळ ते कादंबरी लेखनाच्या छंदासाठी देत असत; पण लवकरच त्यांच्या लेखनाच्या छंदाचे पूर्ण वेळ व्यवसायात रूपांतर झाले. लोकप्रिय आणि रोमांचक कादंबऱ्यांची मालिका सुरू झाली. त्यांच्या नऊ कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले आहेत. त्यांच्या अनेक कादंबऱ्या 'बेस्टसेलर' ठरल्या. लेखनाव्यतिरिक्त समाजोपयोगी कार्यातही ते मग्न असतात. त्यांनी उभारलेल्या फंडामधून वादळग्रस्त लोकांसाठी काम केले जाते.

लेखक
जॉन ग्रिशॅम

अनुवाद
अशोक पाध्ये

राजधानीतील सत्ताधाऱ्यांमध्ये ऊठबस करणारा, सत्ताकारणात कोणाला खाली खेचायचे, कोणाला वर चढवायचे या खेळात भाग घेणारा बॅकमन हा अनेकांची सरकारदरबारी असलेली कामे पैसे घेऊन करून द्यायचा. त्यामुळे त्याला 'दलाल' असे संबोधले जाई. शेवटी त्याला तुरुंगवास पत्करावा लागला. सहा वर्षांनी त्याला माफी मिळाल्याने तो सुटून बाहेर आला. बॅकमनजवळ काही उपग्रहांवर नियंत्रण ठेवणारं सॉफ्टवेअर होतं. बॅकमन सुटल्यावर त्याला अमेरिकेच्या केंद्रीय गुप्तचर संघटनेने, सी.आय.ए.ने देशाबाहेर नेऊन ठेवले. त्याला नवीन नाव, नवीन ओळख आणि एक नवीन घर दिले. तो आपल्या नवीन आयुष्यात स्थिर झाल्यावर त्याचा नवीन पत्ता अन्य देशांच्या गुप्तचर संस्थांना दिला. मग इस्त्रायली, चिनी व सौदी अरेबियाचे गुप्तचर त्याला मारण्यासाठी पुढे सरसावले. कोण पुढे येऊन मारतो आहे, हे सी.आय.ए.ला ठाऊक करून घ्यायचे होते. बॅकमनचा बळी गेला तरी त्यांना पर्वा नव्हती. त्यांना हवे होते ते फक्त उत्तर. अन् मग सर्व प्रकरणाला भलतीच कलाटणी मिळाली. 'पुढे काय झाले?' ही उत्सुकता ग्रिशॅम कायम ठेवतो. जगभरात प्रचंड खप असलेली कादंबरी. आत्तापर्यंत अर्धा अब्ज प्रती जगभरात खपल्या !

डॅन सँडबर्ग हा 'दी वॉशिंग्टन पोस्ट' या वृत्तपत्राचा एक अनुभवी पत्रकार होता. त्याने बॅकमन प्रकरणाची सर्व माहिती बारकाईने गोळा केलेली होती. १९९८ मध्ये त्याने काही प्रतिष्ठित वृत्तपत्रात या प्रकरणाला वाचा फोडली होती. मात्र यात कुठेही अमेरिकेच्या संरक्षण खात्याला गोवले नव्हते. यानंतर या प्रकरणाची तपासणी व अधिक शोध एफ.बी.आय. या सरकारी तपासयंत्रणेमार्फत सुरू झाला. तो तपास सहा महिने चालू होता. त्या काळात सँडबर्गने बॅकमन प्रकरणासंदर्भात एकामागून एकेक अशी १८ प्रकरणे बाहेर काढून ती वृत्तपत्रात प्रसिद्ध केली. बहुतेक प्रकरणे पहिल्या पानावर छापून आली. सी.आय.ए. आणि एफ.बी.आय. या सरकारी संस्थांत त्याचे काही जणांशी विश्वसनीय व घनिष्ठ संबंध होते. त्यांच्याकडून त्याला आतील बातम्या कळत. 'बॅकमन, प्रॅट ॲन्ड बोलिंग' कंपनीचे भागीदार त्याला ठाऊक होते. त्यांच्या ऑफिसात त्याने अनेकवार भेटी दिल्या होत्या. कधी कधी न्याय खात्यातसुद्धा तो चंचुप्रवेश करून बातम्या काढायचा प्रयत्न करे. ज्या दिवशी बॅकमनने आपल्यावरील आरोप मान्य केले, त्या दिवशी तो न्यायालयात हजर राहून माहिती घेत होता.

या मोठ्या घोटाळ्यासंदर्भात पुढे त्याने वर्षभरात दोन पुस्तके लिहिली. एक हार्ड बाऊंड केलेले पुस्तक ताबडतोब खपले. त्याच्या २४,००० प्रती हातोहात खपल्या, तर दुसऱ्या पुस्तकाच्या १२,००० प्रती खपल्या.

हे सारे करीत असताना सँडबर्गने काही महत्त्वाच्या व्यक्तींशी संबंध जोडून ठेवले. त्यातील एक व्यक्ती खूप महत्त्वाची होती व अनपेक्षित वाटेल अशी होती. जेसी हबर्ड याच्या मृत्यूच्या आधी एक महिना, कार्ल प्रॅट याच्यावरतीही आरोप ठेवले होते. तसेच बोलिंगवरतीही ठेवलेले होते. मग त्यांनी सँडबर्गबरोबर एक बैठक ठरवली. मग अशा बैठका एकामागोमाग एकेक अशा डझनभर वेळा होत गेल्या. इकडे खटला, त्या संबंधाच्या बातम्या, त्यावर वृत्तपत्रात सतत काहीना काही छापून येणे हे चालूच होते. त्यामुळे बैठकांवर बैठका होत गेल्या व त्यातून सँडबर्ग व बॅकमनच्या भागीदारांचे संबंध दृढहोत गेले. बैठकीत सारे जण मद्यप्राशन करीत असल्याने ते एकमेकांचे 'मद्यबंधू' ठरले. वर्षातून दोनदा तरी ते अशा बैठका घेऊन जगू लागले व गप्पा मारू लागले, माहितीची देवाण-घेवाण करू लागले.

बॅकमनला माफी जाहीर करण्यात आल्यानंतर तीन दिवसांनी सँडबर्गने प्रॅटला फोन करून भेटीस बोलवले. त्यासाठी नेहमीचीच जागा होती. जॉर्जटाऊन

दुसरी आवृत्ती

गोलमाल

लेखक

डॉ. बाळ फोंडके

किंमत : २२०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.

''हे पहा, बाहेर टळटळीत दुपार आहे. उजेड नुसता पावसानं कोसळणाऱ्या दरडीसारखा अंगावर कोसळतोय. तरीही तो बाहेरच ठेवून इथं मिट्ट काळोख केल्याशिवाय तुम्हाला काही दिसत नाहीय. मघाशी तुम्हाला दिलेली कॉफी जीभच काय पण हातही भाजेल इतकी कडकडीत होती. त्यात पाक होण्याइतपत साखर घातली होती; पण ती तुम्हाला प्रेतासारखी थंडगार आणि खारट लागली. उलट तुम्हाला दिलेल्या दुसऱ्या कपात बर्फाचा खडा आणि चमचाभर मीठ घालताच ती तुम्हाला व्यवस्थित वाटली. आज उन्हाळ्याचा कडाका आहे. रेकॉर्ड ब्रेक करणारं टेम्परेचर आहे. आणि तुम्ही अर्धा डझन ब्लँकेट्स अंगावर घेऊनही थंडीनं कुडकुडताय. मी तुमच्या गालावर सॅन्डपेपर फिरवला तेव्हा तुम्हाला कोणीतरी मोरपीस फिरवल्यासारखं हुळहुळलं. उलट कापसाच्या बोळ्यांत कोणी टाचण्या का ठेवल्यात म्हणून तुम्ही बोंब ठोकलीत. निरनिराळे रंग मी तुम्हाला दाखवले तेव्हा जांभळ्याच्या ठिकाणी तुम्हाला पिवळा दिसला, तांबड्याच्या जागी हिरवा आणि नारिंगीच्या ऐवजी निळा. आता समजलं, तुम्हाला काय झालंय ते?''

विद्यापीठाजवळ असलेला एक बार त्यांनी निवडला होता. तिथे विद्यार्थ्यांची वर्दळ जास्त असे, व्यावसायिक मंडळी कमी असत. प्रॅट खूपच भयंकर दिसत होता. जणू काही तो अनेक दिवस पीत असावा असे त्याच्याकडे पाहिल्यावर वाटत होते. त्याने आपल्यासाठी व्होडका मद्याची ऑर्डर दिली. तर सँडबर्गने नेहमीप्रमाणे बिअर निवडली.

मग सँडबर्गने हसत प्रॅटला विचारले, ''मग कुठे आहेत तुमचे ते थोर भागीदार?''

''ते तुरुंगात नाहीत एवढेच मी सांगू शकतो.'' एवढे म्हणून प्रॅटने व्होडकाचा एक मोठा घोट घेतला आणि आपल्या ओठांवरून त्याने जीभ फिरवली.

''त्यांच्याकडून काही कळले नाही?''

''नाही. मला काही कळले नाही आणि ऑफिसातही त्यांनी कुणालाही कळवले नाही.''

''पण जर त्यांनी तुम्हाला अचानक फोन केला किंवा बाहेर कोठे समोर येऊन उभे राहिले तर तुम्हाला आश्चर्याचा धक्का बसेल ना?''

''होय आणि नाही. बॅकमन यांच्या बाबतीत काहीही घडू शकते.'' एवढे म्हणून त्याने आणखी एक व्होडकाचा घोट घेतला व पुढे म्हटले, ''त्यांनी जर परत कधीही वॉशिंग्टनमध्ये पाऊल टाकले नाही तरीही मला आश्चर्य वाटणार नाही किंवा जर त्यांनी उद्या येथे येऊन आपण एक नवीन 'लॉ फर्म' उघडणार आहोत असे सांगितल, तरीही मला त्याचे आश्चर्य वाटणार नाही.''

''पण त्यांना माफी दिल्याचे मात्र तुम्हाला आश्चर्य वाटले असेल ना?''

''होय, पण त्यासाठी बॅकमन यांनी मागणी केलेली नव्हती किंवा सरकारशी कसलाही करार केलेला नव्हता; का केला होता?''

''मला त्याबद्दल शंकाच आहे,'' सँडबर्ग म्हणाला. एक विद्यापीठातील विद्यार्थिनी बारमध्ये येऊन त्याच्या शेजारून गेली. सँडबर्गने तिला नीट पाहून घेतले. त्याचा दोन वेळा घटस्फोट झालेला असल्याने तरुण स्त्रियांकडे पाहण्याची त्याला आता सवय लागली होती. त्याने आपल्या बिअरचा एक घोट घेतला आणि म्हटले, ''आता बॅकमन वकिली करू शकणार नाही, हो ना? मला वाटते की सरकारने त्याचा वकिली करण्याचा परवाना रद्द केला असावा.''

''असल्या गोष्टी बॅकमन कधीच मनावर घेत नाही. त्यांना जे काही करायचे

असते ते करतच राहतात. आपल्या कामाला ते 'सरकारी संबंध' किंवा 'सल्लामसलत' किंवा आणखी असलेच काहीतरी म्हणत राहतात; पण कामे थांबवत नाहीत. शेवटी ते लॉबीइंग करीत राहतात. आपल्या अशिलाच्या कामासाठी सरकारातील उच्चपदस्थांची विनवणी करतात, हातमिळवणी करतात व त्यांना आपल्या बाजूला वळवतात. हे तर त्यांचे वैशिष्ट्य आहे आणि त्यासाठी सरकारचा परवाना लागत नाही. आपल्या देशातील निम्मे वकील तुम्हाला न्यायालयात सापडणार नाहीत; पण ते सरकारी मंत्रालयात, म्हणजे 'कॅपिटोल हिल' येथे मात्र सापडतील.''

''अशिलांबाबत काय म्हणाल?''

''त्यांचा कुठे प्रश्नच उद्भवत नाही. कारण बॅकमन येथे वॉशिंग्टनमध्ये परत येणारच नाहीत. वेगळे काही झाले तर मात्र सांगता येत नाही. अन् तसे काही माझ्या कानावर अद्याप आले नाही.''

''नाही बुवा; मी तसे काहीही ऐकले नाही. बॅकमन माझ्या मते माफी मिळाल्यावर अदृश्य झाले. तुरुंगात चौकशी केली तरी कोणीही त्याबद्दल बोलणार नाही. तुरुंगातून कोणीही माझ्याशी संपर्क साधला नाही.''

''मग तुमचा काय अंदाज आहे? किंवा यामागे एखादा सिद्धान्त वगैरे काही आहे का?'' प्रॅटने विचारले आणि आपल्या ग्लासातील उरलेसुरले मद्य पिऊन ग्लास रिकामा केला. दुसरा ग्लास पिण्यासाठी तो तयार झाला असावा.

''मला आज असे कळले की, सी.आय.ए.चे प्रमुख टेडी मेनार्ड हे राष्ट्राध्यक्ष मॉर्गन यांच्या शेवटच्या दिवशी व्हाईट हाऊसमध्ये गेले होते. मॉर्गन यांच्याकडून काही करवून घ्यायचे असेल तर ते मेनार्ड यांनाच जमते. बॅकमन तुरुंगातून निघून गेले ते बहुतेक सुरक्षारक्षकांबरोबर आणि ते गायब झाले.''

''कोणीही साक्षीदार तिथे नव्हता?''

''नव्हता. याआधी सी.आय.ए.ने अनेकांना असेच गायब केले किंवा लपवून टाकले होते. त्यांना तसे करावेच लागते. मात्र तसे अधिकृतपणे करण्यासाठी कोणत्याही नियमांचा आधार नाही. पण त्यांच्याकडे अनेक मार्ग आहेत.''

''पण बॅकमन यांना का लपवायचे?''

''सूड! ॲल्ड्रिख ॲमीस याची केस आठवते ना?

सी.आय.ए.च्या इतिहासात लपवली गेलेली ही एक मोठी केस आहे, हो ना?''

''नक्कीच.''

''आत्ता त्यांना बहुतेक एखाद्या केन्द्रीय सरकारच्या संस्थेत किंवा अन्यत्र डांबून ठेवले असणार. बॅकमनची जिरवण्याची खुमखुमी सी.आय.ए.ला असल्याने त्यांनी या कारवाईत आनंदाने पुढाकार घेतला. त्यांना तसे करण्यासाठी कोणत्याही कायद्याचा आधार नाही. कोणत्याही अमेरिकी नागरिकाला त्यांना असे बेकायदा अमेरिकेत किंवा परदेशात डांबून ठेवता येत नाही.''

''पण बॅकमन हा सी.आय.ए.चा शत्रू नव्हता. तो टेडी मेनार्डचा राग करीत होता; तसेच मेनार्डही बॅकमनचा राग करीत असे.''

''मेनार्ड त्यांना ठार करणार नाही. ते दुसऱ्या कोणाकडून तरी ते काम करवून घेतील,'' सँडबर्ग म्हणाला.

प्रॅट एकदम उठून उभा राहिला व सँडबर्गच्या ग्लासकडे बोट करून म्हणाला, ''अजून घेणार आहात ना?''

''नंतर बघू,'' असे म्हणून सँडबर्गने आपला ग्लास उंचावून बिअरचा एक घोट घेतला.

जेव्हा प्रॅट व्होडकाचा एक डबल पेग ग्लासात घेऊन आला व खाली बसून म्हणाला, ''म्हणजे तुमच्या मते आता बॅकमनचे दिवस भरले आहेत, असेच तुम्हाला म्हणायचे आहे ना?''

''तुम्ही माझी अटकळ विचारली, मी ती तुम्हाला सांगितली. आता मला तुमची अटकळ सांगा. तुमचा यावरचा विचार कळू द्या.''

प्रॅटने एक व्होडकाचा घोट घेतला व म्हणाला, ''तोच माझा विचार आहे, पण जरा वेगळ्या दृष्टिकोनातून.'' एवढे म्हणून त्याने ग्लासात बोट घालून ते पेय ढवळले, मग तोंडात बोट घालून तो चोखले. काही क्षण विचार केला व मग तो म्हणाला, ''पण मी सांगेन ते 'ऑफ द रेकॉर्ड'घ्या. त्याची वाच्यता करता कामा नये, ओके?''

''अर्थातच,'' ते दोघे बरीच वर्षे एकमेकांशी जे काही बोलले, ते सारे 'ऑफ द रेकॉर्ड'च होते. त्याची वाच्यता सँडबर्गने आपल्या लिखाणात केली नव्हती.

''जेसी हबर्ड यांचा मृत्यू आणि बॅकमन यांची कोर्टातील गुन्ह्याची कबुली यात आठ दिवसांचे अंतर होते. तसा हा वेळ फारच थोडा होता. माझ्यावर व किम बोलिंग यांच्यावरही एफ.बी.आय.ची नजर होती. त्यांनी आम्हा दोघांना २४ तास संरक्षण पुरवले होते, घरी, दारी, ऑफिसात व जिथे जाऊ तिथे आमच्या मागेपुढे

दुसरी आवृत्ती

करार एका ताऱ्याशी

कुसुमाग्रज

संपादन

वसंत सं. पाटील

किंमत : १२०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.

कुसुमाग्रजांची प्रस्तुत कविता
आकाशातील चिरंतन ज्योतींची उज्ज्वल गाथा आहे.
एकाच विराट तेजाचे हे भिन्न भिन्न आविष्कार.
यांतील सूर्य हा त्यांच्या काव्याकाशात मध्यवर्ती आहे.
सूर्यकल्पनेने त्यांचे मन झपाटलेले आहे.
हा सूर्य त्यांच्या काव्यात अत्यंत आशयघन प्रतीक बनला.
त्याचे उदयास्त हे त्यांच्या शब्दविश्वात
केवळ निसर्गघटना राहिले नाहीत,
तर मानवाच्या उत्थान-पतनाचे, आशा-निराशांचे द्योतक बनले.
कुसुमाग्रजांचा सारा भर दीप्तीवर आहे, उधाणावर आहे.
सूर्याचे अरुण-मंगल व प्रखर तेज,
चंद्राचे शीतल पारिजातकी चांदणे, तारकांची मंद आश्वासक
प्रभा, मौनातून बोलणाऱ्या आकाशाची शांतिप्रद
गहननीलता व नितळ निर्लेपता यांचे एकत्रित दर्शन
रसिकाला त्यांच्या काव्यातून घडते.

त्यांची माणसे असत. याचे कारण ते आमच्यावरही आरोप ठेवून आम्हाला तुरुंगात पाठवायची तयारी करीत होते. त्यामुळे तोपर्यंत आम्हाला संरक्षण देणे त्यांना भागच होते.'' मग परत त्याने व्होडकाचा एक घोट घेतला. आजूबाजूला नजर फिरवून विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांपैकी कुणी आपले संवाद ऐकतो आहे का ते पाहिले. पण त्या दोघांकडे कोणीच लक्ष देत नव्हते. तो पुढे सांगू लागला, ''आम्हाला काही धमक्या आल्या होत्या, ज्यांनी जेसी हबर्ड यांचा खून केला त्यांच्याकडून तशा काही गंभीर हालचाली आमच्याविरुद्ध चालू होत्या. बॅकमन यांना शिक्षा होऊन त्यांची रवानगी तुरुंगात झाल्यानंतर एका महिन्याने एफ.बी.आय.ने ते आम्हाला सांगितले. बॅकमनने सारे दोषारोप स्वतःकडे घेऊन ते कबूल केल्याने आम्ही दोघे म्हणजे मी व बोलिंग त्या खटल्यातून सुटलो. आता सारे वातावरण हळूहळू निवळू लागले. आम्हाला थोडेसे सुरक्षित वाटू लागले. एफ.बी.आय.ने आमची सुरक्षितता काढून घेतली. पण मी व बोलिंग साशंक होतो. आपल्यावर तरीही हल्ला होऊ शकेल या भीतीपोटी आम्ही खासगी सुरक्षा एजन्सीकडून भाड्याने सुरक्षारक्षक आम्हाभोवती ठेवले. दोन वर्षे अशी सुरक्षासेवा आम्ही त्यांच्याकडून घेत होतो. मला आता मागे वळून पाहता, तो सारा काळ अजूनही नीट आठवतो आहे. पण या सर्व गोष्टींचा मनस्ताप किम बोलिंग यांना झाला व शेवटी त्यांना वेड लागले.''

''त्या धमक्या तुम्हाला कोण देत होते?''

''जोएल बॅकमन यांचा शोध घेणारे जे कोणी होते, तेच ते लोक होते.''

''कोण?''

''बॅकमन व हबर्ड हे उपग्रह नियंत्रित करणारी ती डिस्क ज्यांना विकू पाहत होते ती सौदी अरेबियातील सौदी मंडळी. ते त्यासाठी अक्षरशः गाडीभर नव्हे, ट्रकभर नव्हे, तर आगगाडीभर नोटा द्यायला तयार होते. त्यांनी देऊ केलेली किंमत तर अफाट होती, आश्चर्याने तोंडात बोटे घालायला लावणारी होती. नवीन उपग्रहांची मालिका तयार करून ती अवकाशात सोडण्यासाठी जेवढा खर्च येईल, त्या खर्चापेक्षा थोडी कमी किंमत होती. पण शेवटी बोलणी फिसकटली, त्यामुळे हबर्डचा खून झाला. बॅकमन यांनी घाईघाईने आपल्यावरील आरोप कबूल करून ते तुरुंगात गेले खरे; पण सौदी मंडळींना हे प्रकरण इतके झटपट बंद होणे पसंत पडले नव्हते, ते दुखावलेले होते. तसेच इस्रायली मंडळींचेही झाले होते. त्यांनाही ती सॉफ्टवेअरची डिस्क अथवा सीडी हवी होती. तेही त्यासाठी सौदा

करायला तयार झाले होते. तेही नाराज होऊन गेले होते. शिवाय आपल्याला वगळून सौदी अरेबियाशी सौदेबाजीची बोलणी केली जावीत याची त्यांना चीड आली होती.'' इतके बोलून प्रॅट काही क्षण थांबला व पीत राहिला. जणू काही उरलेली कथा सांगण्यासाठी बळ यावे म्हणून तो पिऊ लागला होता. तो पुढे सांगू लागला, ''मग ज्यांनी उपग्रहाकडून हवी ती कामे करवून घेण्याची पद्धत तयार केली होती ते आता आले.''

''म्हणजे रशियन्स?''

''बहुधा ते नाहीत. जेसी हबर्डला आशियाई तरुणी आवडत. ते शेवटचे दिसले तेव्हा ते एका बारमधून बाहेर पडत होते. त्यांच्याबरोबर एक सुंदर व देखणी तरुणी होती. तिच्या तंगड्या लांब होत्या, सडपातळ होत्या, केस लांबसडक व काळे होते, चेहरा गोल होता. ती जगाच्या दूरवरच्या कोपऱ्यातून आली आहे हे तिच्याकडे पाहताच समजून येत होते. कम्युनिस्ट चीन अमेरिकेतून माहिती गोळा करण्यासाठी येथेच हजारो लोक वापरतो. त्यात येथले विद्यार्थी, व्यापारी, राजनीतीज्ञ वगैरे असंख्य लोक आहेत. या शहरात तर अशा चिनी हेरांचा जागोजागी सुळसुळाट झालेला आहे. शिवाय त्यांच्या हेरयंत्रणेकडे अत्यंत प्रभावीपणे कामे करणारे एजंटस आहेत. या अशा प्रकरणात ते हबर्ड व बॅकमन यांच्यामागे न कचरता लागतील.''

''म्हणजे यामागे नक्की कम्युनिस्ट चीन आहे?''

''तसे हमखास सांगता येत नाही. कदाचित ते रहस्य खुद्द बॅकमन यालाच ठाऊक असेल. पण त्याने ते अद्यापपर्यंत कोणालाही बोलून दाखवले नाही. फार काय सी.आय.ए.लासुद्धा अजून ते कळले नाही. त्यांना तर बेसावध असताना तडाखा मारला जावा, तसे झालेले होते. त्यातून अजूनही मेनार्ड सावरतो आहे.''

''आता टेडी मेनार्डचा खेळ चालू झाला तर, हो ना?''

''बरोबर. त्यांनी राष्ट्राध्यक्षांना एका ओळीत 'यात राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न गुंतला आहे' असे सांगितले असणार. मग ताबडतोब राष्ट्राध्यक्ष विरघळले. मेनार्डची माफीनाम्याची योजना तत्काळ मंजूर झाली. मग मेनार्डने बॅकमनला देशाबाहेर गुपचूप नेले व कुठेतरी ठेवले. यानंतर तो शांतपणे बॅकमनला मारायला कोण येते आहे हे पाहत असणार. खेळात मेनार्ड काहीच गमावणार नाही.''

''वाः, काय डोक्याने खेळी खेळली आहे.'' जेव्हा जोएल बॅकमनला मारेकरी भेटतील, तेव्हा ते कोण आहेत हे कोणालाच कळणार नाही. बॅकमन

कोठे आहे हे बाहेरच्या जगाला बिलकूल कळलेले नाही व कळणारही नाही. जेव्हा बॅकमनचे प्रेत सापडेल तेव्हा ते कोणाचे आहेसुद्धा समजणे शक्य नाही.''

''जर ते प्रेत सापडले तर!''

''अगदी बरोबर''

''आणि बॅकमनला याची कल्पना आहे?''

यावर प्रॅटने आपला दुसरा ग्लास पोटात रिचवला आणि आपल्या बाहीने तोंड पुसले. तो भुवया उंचावित म्हणाला, ''बॅकमन काही बावळट माणूस नाही. तो तुरुंगात गेल्यावर आम्हाला त्यांच्याविषयी बरेच काही समजले. तुरुंगात ते सहा वर्षे टिकून राहिले. कदाचित, आपण कशामधूनही वाचू, असे त्यांना वाटत असावे.''

लंडनमधील कॅनॉट हॉटेलपासून जवळच असलेल्या एका पबमध्ये, म्हणजे एका गुत्त्यामध्ये क्रिट्झ झटपट घुसला. एक हलकासा पाऊस पडत होता व आपण भिजू नये म्हणून त्याने त्या गुत्त्याचा आश्रय घेतला होता. त्याच्याबरोबर त्याची पत्नी लंडनला आली होती. पण आत्ता ती एका छोट्या फ्लॅटमध्ये थांबलेली होती. तो फ्लॅट क्रिट्झच्या नवीन मालकाने भाड्याने घेऊन त्याला राहायला दिला होता. त्यामुळे क्रिट्झला आता अनायसे एका गुत्त्यात, आपल्याला कोणीही ओळखत नाही अशा ठिकाणी चारचौघात बसून राजरोस मद्य पिण्याची संधी मिळाली होती. त्याला लंडनला येऊन एक आठवडा झाला होता आणि आणखी एका आठवड्याने त्याला परत अमेरिकेला जायचे होते. पुन्हा तो वॉशिंग्टनला परतणार होता. तिथे राहून तो एका कंपनीसाठी सरकारदरबारी प्रचार करणार होता, लॉबीईंग करणार होता, त्यांच्याविषयी अनुकूल मत बनवून त्या कंपनीला सरकारी कंत्राटे मिळवून देणार होता. ती कंपनी क्षेपणास्त्रे बनवीत होती.

संरक्षण खात्याच्या मते ती क्षेपणास्त्रे हलक्या दर्जाची होती. परंतु आजवर क्रिट्झसारख्या सहा लॉबीईस्टनी किंवा दलालांनी सरकारला ती क्षेपणास्त्रे विकत घेण्यास भाग पाडले होते.

त्या पबमध्ये, गुत्त्यामध्ये सिगारेट्सचा धूर खूप जमला होता. पण सुदैवाने क्रिट्झला एक रिकामा बूथ सापडला व तो त्यात जाऊन बसला. त्या बूथमधले अर्धवट दृश्य बाहेर दिसत होते. आपले मद्य मागवून क्रिट्झ आता आरामात बसला होता. कसलीही चिंता न करता मद्य पिण्यात किती मजा असते हे तो

अनुभवत होता. नाहीतर अमेरिकेत तो असे कुठे जाऊन पीत बसला असता तर नेमका कोणीतरी ओळखीचा माणूस पिताना टपकला असता व म्हणाला असता, ''ए, क्रिट्झ तुमचे ते मूर्ख राजकारणी बेर्मन व्हेटोबद्दल काय म्हणत आहेत?'' वगैरे वगैरे बाष्कळ बडबड करीत राहिला असता.

पण येथे तसे काहीही नव्हते. येथे सर्वत्र ब्रिटिश माणसे आत येत होती व बाहेर जात होती. तिथल्या धुराबद्दलही त्याची तक्रार नव्हती. आता तो एकटा होता, कोणीही त्याला ओळखत नव्हते आणि या त्याच्या खासगीपणाला कोणीही धक्का लावू शकत नव्हते. तो येथे अगदी एक निनावी माणूस म्हणून बसला होता.

पण त्याच्या या निनावीपणाचा भंग झाला. कुठूनतरी मागून एक बुटका माणूस उगवला. त्याने एक चुरगळलेली खलाशाची टोपी घातली होती. तो सरळ बूथमध्ये घुसून क्रिट्झच्या समोर बसला. क्रिट्झ एकदम दचकला.

''मिस्टर क्रिट्झ, मी येथे बसलो तर तुमची हरकत नाही ना?'' त्या खलाशाने हसत विचारले. हसताना त्याचे पिवळे दात क्रिट्झला दिसले. ते दात नंतर त्याच्या कायम लक्षात राहणार होते.

''हॅव ए सीट, बसा आपण. तुम्हाला काही नाव असेल ना?'' क्रिट्झ म्हणाला.

''बेन'' त्याने आपले नाव सांगितले. तो ब्रिटिश नव्हता आणि त्याची मातृभाषा इंग्लिश नाही हे त्याच्या उच्चारावरून सहज समजून येत होते. बेन तीस वर्षांचा होता. त्याचे केस काळे होते, डोळे गडद तपकिरी होते, नाक लांबलचक व टोकदार होते. त्यामुळे तो ग्रीक वंशाचा असावा असे भासत होते.

''तुम्हाला आडनाव नाही?'' क्रिट्झने ग्लासातील मद्याचा एक घोट घेत विचारले, ''अन् तुम्हाला माझे नाव अचूकपणे कसे काय कळले?''

''मला तुमच्याबद्दल सारे काही ठाऊक आहे.''

''मी एवढा प्रसिद्ध आहे याची मला कल्पना नव्हती.''

''मी 'प्रसिद्ध' हा शब्द वापरणार नाही, पण मी थोडक्यात काय ते तुम्हाला सांगतो. मी काही लोकांसाठी काम करतो. त्या लोकांना आत्ता तातडीने जोएल बॅकमन यांना शोधायचे आहे. ते लोक त्यासाठी पैसे मोजायला तयार आहेत. वाटल्यास रोख पैसेही ते देऊ शकतील. रोख रक्कम ही पेटीत दिली जाईल किंवा स्वित्झर्लंडमधील बँकेच्या खात्यात भरली जाईल. त्याची तुम्ही काळजीच करू

नका. अगदी काही तासांत हे सारे घडेल. बॅकमन कुठे आहेत ते तुम्ही नुसते सांगा की मग तुम्हाला दहा लाख डॉलर्स मिळतील. अन् हे या कानाचे त्या कानाला कळणार नाही, कधीही कोणाला कळणार नाही.''

''तुम्ही मला कसे शोधले ते सांगा.''

''मिस्टर क्रिट्झ, ते फार सोपे आहे. त्याबाबतीत असे समजा की आमचा हातखंडा आहे, आम्ही तशा गोष्टीत व्यावसायिक आहोत.''

''म्हणजे हेर आहात, हो ना?''

''ते महत्त्वाचे नाही. आम्ही जे कोणी आहोत ते आहोत. आणि आम्ही मिस्टर बॅकमन यांना शोधून काढणारच. फक्त प्रश्न असा आहे की यामध्ये तुम्हाला १० लाख मिळवायचे आहेत की नाहीत?''

''बॅकमन कुठे आहे ते मला ठाऊक नाही.''

''पण तुम्ही ती माहिती काढू शकता.''

''कदाचित''

''तुम्हाला यासाठी १० लाखाचा धंदा करायचा आहे की नाही?''

''छे! १० लाखांसाठी मुळीच नव्हे.''

''मग किती पाहिजे आहेत?''

''मला त्यावर विचार करावा लागेल.''

''मग तो विचार ताबडतोब करा.''

''अन् जर मला ती माहिती मिळाली नाही तर?''

''तर मग आम्ही तुम्हाला कधीच परत भेटणार नाही. मग आपली ही भेट झालीच नाही असे आपण समजू. अगदी सोपे आहे ते.''

यावर क्रिट्झने ग्लासातील मद्याचा एक मोठा घोट घेतला, आणि परिस्थितीवरती विचार केला. थोड्या वेळाने तो म्हणाला, ''ठीक आहे, मला ती माहिती मिळू शकेल असे आपण क्षणभर धरून चलू. पण मी फारसा याबद्दल आशावादी नाही. पण जर नशिबाने मला ती माहिती प्राप्त झाली, तर काय? नंतर काय करायचे?''

''नंतर लुफ्तांसा विमान कंपनीचे विमान डल्लास येथे पकडून ॲम्स्टरडॅम येथे जायचे, अर्थातच फर्स्ट क्लासमधून जायचे. मग तेथील बिडेनहॅम स्ट्रीटवरील ॲम्स्टेल हॉटेलमध्ये उतरायचे. आम्ही तुम्हाला तिथे गाठू, जसे आता तुम्हाला गाठले तसेच.''

क्रिट्झ क्षणभर गप्प बसला. त्या व्यक्तीने सांगितलेला सारा तपशील आठवून आपल्या स्मृतीत त्याने ठेवला. शेवटी त्याने विचारले, ''पण केव्हा?''

''शक्य तितक्या लवकर, मिस्टर क्रिट्झ. बॅकमनला आणखीही काही लोक शोधत आहेत, हे लक्षात घ्या.''

जेवढ्या वेगाने बेन प्रगट झाला होता तेवढ्याच वेगाने तो तिथून नाहीसा झाला. बाहेरच्या सिगारेटच्या धुक्यात तो नाहीसा झाला. जणू काही एक स्वप्न संपले होते. मग क्रिट्झ तिथून तासाभराने उठला व छत्रीमागे आपला चेहरा लपवत रस्त्याने चालू लागला. आपल्यावर कोणाची तरी नक्की नजर आहे, हे आता त्याला उमगले होते.

ज्यांची आपल्यावर नजर आहे ते आपल्यावर वॉशिंग्टनमध्येही नजर ठेवतील? तशी नजर त्यांनी ठेवली तर, या कल्पनेने तो अस्वस्थ झाला.

❖

टी बुक क्लब

या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!

चालू बुक क्लबचे सभासदत्व ₹ ५० भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणास त्यासंबंधीची माहिती कळवली जाते. ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.

या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!

₹१०० भरून उपलब्ध असलेली कोणतीही आठ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किमतीत मिळवा. सर्व पुस्तकांसाठी एकूण पोस्टेज ₹५०० राहील किंवा आठ पुस्तकांसाठी पोस्टेज ₹ १२५.

पुस्तक परिचय

गार्डिअन

कथा नव्हे; विज्ञानकथा

सुधा रिसबूड यांनी डीईई, एएमआयई (इलेक्ट्रॉनिक), एमआयई, पी.जी. डिप्लोमा (न्यायदर्शन), तसेच एमए (प्राचीन भारतीय इतिहास) ही पदव्युत्तर पदवी संपादन केली आहे. रिसबूड यांनी संरक्षण विभागात तांत्रिक अधिकारी म्हणून क्वालिटी ॲशुअरन्स इंजिनिअरिंगचे काम केले व स्वेच्छानिवृत्ती घेतली.

त्यांनी वैज्ञानिक कथा आणि वैज्ञानिक विषयावर २९ वर्षे सातत्याने मराठीतून लेखन केले आहे. आतापर्यंत त्यांची 'अंतरिक्षाचा वेध' (पुणे मराठी ग्रंथालयाचा 'स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार',२००६), 'कल्पित-अकल्पित' (महाराष्ट्र शासनाचा 'उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार', २००९), 'भास्कराचार्य ते गॉस गणिताचा ध्यास' (२०११), 'भारतीय स्त्री : एक मीमांसा' (पुणे मराठी ग्रंथालयाचा 'चेतना पुरस्कार', २०१३) आणि 'रिचर्ड फाईनमन : एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व' (२०१३) अशी पाच पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

त्यांनी शाळांमधून वैज्ञानिक विषयावर व्याख्याने दिली आहेत. तसेच मराठी विज्ञान परिषद व अन्य दिवाळी अंकांतही त्यांनी विज्ञानविषयक लेखन केले आहे.

लेखक

सुधा रिसबूड

'मना कल्पना कल्पिता कल्प कोटी' मनाची शक्ती अगाध असते. सृष्टीच्या रहस्याचे कुतूहल प्रथमत: मन असलेल्या मानवातच निर्माण झाले आणि ते जाणून घेण्याचे यत्न त्याने सुरू केले. त्या अनवरत प्रयत्नांमधूनच त्याला सृष्टीचे गूढउकलू लागले आणि तो विज्ञानाच्या अभ्यासाचा पाया होता. काळाच्या ओघात त्याने विज्ञानाचे शिल्प उभारायला सुरुवात केली. तसेच अनेक वैज्ञानिक विचार, पद्धती, कल्पना यातून भविष्याचा वेध घेण्यास सुरुवात केली.

अशाच काही अथांग वैज्ञानिक कल्पनांमधूनच ज्या कथा स्फुरल्या त्या या पुस्तकात दिल्या आहेत. त्यामधून केवळ वैज्ञानिक कल्पनांचा आनंद घ्यावा. शास्त्रीय ज्ञान ग्रहण करण्यासाठी शास्त्रीय संशोधनात्मक साहित्य असतेच. विज्ञानकथांचे हे विश्व पुष्कळसे भविष्यातील गूढ, अनाकलनीय आणि विस्मयकारी वैज्ञानिक कल्पनांचे जाळे निर्माण करते आणि त्यांचे खरे स्वरूप मात्र 'कळे आकळे रूप ते ज्ञान होता' अशी अवस्था आली की समजते. गगनाला गवसणी घालण्याची साहित्यिक ऊर्मी ही वैज्ञानिक कथांमधून अंशत: पूर्ण होते. वाचकांनाही त्याच भूमिकेतून या विज्ञानकथांचा निखळ आनंद मिळावा, एवढीच अपेक्षा!

उत्तरा

त्या छोट्याशा हॉलमध्ये, अत्यंत गंभीर वातावरणात सुनावणी चालू होती. न्यायाधीशांच्या प्रश्नांना उत्तरे देताना ऋद्धी अगदी व्याकूळ झाली होती. कुठल्याही क्षणी तिच्या डोळ्यांतून धारा लागतील अशी तिची अवस्था होती.

''पण मग पुढे काय झाले?''

''माझ्यावर त्या गुंडांनी हल्ला केला.''

''तू प्रतिकार नाही केलास?''

''केला, पण त्या चौघांपुढे माझे काय चालणार, मी जीवाच्या आकांताने ओरडले, कारण मला माहीत होते की, उत्तरा माझ्या थोडीशीच मागे होती. कारण कॉलेजमधून आम्ही दोघी बरोबरच निघालो होतो.''

''तू तिला नक्की काय सांगितलेस?''

सरकारी वकिलांनी प्रश्नांची सरबत्ती चालूच ठेवली होती.

''मला नीटसे आठवत नाही.''

''ते तुला आठवावेच लागेल, कारण हा प्रश्न उत्तरेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.''

''हां आठवते, मी तिला सांगितले की मला वाचव, या चौघांवर हल्ला कर.''

''तिने तुला पाहिले?''

''हो, मी तिच्याकडे पाहूनच ओरडले आणि त्या पुढचे मला काहीच आठवत नाही.''

ऋद्धी कळवळून सांगत होती.

न्यायाधीशांनी त्या दिवशीची सुनावणी बंद केली.

सुनावणी दुसऱ्या दिवशी होणार होती. पुढची उत्तरेची... शहरात तो एक चर्चेचा विषय बनला होता. सरकारी वकील कोर्ट संपल्यानंतर, न्यायमूर्तींच्याच खोलीत बसले होते.

''साहेब, उद्या तुमच्या परीक्षेचाच दिवस आहे!'' त्यांनी न्यायाधीशांना चाचपण्याचा प्रयत्न केला. तो न्यायाधीशांच्या केव्हाच लक्षात आला होता.

''प्रत्येक निकाल हा माझ्या दृष्टीने एक परीक्षाच असते बॅरिस्टरसाहेब!''

''पण मला वाटतं, तुम्हाला उत्तरेला शिक्षा सुनवावीच लागेल. She simply has broken the first law.''

न्यायमूर्तींनी सरकारी वकिलांचे बोलणे केवळ हसण्यावारी नेले.

दुसऱ्या दिवशी न्यायाधीशांच्या चेंबरमध्येच सुनावणी चालू झाली.

''ईश्वरसाक्ष खरे सांगेन खोटे सांगणार नाही.'' हे उत्तरेचे वाक्य ऐकून खुद्द न्यायाधीशांनाही, त्या गंभीर प्रसंगात हसू आले. ''खरे तर, उत्तरा, तुझ्यावर आरोप ठेवून नंतर तुला तुझी बाजू मांडण्याची संधी देण्याची गरजच नाही, हे ठाऊक आहे ना तुला?'' वकिलांनी विचारले.

''हो ठाऊक आहे.''

''पण तरीही ऋद्धी व तिच्या कुटुंबियांनी मागणी केली आणि न्यायाधीशांनीही. सद्सद्विवेकबुद्धिला स्मरून तुला मी ही संधी दिली आहे.''

''हो ठाऊक आहे आणि मी त्याबद्दल कृतज्ञ आहे.'' उत्तरेच्या स्वरातील शांतपणा ऐकून ऋद्धीही चमकली.

''उत्तरा, तुला ठाऊक आहे, First law काय आहे?''

''हो.''

''आम्हा सगळ्यांना तो तुझ्या तोंडून ऐकायचा आहे.''

''रोबोटने कधीही कुठल्याही माणसावर हल्ला करायचा नाही. तशीच वेळ आली तर स्वत:ला नष्ट करून टाकायचे.''

''मग हे ठाऊक असूनही, तू त्या चौघांवर जीवघेणा हल्ला केलास! आणि त्यानंतरही स्वत:ला नष्ट केले नाहीस. खरं सांग, तुला ऋद्धीने हल्ला करण्यास सांगितले का?''

''नाही.''

''पण ती तर म्हणते की तिनेच तुला आदेश दिला आणि तू फक्त तिचा आदेश पाळलास.''

''ती खोटे बोलत आहे.''

''उत्तरा, ती खोटे बोलत आहे, तर खरे काय ते तूच सांग.'' न्यायमूर्तींनी आता उत्तरेला खडसावले.

अत्यंत शांत वातावरणात उत्तरेचा स्वर ऐकू येऊ लागला होता.

''त्यांनी तिला जबरदस्तीने ओढून नेण्याचा प्रयत्न केला, ऋद्धी ओरडली. मला तिचा आवाज येताच, मी काही क्षणांत तेथे पोहोचले. ऋद्धीच्या तोंडावर, त्यांनी हात ठेवून तोंड बंद केले. पण...''

''पण काय?''

''ऋद्धीला माझ्या येण्याची चाहूल लागली होती. तिने केविलवाणेपणे माझ्याकडे पाहिले. तिच्या नजरेतील असाहाय्यता, माझ्या प्लॅटिनमच्या नर्व्हनी, माझ्या माझ्या प्लॅटिनम, ...मेंदूपर्यंत पोहोचवली. असे सिग्नल मी कधीही अनुभवले नव्हते. पण त्याच क्षणी, मला जाणीव झाली की, माझी बहीण ऋद्धी, ही संकटात आहे आणि तिला वाचवणे हे माझे कर्तव्य आहे. रोबोटिक्सच्या कुठल्याच नियमापेक्षा मला तिला वाचवणे महत्त्वाचे वाटले आणि मी त्या गुंडांवर हल्ला करून, ऋद्धीला वाचवले. माझ्या मेंदूतून मला अशी जाणीव झाली की ते गुंड माणसे नसून पशूसमान आहेत.''

सारे चेंबर त्या वेळी नि:शब्द झाले होते. ती शांतता भंगली ती सरकारी वकिलांच्या आवाजाने.

''मग काय, उत्तराने स्वत:च गुन्हा कबूल केला आहे. इतकेच नव्हे, तर तिन्ही नियम तिने धुडकावले, तेव्हा तिला शिक्षा ही झालीच पाहिजे. तिला डिस्मॅण्टल करावेच लागेल.''

निकालाची सुनावणी दुसऱ्या दिवशी होती. न भूतो न भविष्यति, अशा खटल्याचा निकाल काय लागतो, त्याबद्दल सारेच उत्सुक होते.

न्यायमूर्ती निकालपत्र वाचू लागले.

उत्तरा रोबोट आहे आणि रोबोटिक्सच्या साऱ्या नियमांचा भंग तिने केलेला आहे; पण तरीही न्यायालयाला मानवी मूल्यांचा विचार करणे महत्त्वाचे वाटते आणि त्या दृष्टीने पाहता, उत्तरेचे त्या प्रसंगातील वागणे, म्हणजे मानवी भावनांचा उत्स्फूर्त प्रतिसाद वाटतो. तिच्या वागण्यातून तिचा ऋद्धीबद्दलचा जिव्हाळा दिसून येतो. इतकेच नव्हे तर त्या गुंडाची वागणूक ही पशूसमान होती, हा साक्षात्कारही तिच्या वागण्यातून जाणवतो. यापुढे निकालपत्रात न्यायाधीशांनी असे म्हटले होते, की उत्तरा रोबोट असली तरी त्या परिस्थितीत ती मानवी वृत्तीने वागली म्हणून रोबोटिक्सचे नियम तिला लागू नाहीत. ज्या चार जणांवर तिने हल्ला केला ते चौघे जण माणसे नसून खरोखरीच पशू आहेत. त्यामुळे रोबोटिक्सच्या पहिल्या नियमाचे कुठलेही उल्लंघन तिने केले नाही.

त्यानंतर उत्तरेला डिस्मॅण्टल केलेले नाही; पण तिच्यात जागृत होणाऱ्या मानवीय भावनांचा अभ्यास करण्यासाठी तिला काही काळ निरीक्षणाखाली ठेवावे असे न्यायालयाने सांगितले आणि असाहाय्य मुलीवर हल्ला करण्यावरून

❖

दुसरी आवृत्ती

एनस्लेव्ड

राहिला गुप्ता

अनुवाद
सुनीति काणे



किंमत : ३००/-रु. पोस्टेज : ५०/-रु.

बहुतांशी आपल्या नजरेस पडत नसतील, पण आपणांसमवेतच हजारो गुलाम रहात आहेत. विल्बरफोर्सने गुलामगिरीला बंदी घालण्यासाठी दिलेल्या लढ्याला दोनशे वर्षे उलटली आहेत. राहिला गुप्ता यांनी आताच्या जगातले पाच गुलाम शोधून काढून, त्यांच्या कथा आपल्याला सांगाव्या म्हणून त्यांचं मन वळवलं. वेश्याव्यवसायासाठी फसवून, पळवून आणलेली विशीच्या आतली रशियातील मुलगी ते ट्रायाडच्या गुंडांच्या धास्तीत जगणारा चिनी माणूस, अशा सुटका करून घेऊ शकलेल्या नशीबवानांपैकी काहींना आपण भेटतो.

पुस्तक परिचय

'The Mughal High Noon' या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद

मुघल सत्तेचा सारिपाट

औरंगजेबाचे सत्तारोहण

डेहराडून येथील डून स्कूलमधून आणि नवी दिल्ली येथील सेंट स्टीफन्स कॉलेजमधून शिक्षण प्राप्त केलेल्या श्रीनिवास राव अडिगे यांनी भारतीय प्रशासकीय सेवा क्षेत्रात कार्य केले आहे. भारतीय इतिहासाचे एक उत्तम अभ्यासक असलेले श्री. अडिगे, आपल्या इतिहासकाळाबद्दलच्या आवडीची आणि आपल्या ललित लेखनकलेची उत्तम सांगड घालतात. श्री. अडिगे नवी दिल्ली येथे वास्तव्यास असतात.

'मुघल सत्तेचा सारिपाट' ही त्यांची पहिली कादंबरी आहे.



लेखक
श्रीनिवास राव अडिगे

अनुवाद
उदय भिडे

'सर्वस्व पणाला लाव,'
औरंगज़ेब स्वतःलाच म्हणाला.
'तू राजा होण्यासाठीच जन्माला आला आहेस,
आणि अविरत कष्ट करणे हीच राजेपद उपभोगण्याची किंमत असते.'

सतराव्या शतकाच्या मध्यकाळात बिघडलेल्या प्रकृतिस्वास्थ्यामुळे मृत्युशय्येवर पडलेल्या मुघल सम्राट शहाजहानची– दारा, शुजा, औरंगज़ेब आणि मुराद – ही चारही मुले सत्ता हस्तगत करण्यासाठी आपसात झुंजत आहेत.

शहाजहानवर अत्यंत कडक बंदोबस्तात उपचार चाललेले असल्यामुळे अफवांचे पीक भरमसाट वाढते. सम्राट जिवंत आहेत का? की त्यांच्या मृत्यूची बातमी हेतुपुरस्सरपणे गुप्त राखली जात आहे? साम्राज्यातल्या गुप्तहेरांनी आणि हस्तकांनी चुकीची माहिती आणि अर्धसत्य गोष्टी प्रसारित केल्यामुळे खरेतर भावा-भावांमधला तणाव वाढत चालला आहे. त्यामुळे कशाचीच खात्री देता येत नाही. अशा कारस्थानाने आणि लुच्चेगिरीने भरलेल्या राजमहालातील वातावरणात– आणि मुराद त्याच्या

अतिभोगलालसालुप्ततेसाठी, दारा त्याच्या अतिसंवेदनशीलतेसाठी, आणि शुजा त्याच्या आततायीपणासाठी कुप्रसिद्ध होत असताना– सम्राट म्हणून सत्तारोहण करण्यासाठी औरंगज़ेबाकरिता अत्यंत अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे असे वाटत आहे. परंतु औरंगज़ेबाची ही सत्तालालसाच त्याच्या ऱ्हासाला कारणीभूत तर ठरणार नाही ना? मुघल सत्तेचा सारिपाट ही कादंबरी सत्ताग्रहण, श्रद्धा आणि जीवनाचे सार-समाधान यासंबंधीच्या प्रश्नांचा लेखणीच्या लालित्यपूर्ण फटकाऱ्यांद्वारे धांडोळा घेते.

दिल्लीच्या दर्यागंज भागातल्या आपल्या महालात मीर नसरुल्लाह खान विचारमग्न अवस्थेत येरझाऱ्या घालत होते. एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्याचे दडपण त्यांच्या मनात दाटले होते.

शहेनशहांच्या दरबारातला तो एक पंचहजारी मनसबदार तर होताच, पण त्याचबरोबर शहेनशहांच्या सर्वांत धाकट्या मुलाचा, म्हणजे गुजरात परगण्याचा कारभार पाहाणाऱ्या राजपुत्र मुराद याचा सर्वोत्तम गुप्तहेर होता. राजधानीमध्ये पेव फुटलेल्या अफवांच्या गदारोळातून सावधपणे छडा लावून, शहेनशहांच्या प्रकृतीची खरी परिस्थिती आपल्याला तनख़्वाह देणाऱ्याला लगोलग सांगणे ही त्याच्यावर सोपवलेली सध्याची कामगिरी होती. शहेनशहांची भेट घेण्याबाबत युवराज दाराने फर्मावलेल्या पाबंदीमुळे आणि शहेनशहा साहेबांच्या प्रकृतीबद्दल त्याने मान्यता दिलेल्या स्वरूपाच्या आणि सौम्य स्वरूपाच्या बातम्याच त्याच्या इतर भावांच्या परगण्यांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी त्याने केलेल्या व्यवस्थेमुळे तर अफवांना जास्तच जोर चढला होता. राजपुत्र शुजा, राजपुत्र औरंगज़ेब आणि राजपुत्र मुराद यांच्या दिल्ली दरबारात असलेल्या अधिकृत प्रतिनिधींवर सख्त नजर ठेवली जात होती, त्यांना येणारी पत्रे गुप्तपणे उघडून वाचली जात होती, हे सर्व त्याला माहीत होते. त्यांची पत्रे घेऊन जाणाऱ्या जासुदांना दारा शुकोहच्या फिरत्या पथकातील लोक नेहमीच अडवत असत. त्यांच्यापैकी काही जणांना तर ठार मारण्यात आले होते. त्याला तनख़्वाह देणाऱ्याचा, खरी माहिती मिळवण्याचा हा मार्ग तर बंद होता. त्यामुळे बिनचूक माहिती मिळवण्याची भली मोठी जबाबदारी मीरच्या खांद्यावर होती. त्याच्या कामातल्या साध्याशा

दुसरी आवृत्ती

वीरप्पन

लेखक

सुनाद रघुराम

अनुवाद

डॉ. प्रमोद जोगळेकर



किंमत : ३५०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.

वीरप्पन...!

कर्नाटक व तामिळनाडू राज्यांत धुमाकूळ घालणारा भारतातला 'मोस्ट वॉन्टेड' क्रूर डाकू. आपल्या टोळीच्या मदतीने वीरप्पन निलगिरी पर्वतराजींमधील समृद्ध जंगलांतून करोडो रुपये किमतीचे चंदन चोरतो; शंभराहून अधिक हत्तींना क्रूरपणे ठार मारून हस्तिदंत मिळवतो; त्याला पकडण्यासाठी गेलेले विशेष कृतिदलातले पोलिस अधिकारी, वनअधिकारी, पोलिसांना मदत करणारे गावकरी, अशा शंभराहून अधिक लोकांची त्याने निर्घृण हत्या केलेली आहे. खंडणी वसूल करणारा, अपहरण करणारा, दहशतवाद निर्माण करणारा हा खुनी दरोडेखोर, तस्कर दोन राज्य सरकारांना आदेश देण्याइतका माजतो. इतकेच नव्हे, तर तामीळ दहशतवादी आणि नक्षलवादी संघटनांच्या संपर्कात आल्यावर अचानक त्याला आपण गोरगरिबांचा 'मसीहा' असल्याचा साक्षात्कार होतो आणि तो जगातल्या मोठमोठ्या क्रांतिकारकांचे दाखले देऊ लागतो!

चुकीमुळेदेखील मुरादला तख़्त गमवावे लागण्याची शक्यता होती, पण मीरला तर त्याचा जीवच गमवावा लागणार होता.

शहेनशहांना तपासण्यासाठी दोन दिवसांपूर्वी एका हिंदू वैद्याला गुपचूपपणे नेण्यात आले होते. त्यांच्या उपचारांमुळे शहेनशहांची प्रकृती सुधारत होती, आणि एका पंधरवड्यात ते पूर्णपणे बरे होण्याची अपेक्षा केली जात होती, या चंदाने (मीरने पैसे देऊन दाराच्या सेवेत ठेवलेल्या प्रतिहारीने) दुपारी आणलेल्या बातमीवर कितपत विश्वास ठेवायचा, याचा निर्णय त्याला घ्यायचा होता.

''तो माणूस हिंदूच होता, हे तू इतक्या खात्रीनं कसं काय सांगू शकतोस?'' मीरने त्या प्रतिहारीला तिसऱ्यांदा तोच प्रश्न विचारला.

''महाराजसाहेब, मी सांगितलं ना, तसे ते लखपती शेठ जवाहिरे राजपुत्र दारा यांना रत्ने-माणके पेश करण्यासाठी नेहमीच येत असतात.'' गालातल्या गालात हसत चंदा पुटपुटला.

''बरं मग?''

''राजपुत्रसाहेबांनी त्यांना एक निर्दोष पांढरा हिरा आणून दाखवायला सांगितला आणि त्याचबरोबर आपल्या ग्रंथालयात काम करणाऱ्या एका पंडिताची अचानक बिघडलेली प्रकृती तपासण्याच्या बहाण्याने शेठसाहेबांकडे वस्तीला राहून रुग्णांवर औषधोपचार करणाऱ्या एका वैद्यालादेखील बरोबर घेऊन यायला सांगितले. मग ते शेठ एका हिंदू माणसाला बरोबर घेऊन आले, त्या माणसाचा वेष आणि त्याने कपाळावर लावलेला टिळा वगैरेमुळे तो हिंदू होता हे स्पष्ट होतं.''

''त्या वैद्याचं नाव काय आहे?''

''मला अचानक दुसरीकडे बोलावण्यात आलं, त्यामुळे त्याचं नाव काही मला ऐकू आलं नाही. पण नंतर जेव्हा मी जाळीच्या पडद्यामागून जात होतो तेव्हा हकीमसाहेबांच्या औषधानं काही गुण येत नाही, तेव्हा तुम्ही एकदा शहेनशहांना तपासा आणि योग्य ते उपचार सुचवा, असं राजपुत्र दारा त्या वैद्यांना सांगताना आणि वैद्यबुवांनी ते मान्य करताना मी ऐकलं.''

''ते वैद्यबुवा कसे दिसतात ते मला नीट सांग.''

''ते तसे बुटकेसेच आहेत. महाराजसाहेबांच्या फारतर खांद्याएवढेच ते उंच असतील. पांढरे केस, तीक्ष्ण डोळे, स्वच्छ पांढरे धोतर आणि पायात लाकडी

खडावा घालणारे, फारसी भाषा बऱ्यापैकी बोलणारे, पण त्यांच्या त्या बोलण्याला वेगळ्याच कुठल्यातरी प्रदेशातला लहेज़ा असलेले, असे आहेत.''

''मग नंतर काय झालं?''

''किल्ल्याच्या आतल्या भागातच असलेल्या राजपुत्र दारा यांच्या दालनामध्ये जहाँआरा बेगम आल्या. त्यांनी येताना एक जास्तीचा बुरखा आणला होता. त्यांनी त्या वैद्याला तो बुरखा घालायला लावला आणि त्याला कमी वर्दळीच्या मार्गिकांमधून शहेनशह साहेबांच्या शयनगृहापर्यंत घेऊन जायचं, असं ते आपसात काहीतरी बोलत होते.''

''त्यांनी त्यांच्या खडावा पण घातल्या होत्या का?''

''नाही, महाराजसाहेब. त्यांनी त्यांच्या खडावा आमच्या राजपुत्रसाहेबांच्या कक्षामध्येच काढून ठेवल्या होत्या. मी एकटाच तिथे होतो, म्हणून मी त्या पायात अडकवायचा प्रयत्न केला. पण त्या खूपच लहान होत्या आणि त्रासदायक वाटत होत्या.'' प्रतिहारी खिदळला.

प्रतिहारीच्या लाडिक बोलण्याचा मीरसाहेबांना उबग यायला लागला होता. तरीही आणखी माहिती मिळवण्यासाठी त्यांनी संभाषण पुढे चालू ठेवलं. कारण फार मोठ्या गोष्टी पणाला लागल्या होत्या.

''त्यानंतर काय झालं?''

''साधारण अर्ध्या कलाकानंतर आमचे राजपुत्र दारा आणि तो वैद्य, राजपुत्रांच्या कक्षात परत आले. आमच्या बेगमसाहिबा शहेनशहांजवळच थांबल्या. त्या वैद्यानं त्यानंतर बुरखा काढला आणि आमच्या राजपुत्र दारासाहेबांनी तो जवळच असलेल्या एका पेटीत ठेवला.''

''त्या वेळी तू कुठे होतास?''

''मी त्या वेळी जाळीच्या पडद्यापलीकडे झाडांना पाणी घालत होतो, महाराजसाहेब.''

''सगळा वेळ तू जाळीच्या पडद्याआडच घालवलास का?''

''आमच्यासारखे मामुली नौकर लोक जर अशा जागी नसते तर यासारख्या मौल्यवान ख़बरी तुमच्यासारख्या महाराजसाहेबांना कोणी पुरवल्या असत्या?''

''हं ऽऽऽऽऽऽऽऽऽ ..... मग पुढे काय घडलं?''

''वैद्यजी जेव्हा पुन्हा त्यांच्या नेहमीच्या वेषात दिसायला लागले तेव्हा दारा महाराजांच्या ग्रंथालयात काम करणाऱ्या एका पंडिताला त्याची प्रकृती

तपासण्याच्या बहाण्यानं तिथे आणण्यात आलं. पण वैद्यबुवांच्या तेथील उपस्थितीचं ते तर वरवरचं कारण होतं, कारण त्या पंडिताला अगदी माफकसा पित्ताचा त्रास होत होता. मग त्या वैद्यानं काही औषधं घ्यायला सांगितल्यानंतर, त्याला तेथून किल्ल्याबाहेर नेलं गेलं.''

''म्हणजे ते वैद्य प्रत्यक्षात शहेनशहांच्या कक्षात प्रवेश करताना किंवा त्यांना औषधं देत असताना तू स्वतः पाहिलं नाहीस तर?''

''नाही महाराजसाहेब. किल्ला परिसरातल्या महाराज दारा यांच्या दालनातच सेवा पुरवण्याच्या मर्यादा मला पाळाव्याच लागतात.''

''मग त्या वैद्याच्या उपचारांमुळे शहेनशहांची तबियत सुधारायला लागली आहे, असं कशाच्या आधारे तू म्हणतोस?''

''मी फक्त दोन आणि दोन यांची बेरीज करतोय. एका वैद्याला आमचे युवराज दारा आणि बेगम जहाँआरा यांच्याकडे आणलं जातं. तो वैद्य, शहेनशहासाहेबांना तपासायचं कबूल करतो. आमचे युवराज आणि बेगमसाहिबा त्यांना शहेनशहांच्या कमऱ्यात घेऊन जाणार आहोत, असं म्हणतात. मग एक जास्तीचा बुरखा आणण्यात येतो. मग ते अर्ध्या कलाकासाठी जातात, तेव्हा ते आपल्या खडावा मागेच ठेवतात. कालपासून शहेनशहासाहेबांची तबियत सुधारायला लागली आहे, असं समजतं. या सगळ्याचा तोच अर्थ निघतो ना!''

''हं ऽऽऽऽऽऽऽ ..... हे तू आणखी कोणाला सांगितलं आहेस का?''

''नाही, महाराजसाहेब. मी थेट तुमच्याकडेच आलो.''

''ते तू फार चांगलं केलंस.''

त्याच्या अंगावर फेकलेली थैली पट्कन झेलून प्रतिहारीने ती उघडली, त्यात भरलेल्या सोन्याच्या मोहोरांकडे समाधानाने पाहिले आणि मग मान वर करून पुन्हा मीरकडे पाहिले.

''याबद्दल कुणाशीही काहीही बोलायचं नाही, कळलं? यातला एक शब्द जरी बाहेर कुठे कळला, तर तू नरकात गेलास तरी मी तुझा पाठलाग करत येईन. आधीच तुला एक गोष्ट नाही आहे .. ..'' असं म्हणताना मीरने प्रतिहारीच्या कमरेखाली कटाक्ष टाकला आणि म्हणाला, ''तेव्हा काळजी घे, नाहीतर तुला तुझी मानही गमवावी लागेल.''

काही न बोलता मुजरा करून प्रतिहारी निघून गेला. प्रतिहारीने दिलेल्या बातमीवर मीर विचार करत राहिला. खरी असेल का ती? शहेनशहांची तबियत

चौथी आवृत्ती

भोगले जे दुःख त्याला...

लेखक

आशा आपराद



किंमत : २५०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.

माझ्या जन्मापासून नाही तर माझ्या जन्माअगोदरही माझ्या अस्तित्वावर नकारात्मक शब्दांचे आसूड ओढले गेले. पांढऱ्या पायाची, अपशकुनी, काळी, कुरूप, काळ्या जिभेची अशी कितीतरी अभद्र लेबलं मला लावली गेली. अनेक घटनांना, परिस्थितीला मलाच जबाबदार धरून माझा छळ केला. जन्मदात्री आई असूनही माझ्या आसवांनी तिचं हृदय कधीही हेलावलं नाही. माझी प्रत्येक आशा, आकांक्षा, भावना, हक्क, अधिकार आपल्या टाचेखाली ती तुडवत आली. माझं अख्खं आयुष्य जणू तिनं आपल्यासाठी एक वस्तू मानली.

केवळ एक वस्तू, जी गहाण ठेवून त्यावर कर्ज काढता येतं. स्वत:साठी, स्वत:च्या गरजपूर्तीसाठी. मानं माझं आयुष्य आपल्याकडं गहाण ठेवलं. मला माझ्या गुलामीची प्रखरतेनं जाणीव झाली. यातून आपण सुटायला हवं, नव्हे सुटका करून घ्यायला हवी. 'घाबरू नकोस. कितीही वादळ होऊ दे, विझू देऊ नकोस त्या आशेच्या पणतीला. आत्ता हरलीस तर मग पुढं कधीच नाही. कधीही नाही.' मी स्वत:ला पुनःपुन्हा बजावत होते. स्वत:च स्वत:ला धीर देत होते.

खरोखरच सुधारायला लागली असेल का? आज सकाळी शाही गवाक्षामध्ये येऊन जनतेला दर्शन देणारी व्यक्ती म्हणजे खरोखरच स्वतः शहेनशहा होते की अनेक लोक म्हणत होते त्याप्रमाणे, दाराने कोणा दुसऱ्यालाच शहेनशहा बनवून उभे केले होते? जिथे साम्राज्यातले अतिशय प्रसिद्ध हकीम अपयशी ठरत होते तिथे एका वैद्याला यश मिळणे शक्य होते का? जगातल्या सगळ्यात अभेद्य अशी सुरक्षा व्यवस्था असलेल्या लाल किल्ल्यातील कक्षामध्ये एक काफीर करू शकेल का? या प्रश्नांच्या उत्तरांनी संपूर्ण साम्राज्याची पाळेमुळेच हादरून जातील! पहिल्या अपत्याला वारसाहक्क मिळावा या कायद्याच्या पालनापेक्षा मुघलांमध्ये त्याचा भंग करण्याचीच परंपरा पाळली जात होती, हे सगळ्या जगाला माहीत होते. तख़्त – या – तख़्ता (राजसिंहासन तरी, नाहीतर फाशीसाठी उभे राहण्याची फळी तरी) हाच इथला शिरस्ता होता. शहेनशहासाहेब खरोखरच पैगंबरवासी झाले असतील, तर ही बातमी ताबडतोब कळवण्यामुळे युवराज मुराद यांना निधी जमा करणे, सैन्य एकजूट करणे आणि दिल्लीवर हल्लाबोल करण्यासाठी अतिशय मोलाचा ठरणारा वेळ मिळेल. तसे नसेल, आणि शहेनशहांची प्रकृती सुधारत असेल, तर असे काही करणे म्हणजे बगावत ठरेल आणि त्याचे परिणाम महाभयंकर असतील. त्यामुळे मुरादला कळवण्यासाठी गुप्त खलिता तयार करण्याआधी, मीरला सगळ्या घटनांचे व माहितीचे काळजीपूर्वक, वास्तववादी विश्लेषण करणे आवश्यक होते. एखादा जरी चुकीचा शब्द गेला तरी दिल्लीच्या गल्लोगल्ली दबा धरून असलेले मुरादचे पेशेवर मारेकरी, राजपुत्राची दिशाभूल केली म्हणून मीरचा जीव घ्यायला तयारच होते. मुघलांच्या जगात दुसरी संधी नावाची गोष्टच अस्तित्वात नव्हती.

कोणताही धोका पत्करायचा नाही असे म्हणत, त्या वैद्याच्या खरेपणाविषयी स्वतःच छानबीन करायची, असे त्याने ठरवले.

मग उजाडण्यापूर्वीच मीर थोडे वेषांतर करून घराबाहेर पडला. आपल्या नेहमीच्या कपड्यांना झाकेल असा एखाद्या सर्वसामान्य मुघल सैनिकाचा असावा तसला अंगरखा त्याने घातला होता आणि त्यावरदेखील खांद्यावरून एक शाल लपेटून घेतली होती. जामा मशिदीच्या मुख्य बाजूला बगल देत देत, सरतेशेवटी तो अश्रफी बाजारातल्या जवाहिऱ्यांच्या भागात पोहोचला.

लखपती शेठच्या हवेलीकडे जाणाऱ्या चिंचोळ्या गल्लीत मीर शिरला, तेव्हा त्याला काही वयस्कर आणि आजारी माणसांच्या घोळक्याला, रस्त्यावर

उघडणाऱ्या एका दारातून आत-बाहेर नेले-आणले जात असल्याचे दिसले. दाराजवळ जाऊन डोकावून पाहिल्यावर त्याला असे दिसले की पलीकडे अंगण होते आणि त्या अंगणात, एका पांढऱ्याशुभ्र केसांच्या लहानखुऱ्या माणसाकडून औषधोपचार मिळण्यासाठी आपल्याला कधी बोलावले जाईल याची वाट पाहत अनेक माणसे बसलेली दिसली. अंगणाभोवती रिंगणासारख्या असलेल्या सज्जामधल्या एका खांबामागे कुणाचेही लक्ष वेधले जाणार नाही याची काळजी घेत तो उभा राहिला, आणि आपल्याकडे आलेल्या रुग्णांबरोबर तो वैद्य कसा वागतो–बोलतो याचे बराच वेळ निरीक्षण करता करता त्याच्या आजूबाजूच्या लोकांमध्ये चाललेल्या संभाषणांकडेही कान देत राहिला.

''तुला काय होतंय? तुमचे हकीम लोक तुला बरं करू शकत नाहीत का?''

अचानक प्रश्न आलेल्या उजव्या बाजूकडे मीरने मान वळवली. त्याला सज्जातल्या फरशीवर एक मळकट धोतर नेसलेला, वयोवृद्ध, शुष्क कातडी आणि गाठाळ हाता-पायांचा माणूस, एक मजबूत काठी हातात धरून बसलेला दिसला.

''मला काही झालेलं नाही,'' शाल ओढल्यामुळे चेहरा स्पष्ट दिसत नसलेल्या नसरुल्लाने दबल्या आवाजातच उत्तर दिले आणि पुढे म्हणाला, ''एका रावतसिंह नावाच्या इसमाला शोधत मी इथे आलोय. बाल्खच्या मोहिमेत आम्ही एकत्र होतो, आणि या वैद्यांना भेटून हिवतापावर औषध घेण्यासाठी आज सकाळी इथे येणार असल्याचा निरोप त्यानं मला पाठवला होता. इतक्या वर्षांनंतर त्याला भेटता येत असेल, तर ही चांगली संधी आहे असं मला वाटलं म्हणून मी इथं आलोय.''

''आत्ताचा तासाभराचा वेळ वैद्यजींनी गोरगरिबांसाठी राखून ठेवलेला असतो,'' म्हातारा म्हणाला, ''एकंदरीत पाहता, तुम्ही काही गरीब दिसत नाही आणि हा जो कोणी रावतसिंह आहे, तो तुमचा मित्र आहे म्हणता, म्हणजे तोदेखील गरीब नसेलच, कारण सारख्या चालीढालीच्या माणसांमध्येच मैत्री होत असते. अर्थात, त्याचे दिवस फिरलेले असू शकतात. नाहीतरी भविष्यात काय वाढून ठेवलंय कोण सांगू शकतो? कालचा राजपुत्र आज भुकेकंगाल झालेला असू शकतो.''

''तुमचं म्हणणं अगदी बरोबर आहे, ताऊ.''

जेवढे आवश्यक होते, तेवढे पाहून झाले होते. मग सज्जातल्या गर्दीतून नसरुल्लाह अलगदपणे दूर झाला. एका फारशा वर्दळ नसलेल्या गल्लीत पोहोचल्यावर, त्याने सामान्य सैनिकाचा डगला काढला, शाल काढली आणि आपल्या घराकडे परतला. मग हलकेसे जेवण घेतल्यावर, आपल्याला कोणीही त्रास देऊ नये अशी सेवकांना सूचना देऊन त्याने आपले कलमदान घेतले आणि आपल्या बारीकशा, हडकुळ्या हातांनी मुरादला पाठवायचा खलिता लिहायला घेतला.

राजेसाहेब,

शहेनशहांची तबियत बिघडली त्या दिवसापासून मी त्यांच्या प्रकृतीविषयी आपणास ख़बर पाठवत राहिलो आहे. हररोज अधिकच कडक होत चाललेल्या मुघल साम्राज्याच्या गस्ती पथकांच्या नजरा चुकवून, मी वेळोवेळी ख़बर घेऊन पाठवलेले किती हस्तक अहमदाबादला तुमच्यापर्यंत पोहोचू शकले आहेत याची मला खात्री देता येत नाही.

माझ्या यापूर्वी आपणांस पाठवलेल्या खलित्यांद्वारा शहेनशहांच्या अत्यंत विश्वासातल्या गोटातल्या लोकांकडून मिळवलेल्या संशयातीतरीत्या खऱ्या माहितीच्या आधारे, अगदी हाताच्या बोटांवर मोजता येतील इतक्या मोजक्याच लोकांव्यतिरिक्त बाकी सर्वांना शहेनशहांना व्यक्तिशः भेटण्यास मज्जाव करण्यात आला असला, आणि परगण्यांच्या राज्यकर्त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींवर कडी नजर ठेवली जात असली, तरीदेखील- आणि अधिकृत माहितीपत्रकांमधून प्रत्यक्ष परिस्थितीशी विपरीत अशी कोणत्याही स्वरूपाची बातमी प्रसारित केली जात असली तरी, शहेनशहांची तबियत हळूहळू जास्तच ख़राब होत चालली असल्याचे मी आपल्याला कळवले होते. शहेनशहासाहेब पैगंबरवासी झाले असल्याच्या अफवांना ऊत आला होता आणि त्यामुळे बाजारात प्रचंड खळबळ माजली होती; दुकाने बंद केली गेली होती; इतकेच नाही, तर काही प्रमाणात लुटालूटही झाली होती, हे खरेच आहे.

आता, एका अत्यंत विश्वासू खबऱ्याद्वारा मला असे समजले आहे की तीन दिवसांपूर्वी, राजपुत्र दारा आणि जहाँआरा बेगम यांच्या पुढाकारानुसार सध्या दिल्लीमध्ये राहत असलेल्या एका हिंदू वैद्याकरवी प्रत्यक्ष

शहेनशहांच्या तब्येतीची तपासणी करण्यात आली आणि त्यांच्या औषधोपचारांमुळे शहेनशहांची तबियत वेगाने सुधारत आहे. युवराज दारा यांनी, शहेनशहांसारख्या दिसणाऱ्या दुसऱ्याच कुणा माणसाला शहेनशहां म्हणून लोकांसमोर उभे केले होते, असे म्हणणारे शंकेखोर लोक काहीही म्हणत असले तरी, काल सकाळी शाही गवाक्षामध्ये उभे राहून जनतेला प्रत्यक्ष शहेनशहांनीच दर्शन दिले, असेच म्हटले जात आहे.

माझे स्वतःचे निरीक्षण असे आहे की, ज्यांना बुरखा घालायला लावून गुपचूपपणे शहेनशहांच्या कक्षात नेण्यात आले होते त्या वैद्याच्या उपचारांनी, शहेनशहांची तबियत खरोखरच सुधारत आहे. आणि काल सकाळी शाही गवाक्षात उभी राहिलेली व्यक्ती म्हणजे दुसरी कुणी नसून, स्वतः शहेनशहाच होते. ज्या उपचारकौशल्याबद्दल त्या वैद्यबुवांची ख्याती आहे, त्याची खातरजमा करण्यासाठी मी स्वतः जातीने ते रुग्णांवर कसे उपचार करतात त्याची पाहणी केली आहे.

चणीने अगदी बुटक्या, पांढऱ्याशुभ्र केसांच्या व तीक्ष्ण डोळ्यांच्या या वैद्याकडे पाहताक्षणी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून जो आत्मविश्वास आणि अधिकार आपल्याला जाणवतो, तसा मी फारच थोड्या लोकांमध्ये पाहिला आहे. रोगनिदानकलेमध्ये ते अत्यंत पारंगत आहेत अणि ते रुग्णाची अगदी सफाईदारपणे आणि संपूर्ण तपासणी करतात. आज सकाळी त्यांच्याकडे उपचार करून घ्यायला आलेल्या बहुतेक सर्वच रुग्णांनी त्यांचे रोगनिदान कधीच चुकत नाही आणि त्यांच्या उपचारांनी हमखास गुण येतो, असेच सांगितले. आणि याची खातरजमा मी इतर सूत्रांकडूनदेखील करून घेतली आहे.

शहेनशहांची तबियत पुन्हा खालावते आहे असं काही समजलं, तर तसा संदेश मी आपल्याकडे तुरंत पाठवीनच.

आपला अत्यंत आज्ञाधारक असलेला

आणि तसाच राहू इच्छिणारा सेवक

दस्तख़त करून शाई सुकण्यासाठी त्यावर थोडी वाळू शिंपडल्यावर, त्याने त्या खलित्याची पुंगळी करून शेळीच्या आतड्यापासून बनवलेल्या एका नळीमध्ये घातली. मग त्या नळीचे तोंड मेणाने बंद केले आणि त्यावर आपल्या

अंगठीची मुद्रा उमटवली. यामुळे, त्याच्या संदेशवाहकाला जर कुठे कोंडीत पकडले गेले असते तर त्याला ती नळी सरळ सरळ गिळून टाकता आली असती. त्यामुळे फार तर त्याला काही काळ अपचनाचा त्रास झाला असता. ❖

आवाहन

पुस्तक वाचताना वाचक त्या पुस्तकाशी एकरूप झालेला असतो. काही वेळेला तर तुमच्या जीवनाला कलाटणी देण्याचं सामर्थ्य एखाद्या पुस्तकामध्ये असतं. आम्ही नेहमीच वाचकांना दर्जेदार पुस्तकं वाचण्याचा आनंद दिला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसचं असंच एखादं तुम्हाला आवडलेलं, भावलेलं पुस्तक असेल तर त्या पुस्तकाबद्दलचा अभिप्राय आम्हाला साधारण ५०० ते ८००शब्दांत लिहून कळवा. अभिप्रायाबरोबर आपला संपूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर देण्यास विसरू नये. ते पुस्तक आपल्याला का आवडलं ते लिहायचं आहे. आपल्या अभिप्रायाचं स्वागत असेल. यासाठी मानधनही दिलं जाईल. अभिप्राय छापण्याबाबतचा अधिकार संपादकांच्या अधीन राहील. त्या संबंधात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही आणि अस्वीकृत अभिप्राय परत पाठवला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच या संदर्भात दूरध्वनी-वरून कोणीही संपर्क साधू नये. आपला अभिप्राय आमच्या या ई-मेलवर mmgj@mehtapublishinghouse.com किंवा खालील पत्त्यावर पोस्टाने/कुरियरने पाठवावा.

मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोन भवन समोर, पुणे ३०.

दुसरी आवृत्ती

द्वंद्व

लेखक

विजयदान देथा

अनुवाद

वनिता सावंत



किंमत : २२०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.

लक्खू मान हलवून म्हणाली,
'नाही, बेटी, असं नसतं, पण आपल्याला असंच काही वाटतं. फरक नसला, तरी प्रत्येक रामायणात फरक दिसून येतो. दुनियेतील तमाम स्त्रियांचं फक्त एकच रामायण आहे– पुरुषांच्या हातून फसवलं जाणं आणि त्या फसवणुकीचा आयुष्यभर परिणाम भोगणं. कोणतीही स्त्री या रामायणापासून अस्पर्श नाही. परंतु संसाराच्या भ्रमपाशात ही गोष्ट नीट ध्यानात येत नाही.'
– काकपंथ

स्त्री-पुरुष नात्यातील गुंतागुंत, लोभ-लालसा,
ईर्ष्या, असूया उघड करून दाखवणाऱ्या या
राजस्थानी लोककथा पारंपरिक कल्पनांचा
बुरखा फाडतात. गूढ वातावरण आणि
कल्पनाशक्तीचा उपयोग केला असला,
तरी या अस्सल कथांत प्रखर वास्तवाचे
दर्शन घडवण्याचे सामर्थ्य आहे.

पुस्तक परिचय

रेड टेप

लाल फितीची मजबूत प्रशासकीय चौकट भेदू पाहणाऱ्या
झुंजार अधिकाऱ्याची संघर्षगाथा...

दोन दशकांहून अधिक काळापासून अभिजित कुलकर्णी हे पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. नाशिक, उत्तर महाराष्ट्र आणि मुंबई हे कार्यक्षेत्र असलेल्या अभिजित यांना मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक अशा दोन्ही माध्यमांचा अनुभव आहे. २००६ ते २००८ या कालावधीत मंत्रालयात राज्य सरकारच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात सहायक संचालकपदावर काम करताना त्यांनी राजपत्रित अधिकारी या नात्याने प्रशासकीय कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभवही घेतला आहे. त्यानंतर पुन्हा ते पत्रकारितेत सक्रिय असून, राजकारण आणि प्रशासन हे त्यांच्या आवडीचे व अभ्यासाचे विषय आहेत. या वाटचालीतील भल्याबुऱ्या अनुभवांच्या आधारावर प्रस्तुत कादंबरी बेतली आहे.



लेखक

अभिजित कुलकर्णी

'करप्शन' म्हणजे करपलेल्या व्यवस्थेचे अपत्य! सरकार निर्णय घेते व प्रशासन त्याची अंमलबजावणी करते. या प्रक्रियेत निर्णयाचे लाभार्थी, विरोधक, पत्रकार, अन्य दबावगट, ठेकेदार, दलाल आणि प्रसंगी माफिया अशा हितसंबंधीयांची गुंतागुंत त्यावर प्रभाव टाकत असते. त्यातून एक 'व्हिशिअस सर्कल' आकार घेते, जे स्वत:च्या फायद्यासाठी जनतेचा पैसा, हक्क, न्याय हे सारे गिळंकृत करून टाकते; पण ज्या अधिकारांमुळे आपण हे सर्व करू शकतो ते अधिकार आपल्याला फक्त जनतेचे विश्वस्त या नात्याने प्राप्त झाल्याचे भान बाळगत एखादा प्रामाणिक अधिकारी जेव्हा हा चक्रव्यूह भेदण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा त्याच्यापुढे किती आव्हाने उभी ठाकतात, काय काय प्रसंग गुदरतात, कोणकोणत्या अग्निदिव्यांतून त्याला जावे लागते त्याचा हा पट. लाल फीतशाही अर्थात रेड टेपिझममध्ये बंदिस्त असलेली मजबूत प्रशासकीय चौकट भेदू पाहणाऱ्या एका झुंजार अधिकाऱ्याची उत्कंठावर्धक संघर्षगाथा.

पाचच मिनिटात तो वर उपमुख्यमंत्री बाजीराव झगडे यांच्या कार्यालयात जाऊन पोहोचला. पाणीपुरवठा विभागाचे सचिव, जीएडी गृह विभागाचे सचिव, सेक्रेटरी बाहेर वेटिंगमध्ये असल्याचं त्याला दिसलं. आपले सीनिअर्स इथे अगोदरपासून ताटकळत असल्याचं पाहून बराच वेळ वाट पाहावी लागणार असा विचार त्याच्या मनात आला. तोपर्यंत महेश या मंडळींसमोर पोहोचला. त्यांना गुडमॉर्निंग करून डीसीएम पीआरओंकडे आपलं कार्ड दिलं. पाणीपुरवठा विभागाचे सचिव जयदत्त ठाकरे महेशला चांगलं ओळखत होते. अचानक त्याला तिथं आलेला पाहून गेल्या दोन दिवसांतील घटनांचा पट क्षणार्धात त्यांच्या डोळ्यांपुढून सरकला आणि आवाजाची पट्टी खालची ठेवतच त्यांनी महेशच्या गुड मॉर्निंगला रिप्लाय दिला. शेजारी बसलेल्या गृहसचिवांनी मात्र जरा चेष्टेच्या सुरात अशा डॅशिंग ऑफिसर्सची खरी गरज मंत्रालयात असल्याची कॉमेन्ट केली. त्यावर काही न बोलता फक्त स्मितहास्य करणं महेशने पसंत केलं. परत ठाकरेंनी विचारलं, ''इकडे काय विशेष?''

''तसं फार काही नाही.'' महेशने कामापुरतंच उत्तर दिलं.

''हं, सध्या काय तुम्ही टॉक ऑफ द टाउन आहात!''

''सर, तुमच्यासारख्या ज्येष्ठांना असे किती तरी अनुभव असणार,'' असं म्हणून महेश विषय आवरता घेत असतानाच शिपाई आला व महेशकडे पाहून तुम्हाला साहेबांनी बोलावल्याची वर्दी दिली. लगेच ठाकरे म्हणाले, ''बघा, मी म्हटलं ना, आता आम्ही इथं अगोदरपासून वेटिंगला आहोत, पण आल्याबरोबर तुम्हाला डायरेक्ट एन्ट्री!''

''तसं नाही सर, कालच आमचं भेटायचं ठरलं होतं.''

''महाशय, आमची मीटिंग तर गेल्याच आठवड्यात ठरलीये, पण आम्ही काय हुकमाचे ताबेदार आणि तुम्ही...''

विषय आणखी वाढायला नको म्हणून महेश सरळ म्हणाला, ''सर, मला आता जायला हवं.''

''ओ... येस... शुअर...शुअर...''

दालनाच्या दारावर टक्‌टक् करून महेशने अर्धवट दरवाजा उघडला. त्याला पाहताच डीसीएम झगडेंनी मानेने खूण करून आत यायला सांगितलं. डीसीएमच्या बाजूला त्यांचा पुतण्या पवन बसलेला होता. पीएला एक-दोन सूचना देऊन झगडेंनी त्याला जायला सांगितलं आणि महेशकडे वळून विषयाला सुरुवात केली, ''या, आणलीत

फाइल?''

नेमका अर्थ न लागल्याने महेशने जरा विचार करून प्रश्न केला, ''कसली सर?''

''आता तुम्ही एवढी खळबळ उडवून दिलीत, दुसरी कोणती फाइल असणार?''

''सॉरी सर, पण मला तशा काही सूचना नव्हत्या आणि काल आपणही काही तसं इन्डिकेट केलं नाही.''

महेशला पुढे बोलू न देता पवन चढ्या आवाजात मध्येच बोलला, ''साहेबांनी बोलावलंय म्हटल्यावर तुमच्या ते लक्षात यायला हवं होतं. आमच्या इथल्या कारकुनांनासुद्धा ते समजतं.''

''मी कारकून नाही, आयएएस आहे.'' महेशच्याही आवाजाला लगेच धार चढली. त्यावर उसळून पवन काही बोलायला जाणार तोच झगडेंनी हाताने त्याला थांबण्याची खूण केली. ''ठीक आहे साहेब. यापुढे मात्र जरा ते लक्षात ठेवत चला.''

''सर, फाइलचं काय, तुम्हाला हवी असली तर उद्या एक कॉपी पोहोचवण्याची व्यवस्था करतो.''

''आज संध्याकाळपर्यंत पाठवा.''

''सर, ती फाइल गोपनीय आहे. त्यामुळे माझ्या कस्टडीत आहे. मी असल्याशिवाय ते काम होणार नाही. आजचा माझा दिवस तर इथंच जाईल असं दिसतंय. कल्पना असती तर सोबतच आणली असती फाइल. मी म्हटलं आपल्याला चर्चा करायचीय तेव्हा...''

''ठीक आहे. फाइल उद्या पाठवा. आता मला सांगा फाइलवर नेमके कुणाचे अन् काय शेरे आहेत?''

पवनकडे एक दृष्टिक्षेप टाकून महेशने पॉज घेतला, ''सर, ते मी फक्त आपल्याला एकट्यालाच सांगू शकतो.''

ते ऐकताच रागाने मानेला झटका देत पवन गरजला, ''फार नियमाचा कंड आहे ना तुम्हाला, आता असा नियम दाखवतो ना...''

त्याला मध्येच अडवत झगडे म्हणाले, ''साहेब, गोपनीयतेच्या शपथा आम्ही प्रत्येक मंत्रिपदाच्या वेळी घेतल्या आहेत. समजा, तुम्ही मला सांगितलं आणि ते मी याला सांगितलं तर तुम्ही काय करणार?''

''तो तुमचा आणि तुमच्या सद्‌सद्‌विवेकबुद्धीचा प्रश्न आहे, सर...''

''ए सद्सद्वाल्या'' म्हणत अरेतुरेवर आलेला पवन संतापाने उसळत असल्याचं पाहून मामला बिघडायला नको म्हणून मुरब्बी झगडेंनी त्याला मध्येच थांबवलं. ''त्यांनी मघाशीच सांगितलं ना, ते कारकून नाहीत, कलेक्टर आहेत. कळलं नाही तुला? कशाला उगीच डोकं लावतोस, जा तू ॲन्टी चेंबरला जाऊन बस आरामात. मी बघतो. चल...'' झगडेंकडे एक रागीट कटाक्ष टाकून पवन उठला आणि दातओठ खात विखारी नजरेने महेशकडे पाहत बघून घेईन या अर्थी मान हलवत ॲन्टी चेंबरकडे गेला. ''पोराला समज नाही अजून. जवान रक्त आहे. कडक साहेब आम्ही पूर्वी खूप बघितलेत; पण हल्ली तुमचे सगळे ऑफिसर्स उंदीर बनताहेत जणू... तुमच्यासारखा वाघ एखादाच दिसतो. त्यामुळे या पोरांना सवय नाही असं काही ऐकायची. जाऊ द्या. मनावर नका घेऊ फार, पाहिजे तर मी सॉरी म्हणतो.'' झगडेंनी टिपिकल गावगुंडीच्या राजकारणाचा सूर लावला.

''सर...''

महेशचा टोन लगोलग बदलल्यामुळे आपली मात्रा लागू पडल्याचं ताडून झगडेंनी लगेच गाडी मूळ मुद्द्यावर आणली, ''जरा स्पष्ट सांगाल का मला, तुमच्या त्या बांद्रा कॉलनी प्रकरणात खरा रोल कोण प्ले करतोय ते?''

''म्हणजे?''

''हेच की, काल तुम्ही म्हणालात महसूलमंत्र्यांनी बातमीचा खुलासा करायला सांगितलाय म्हणून म्हटलं.''

''हो सर, त्यांनीच तशा सूचना दिल्या होत्या.''

''कदमाला मी चांगला ओळखतो. तो स्वत:हून कधीच प्रेसकडे जाण्याच्या भानगडीत पडणार नाही. त्याला माहितीये स्वत:च्या खाली काय जळतंय ते...''

''बट सर...''

''म्हणूनच म्हटलं, मित्र म्हणून विचारतो, सरळ सरळ सांगा...''

विचार करायला अवधी मिळावा म्हणून महेशने समोरचा पाण्याचा ग्लास उचलून तोंडाला लावला. पाणी पिऊन झाल्यावर पुन्हा विचारलं, ''सर, आपल्याला नेमकं काय म्हणायचंय?''

''मुख्यमंत्र्यांचा काही निरोप, सांगावा, फोन काही होतं...?''

''नाही सर.''

''हां, म्हणजे कदमाची पुरती xxx मारण्याचा प्लॅन दिसतोय. ठीक आहे. बातमी प्रेसकडे कशी लीक झाली?''

दुसरी आवृत्ती

लॉस्ट होरायझन

लेखक

जेम्स हिल्टन

अनुवाद

स्नेहल जोशी



किंमत : २००/-रु. पोस्टेज : ५०/-रु.

हिमालयीन पर्वतांच्या उंच भिंती असलेल्या एका दूरवरच्या तिबेटियन दरीत स्वप्नातीत असा शांग्रि-लाचा मठ आहे. भारतातून अपहरण करून आणलेलं विमान कोसळल्यावर, ह्यूज कॉन्वेला त्या शांग्रि-लाच्या मठात आणलं जातं. तिथे त्याला काहीतरी गूढपणा जाणवतो. हे उड्डाण कोणी नियोजित केलं होतं? असं कोणतं रहस्य होतं जे त्या आदरणीय लामाने दडवून ठेवलं होतं? पियानोसारखं वाद्य वाजवणारी ती सुंदर चिनी मुलगी ह्या अशा विचित्र जागी कशी आली?

हळूहळू कॉन्वेला ते असंभवनीय सत्य कळतं...

‘‘सर, बातमी लीक झाली हे खरंय; पण ती कशी आणि कुठून ते आपल्यालाच जास्त माहीत असणार. मुंबईत तुमच्याएवढा प्रेसमध्ये पीआर दुसऱ्या कुणाचा नसावा.’’

‘‘हं... हं’’ ‘‘ॲम आय राइट सर?’’

‘‘जाऊ द्या, ‘प्रखर’च्या जया देशमुखला कधीपासून ओळखता?’’

‘‘फार काही परिचय नाही, एक-दोनदा भेट झालीये...’’ महेशचा सावध पवित्रा. त्यावर त्याच्या डोळ्यांत रोखून पाहत झगडेंनी अचानक बाउन्सर सोडला, ‘‘अच्छा... म्हणून काल दुपारी तुमची गाडी जयाच्या दिमतीला होती तर...’’

‘आयला!’ महेश मनातल्या मनात उद्‌गारला आणि चाटच पडला.

आपला बाण किती खोलवर घुसला आहे ते महेशच्या चेहऱ्यावर वाचत झगडेंनी खर्जातला सूर लावला, ‘‘साहेब, गेल्या ३० वर्षांत राजकारण, प्रशासन अन् प्रेस-मीडिया पार कोळून प्यालोय आम्ही...’’

‘‘सर, पण ते...’’

‘‘एक्स्प्लनेशन ऐकायची इच्छा नाही. जया माझाही चांगला मित्र आहे. इतरांसारखा भामटा नक्कीच नाही. दोन वेळा त्याला १० टक्के कोट्यातला फ्लॅट ऑफर केला होता स्वत:हून, पण नाकारला पठ्ठ्यानं!’’

‘‘म्हणूनच आमचं जमतं.’’ महेश अवचित बोलून जातो.

‘‘आँ...! तुमच्या तर एक-दोनच भेटी झाल्यात ना...’’

बोलण्याच्या ओघात आपली साफ विकेट गेल्याचं पाहून महेशने गप्प राहणंच पसंत केलं. मिनिटभर शांततेत गेल्यावर काहीशा मिश्कील सुरात डीसीएमनी आपलं मत मांडलं. ‘‘तुम्ही आणि तो जया काही आता थांबणार नाही, तुमची बदलीही आता होणार नाही अन् तो व्यवहारही सुटणार नाही. म्हणूनच आम्हाला ती फाइल पाहायची होती.’’

‘‘सर...’’

‘‘द्या मग उद्या-परवा तुमच्या सवडीनं द्या... आम्हाला घाई काहीच नाही... फक्त एक लक्षात असू द्या, आमचं सगळीकडे अगदी बारीक लक्ष असतं.’’

‘‘सर...’’

‘‘जाऊ द्या, पण जे केलंत ते चांगलं केलंत. त्यात सरकारचा म्हणजे तुमचा-आमचाच फायदा आहे. कधीही गरज लागली तर मला याद करा आणि हो, इथून पुढे माझ्याकडे येताना सगळ्या तयारीनिशी येत जा.’’

महेशचा चेहरा पुन्हा एकदा खजील झाल्याचं पाहून झगडे गालातल्या गालात हसले. ''तुम्हालाही भरपूर कामं असणार.''

''हो सर, निघतो मी.''

''ठीक आहे. मलाही जरा फ्रेश व्हायला हवं. बाहेर टीव्हीवाली मंडळी आलेली असणार. त्यांना बाइट हवाय माझा बांद्रा कॉलनीसंबंधात.''

''ओके सर, हॅव अ गुड डे!''

''हाऽऽ हाऽऽ निघाऽऽ''

डीसीएम झगडेंनी दिलेल्या वेळानुसार बाहेर वेगवेगळ्या न्यूज चॅनेल्सच्या पत्रकार आणि कॅमेरापर्सनची फौज येऊन थांबली होती. आपल्या अगोदरपासूनच महेश आतमध्ये असल्याचं कळल्याने तर दिवसभराचा मसाला इथंच मिळणार याचा त्यांना अंदाज आला. त्या अपेक्षेनेच महेश कधी बाहेर पडतोय ते टिपण्यासाठी सगळे कॅमेरे सरसावून उभे होते. महेशला पाहताच त्या सगळ्यांचा त्याला गराडा पडला. अगोदरच झगडेंनी बोलण्याच्या नादात काढलेली विकेट आणि आता हा अनपेक्षित गराडा यामुळे भांबावलेल्या महेशने चिडक्या सुरात 'नो कॉमेन्ट्स' म्हणत तिथून बाहेर पडायचा प्रयत्न केला; पण कॅमेरामन आणि पत्रकार यांनी त्याच्या मागेपुढे पळत चिकाटीने प्रश्नांची सरबत्ती सुरू ठेवली. अखेर महेशलाही थोडं थबकून त्यांच्या प्रश्नांची उत्तरं देण्याशिवाय गत्यंतर राहिलं नाही. तो थांबल्याचं पाहताच प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली. 'सर, बांद्रा कॉलनीचं नेमकं काय होणार?'

'बिल्डरला किती एफएसआय मिळणार?' 'शासकीय कर्मचाऱ्यांच्या कायम निवासव्यवस्थेचं काय?'

'बाजारभावाच्या तुलनेत या स्कीममध्ये शासनाचा किती महसूल बुडणार?'

सगळ्यांचे प्रश्न संपेपर्यंत महेश शांतपणे उभा राहिला आणि शेवटी सगळ्या प्रश्नांचं आपल्याकडे एकच उत्तर असल्याचं अगदी कोऱ्या चेहऱ्याने सांगितलं. ''बांद्रा कॉलनीच्या ठिकाणी मल्टी स्टोअरीड टॉवर्स उभारून सध्याच्या रहिवाशांची तिथे सोय झाली की उर्वरित मोकळी जागा संबंधित विकासकाला त्या बदल्यात द्यायची. तिथे त्यानं आपल्या मर्जीनुसार प्रकल्प उभारायचे वा डेव्हलपमेन्ट करायची असा प्रस्ताव आहे. त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यानं मी त्यावर स्पष्टीकरण मागवलं आहे. सध्याच्या प्रस्तावानुसार प्रकल्प साकारला तर त्यामध्ये शासनाचं, पर्यायानं लोकांचं काही हजार कोटीचं नुकसान होणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प होणारच

असेल तर तो नियमानुसार व्हावा एवढाच आपला आग्रह आहे आणि जोवर मी त्या खुर्चीवर आहे तोवर असा गैरव्यवहार होऊ नये यासाठी जरूर ते सर्व प्रयत्न करीन.''

महेशचं निवेदन संपताच पुढचा प्रश्न आला, ''म्हणूनच तुमच्या बदलीच्या हालचाली सुरू झाल्यात का?''

''त्याबाबत मला काहीच कल्पना नाही. जो विषय माझ्या अखत्यारीत येत नाही त्याविषयी मी काय सांगू?''

''या व्यवहारात नेमके कुठले बिल्डर्स वा कंपन्यांचं उखळ पांढरं होणार आहे?''

''अजून प्रस्ताव फायनल नाही, मग ते आताच का ठरवायचं?''

''सरकारमधले कुणी किंवा प्रशासनातले वरिष्ठ यांचा आपल्यावर दबाव आहे का?''

''अजिबात नाही. मी सरकारच्या हिताचाच विचार करतोय. त्यामुळे मला नाही वाटत कुठलेही वरिष्ठ अधिकारी वा सन्माननीय मंत्री माझ्यावर नाराज असतील. उलट अशा चांगल्या कामांसाठी सर्वांचा नेहमी चांगला पाठिंबाच मिळतो, असा माझा आजवरचा अनुभव आहे.''

''महसूलमंत्र्यांचं काय म्हणणं आहे?''

''ते मी कसं सांगणार?''

''उपमुख्यमंत्र्यांशी आपली आत्ता याच विषयावर चर्चा झाली का?''

''मी अन्य काही प्रशासकीय स्वरूपाच्या कामांसाठी त्यांच्याकडे आलो होतो. हा लोकहिताचा विषय असल्यामुळे प्लीज त्यामध्ये कुणी राजकारण आणू नये.''

''म्हणजे यामध्ये आता राजकारण सुरू झालंय तर!'' एका पत्रकाराची खोचक विचारणा. त्यावर ''माझ्याकडे आता अधिक काही सांगण्यासारखं नाही.'' एवढं बोलून महेश पुढे चालू लागला.

नाही, नाही म्हणता जोरदार बाइट मिळाल्याच्या आनंदात लगेच पत्रकार आपापल्या पद्धतीने निष्कर्ष काढायला लागले. बातमी सांगताना मग कुणी या सगळ्यामध्ये आता राजकारण शिरल्याचं महेश यांनी अप्रत्यक्षपणे सुचवल्याचं सांगितलं, तर कुणी एकुणातच हे प्रकरण आणि बदलीची चर्चा या पार्श्वभूमीवर महेशने डीसीएमची भेट घेतल्याने या प्रकरणाला आता आणखी वेगळं वळण लागल्याची शक्यता व्यक्त केली.

❖

दहावी आवृत्ती

चाकाची खुर्ची

लेखक

नसीमा हुरजूक

किंमत : २५०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.

वयाच्या चौदाव्या-पंधराव्या वर्षांपर्यंत नाचणारी-बागडणारी-उत्साहानं सळसळणारी एक मुलगी... अचानक पाठीच्या दुखण्यानं अंथरुणाला खिळते आणि पॅराप्लेजिक होऊन चाकाच्या खुर्चीवर जाऊन बसते...!
सुरुवातीला अंतर्बाह्य उन्मळून पडते, पण नंतर त्यातूनच जन्माला येतं एक नवं व्यक्तिमत्त्व. नसीमा हुरजूक.

अपंगांसाठी झटणारी एक संवेदनशील स्त्री. अपंगांना सहकार्याचा हात पुढे करणं, त्यांना जीवन सुसह्य करून देणं, स्वत:च्या पायावर उभं करणं, त्यांच्यात आत्मप्रतिष्ठेची भावना जागवणं, हेच त्यांच्या आयुष्याचं ध्येय आहे. वास्तवाचं उचित भान ठेवून त्या स्वप्नं बघतात आणि मग ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी बेभानपणे धावतात, आपल्या चाकाच्या खुर्चीतून...
'हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड, कोल्हापूर' ही संस्था, वसतिगृहं, प्रशिक्षण केंद्रं, गॅस एजन्सी... त्यांच्या कार्याचा व्याप झपाट्यानं वाढतो आहे. 'फाय फाउंडेशन'सारख्या अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या, प्रचंड जिद्दीच्या स्त्रीचं हे आत्मकथन.
ओघवत्या शैलीतलं, निखळं प्रामाणिक, चित्रदर्शी, काळजाला भिडणारं...

पुस्तक परिचय

'फाईव्ह स्टार्स' असे बेधुंद ग्रुप म्हणजेच कॉलेज लाईफ

बेधुंद

अविनाश लोंढे यांनी खरगपूर येथील आयआयटीमधून एम.टेक्. ही पदवी घेतली. सध्या ते इथिओपियामधील कोका-कोला कंपनीमध्ये प्रोजेक्ट मॅनेजर आहेत. ते मूळचे सोलापूर जिल्ह्यातील वेणेगावचे आहेत. त्यांना वाचन, लिखाण व संगीताचा छंद आहे. त्यांच्या 'बेधुंद' या चारोळीसंग्रहाचे समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांच्या हस्ते २०११ मध्ये प्रकाशन झाले. २००५-०६ मध्ये झालेल्या यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय विद्यालयीन कथा स्पर्धेत अविनाश लोंढे यांना चौथा क्रमांक मिळाला.

ते आयआयटी खरगपूरमध्ये 'महाराष्ट्र मंडळा'चे सांस्कृतिक सचिव होते. तसेच ते २००५-०६ मध्ये डॉ. अण्णासाहेब शिंदे अभियांत्रिकी विद्यालयात अंतरंग कमिटीचे संपादक आणि वादविवाद, वक्तृत्व अन् सांस्कृतिक कमिटीचे सलग दोन वर्षे सदस्य होते.



लेखक

अविनाश हंबीरराव लोंढे

कॉलेज जीवन म्हणजे विद्यार्थ्यांच्या भवितव्याची पायाभरणी. भविष्यात ज्या क्षेत्रात काम करायचं ठरवलेलं असतं, त्या क्षेत्राशी संबंधित ज्ञान, माहितीचा संचय करण्याचा हा काळ...पण रॅगिंग, व्यसनं, प्रेमप्रकरणं, अश्लील चित्रपट पाहणे,

मुला-मुलींनी एकमेकांना अश्लील एसएमएस पाठवणे, मुलांनी दारूच्या पार्ट्या करणे, सेक्सचा अनुभव घेणे, जातीवरून मुलांची भांडणं होणे, त्यांची टपोरी भाषा इ. वाईट गोष्टींमुळे काही मुलं जीवनाच्या मार्गावरून भरकटतात, जया आणि सुऱ्यासारखी...जयंत, अक्षय, सुरेश, समीर आणि अण्णा (फाइव्ह स्टार्स) या पाच मित्रांच्या निमित्ताने ही ब्लॅक कॅनव्हासवर रेखाटलेली कॉलेज जीवनाची चित्रं वास्तवाच्या जवळ जाणारी...वाईट गोष्टींचा परिणाम किती भयावह असू शकतो याचं दिग्दर्शन करणारी...वाचनीय.

सेमिस्टर : ७ (फायनल इयर)

बघता बघता तीन वर्षं निघून गेली होती. कळलंच नाही, की वेळ इतक्या लवकर कशी काय निघून गेली? आता अधिकृतरीत्या फाईव्ह स्टार्स सिनिअर्स होते. कदाचित शेवटच्या वर्षाला आल्याने आता आपल्यात दुनियादारीची समज वाढली आहे, असा समज त्यांचा झाला होता.

ट्रेनिंगवरून परत आल्यावर जयाच्या वेडेपणात अजूनच भर पडली. एकतर HDने हर्षलाचं ट्रेनिंग ऐन वेळी बदलून जयाच्या प्रेमाला आव्हान दिलं होतं.

लाखो विचारांच्या वादळात जया बॅग्ज घेऊन सरळ अक्ष्याच्या रूमवर गेला. आधीच तिथं बाकीचे चार जण बसले होते.

सुऱ्या, अक्ष्या अन् अण्णा पत्ते खेळत होते, तर समीर हिस्टरीचं पुस्तक घेऊन वाचत बसला होता. त्यांनी जयाला रूममध्ये येताना बघितलं.

आधीच हर्षलाचं ट्रेनिंग बदलल्याचा किस्सा माहीत असल्यानं कुणी त्याला काहीच बोललं नाही.

''कळलं का तुम्हाला; त्या दुसऱ्या युनिव्हर्सिटीची पोरगी UPला ट्रेनिंगला गेली होती. बिनधास्त, डेअरिंगबाज पोरगी होती यार... रात्री ८ वाजता ती शॉपिंगसाठी गेली. रिक्षावाल्याने तिला कोपऱ्यात नेलं, त्याच्या मित्रांना बोलावलं अन् तिच्यावर 'गँगरेप' केला... तिनं त्याच रात्री रूमवर येऊन फाशी लावली स्वतःला.... बिच्चारी... तिची बॉडी आणायला पण किती त्रास झाला तिच्या आई-वडिलांना...

''अन् युनिव्हर्सिटीने पण नाव खराब होऊ नये, म्हणून साधी केस पण रजिस्टर नाही केली... कारण काय, तर तिचा रेप महाराष्ट्रात झाला नाही, त्यांच्या विद्यापीठात झाला नाही... साला ह्या रेप करणाऱ्यांची मानसिकता कळत नाही बाबा आपल्याला...! असं कसं जबरदस्तीने कुणावर... अशा...'' - हातातील एक पत्ता खाली टाकत सुऱ्या शांतता फोडण्याच्या उद्देशाने डोक्याला हात लावत बोलला.

''सगळा दोष आपल्या सिस्टमचा आहे! हे पोलीस, राजकारणी, आपला समाज.... काय करतात काय माहीत?''... - जया निराशेनं हातातील बॅग्ज खाली ठेवत बोलला.

'सिस्टममध्ये लोक पण येतात... जया! तू, मी.. आपण सगळे...

संविधानाने आपल्याला अधिकार अन् कर्तव्ये दिली आहेत.... इथं सगळ्यांना फक्त अधिकार पाहिजेत... कर्तव्य म्हटलं की सगळ्यांची तोंडं बंद...! तसा दोष नाही म्हटलं, तरी आपल्या पोरींचा पण आहे, ह्यांना वेस्टर्न कल्चरचं अनुकरण करायला पाहिजे, कमी कपडे घालायला पाहिजेत, पण जर कुणी हात लावला, तर ओरडायला पाहिजे फक्त... बचाओ बचाओ...''

''त्या पोरी पर्समध्ये मिरचीची पूड किंवा स्प्रे घेऊन फिरतात, वेळ पडली की स्वतःच्या रक्षणासाठी! अनुकरण करायचं तर पूर्ण करावं, ते म्हणतात ना ' आधा ग्यान... गधे के बराबर... वेस्टर्न पोरींच्या डेअरिंगचं पण अनुकरण केलं पाहिजे! आपल्या पोरींनी धाडशी व्हायला पाहिजे... काय असतं रे पुरुषात? लवड्यावर जोराने लाथ मारली की आऊट होईल तो... अशी किती ताकद लागते तिथं लाथ मारायला, नाहीतर हातात मिळेल त्यानं तिथं सडकवायला? पण नाही, आपली सगळी ताकद ह्या बचाओ... बचाओ...मध्ये!''

''त्या मुलीचं मलाही खूप वाईट वाटतंय...! मी मला जर पोरगी झाली ना, तर पहिलं तिला सेल्फ डिफेन्स शिकवेन... -'' पत्त्यातून मान वर काढत अक्ष्या बोलला. अक्ष्याच्या पण आवाजात नाराजगी होती!

''खरंय रे अक्ष्या! पण तिच्यावर ३-४ जणांनी रेप केला, बिचारी काय करणार ती एकटी...?''

''आपल्या देशातील पुरुषांच्या मानसिकतेतच काहीतरी चूक आहे... साला रेप करणाऱ्यालाना सरळ फाशी दिली पाहिजे -'' अण्णा रागानं हातातील राणी टाकत मध्येच बोलला.

''नाण्याच्या दोन बाजू असतात अण्णा, उद्या जर का असा कायदा झाला, तर कितीतरी महिला पहिला कसल्यातरी किश्शाचा बदला घेण्याच्या उद्देशानं मुद्दामहोऊन रेपच्या केसेस दाखल करण्याची शक्यता आहे...! बदला घेण्याचा सोपा मार्ग.'' - समीर पुस्तक खाली ठेवत बोलला.

''अरे पण सिस्टमचा पण दोष आहेच ना ? नाही का..? रेप करून जर काहीच शिक्षा होत नसेल, तर कोण घाबरणारच नाही रे.... ! पोलिसांना कोण अन् किती घाबरतं, आजकाल? त्यामुळेच मी स्पर्धापरीक्षेचा नाद सोडला...'' - अक्ष्या हातातील सगळे पत्ते खाली टाकून मध्येच बोलला.

''नाद सोडलास की घाबरलास?..... अरे, मग तू बदल ना सिस्टम... तू पण भाग आहेसच ना ह्या सिस्टमचा? मी करतोय MPSC...'' अण्णा.

''अरे बाबा, आमची परिस्थिती तुझ्याएवढी चांगली कुठंय? घरी गेलो की सगळे विचारतात - अजून किती दिवस बापाला काम करायला लावणार आहेस? नोकरी लागते की नाही? तुम्हाला फक्त रिजर्व्हेशनच्या नावाने ओरडायला जमते. अण्णा तुझ्यासारखे नाही रे आमचे. तुला अजून ५-६ वर्षं नोकरी नाही लागली तरी काही फरक नाही पडणारेय...'' - अक्ष्या वैतागून बोलला.

''काय उपयोग म्हणा... अण्णा... एवढी घासून...? पुढं जाऊन काय तर पुढाऱ्यांची चाकरी करा... नमस्कार घाला वाकून... ज्यांना वाचताही येत नाही... त्यांच्यासमोर-'' जया डोक्यावरून हात फिरवत कुत्सितपणे बोलला.

''जया बोलणं सोपं आहे रे, करणं अवघड... तुला काय, उचलली जीभ... लावली टाळ्याला''... समीर जयाला थोड्या रागाने बोलला...

''तू पण त्याच्याच कॅटेगरीतला... तुम्ही काय जरा वरचे साहेब होणार, साले हे UPSCवाले.... !, अन् पुन्हा युनिटी करा UPSCवाल्यांची सिस्टममध्ये गेल्यावर...! ट्रेनिंगनंतर 'मलई' जास्त मिळणाऱ्या रीजनसाठी झगडतात हे साले... हे काय देशाची प्रगती करणार...का? स्पर्धापरीक्षा पास करायला जेवढा खर्च केला, तेवढा एका महिन्यात बाहेर काढायला? खरंय ना समीर? आम्हाला माहीत नाही बाबा, ऐकलंय आम्ही फक्त...! तू UPSC करणारा... - अन् अक्ष्या लXX... काहीही झालं की साल्या तुला रिझर्वेशनचा विषय मध्ये आणायला पाहिजेच...'' जया तेवढ्याच रागानं बोलला. जयाला नेमका कशाचा राग आला होता काय माहीत!

''तसं नाही रे जया, पण वस्तुस्थिती आहे ना - या अण्णांची अन् समीरची परिस्थिती माहितेय ना तुला?'' - अक्ष्या

''मग ह्या सुऱ्याचं काय? ह्याची तर तगडी परिस्थिती आहे, मग का घेतो हे रिझर्व्हेशन?'' - जया

''आयला... माझी का मारताय तुम्ही?'' - सुऱ्या

''ते सोडा रे...! बॅक टु पॉईंट. 'मलई'बद्दल बोलायचे झाले तर.. अजून मी प्रिपेअर करतोय UPSC पास नाही झालो... माहीत नाही यार... पण सगळेच सारखे नसतात...! अन् एवढीच चीड आहे ना, तर तू कर ना UPSC. तुला कुणी अडवलंय?'' - समीर

'मुलाखतीतच यांचा खोटेपणा सुरू होतो, किती कलेक्टर्स आहेत आपल्या

५२ वी आवृत्ती

रुचिरा

भाग १

लेखक

कमलाबाई ओगले



किंमत : २२५/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.



२२ वी आवृत्ती

रुचिरा

भाग २

लेखक

कमलाबाई ओगले

किंमत : २२५/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

देशात? जितके जिल्हे तितके..... बरोबर..... ? कुणाचं नाव लक्षात आहे तुम्हाला? १-२ फक्त? ते पण सिस्टममध्ये रगडले आहेत... बाकीचे काय करतायेत रे? कसली समाजसेवा... अन् कसलं काय? आपापली घरं भरायचे धंदे साले.'' - अक्ष्या मध्येच बोलला.

''अन् तू काय करणारेस साल्या! MBA... साला शिकायचं आपल्या देशात अन् पुढे जाऊन चाकरी करा, अमेरिकेची... अन् बाहेर गेल्यावर बाकीच्यांना फक्त तत्त्वज्ञान शिकवा आपल्या देशाबद्दल! पावडर, साबण अन् कोला विका मल्टिनॅशनल कंपन्यांचा... हे देशाचे भावी तरुण काय आपला देश बळकट करणार? कसंय दुरून डोंगर साजरे...! आम्ही निदान प्रयत्न तर करतोय रे... बघू झालो पास तर पुढे... अन् तसंपण सगळ्यांना दुसऱ्याच्या ताटात चांगलं आहे असंच वाटतं ना... प्रत्येकाला दुसऱ्याचीच बायको सुंदर वाटते -'' अण्णा हसत बोलला.

जया शांततेनं ऐकत होता. हर्षलाचं दुःख अजूनही त्याच्या मनात सलत होतं.

''पण जर का मी MPSC केली तर... नाव लक्षात ठेवा... जयंत... DySP... साला १० वेळा सस्पेंड होईन करियरमध्ये, पण लाच घेणार नाही... जयंत... बुलेटप्रूफ....!'' आपल्या छातीवर हात मारत जया बोलला.

''हाहा, अन् बाकीच्यांनी काय पोती घातली का रे येडझव्या..... MPSCचा सिलॅबस तरी माहितेय का तुला जया?'' अण्णा मध्येच हसत बोलला.

''जया. ऐक.... पोलिटिकल प्रेशर नावाचं काही असतं का नसतं? अन् भ्रष्टाचाराचं बोलताय, तर पगाराची तुलना करा प्रायव्हेट अन् सरकारी! पोलीस घरापेक्षा जास्त विचार या देशाचा करतात, त्यांच्यामुळे आपण निवांत मजा करत बसलोय इथं... सगळे सण त्यांना रस्त्यावर साजरे करावे लागतात.... त्यात २४ तासांची ड्यूटी... अन् पगार किती त्यांना या प्रायव्हेट कंपन्यांच्या तुलनेत? अन् अक्ष्या प्रायव्हेट कंपनीत काम केल्यावर तू तुझंच घर भरणारेस... दुसऱ्याचं नाही... च्या मारी... खरं तर माझ्या मते, सरकारने पोलीस म्हणजे त्यांना काजू, बदाम दिले पाहिजेत सरकारने! तगडे बनवले पाहिजेत. मानाचा तुरा घातलेला फेटा बांधला पाहिजे, त्यांना चांगलं घर द्या... त्यांच्या मुलाबाळांचं भविष्य सिक्युअर करा... मग बघा भ्रष्टाचार कमी होईल की नाही... भीती नाहीच

रे कुणाची आपल्या देशात. च्या मारी गल्ली गल्लीत एक गुंड...! खून करा बाहेर या... रेप करा बाहेर या.... म्हणून तर त्या बिच्चाऱ्या मुलीचा रेप झाला... कसा काय क्राईम कमी होणारेय? आपण नागरिक म्हणून आपली कोणती कर्तव्यं पार पाडतो रे? -शेवटी कसंय ना, ज्या रंगाचा चस्मा घालाल, तशी दुनिया दिसेल...'' समीरनं आपलं प्रशासनातलं उमलतं ज्ञान पाजळलं!

''जया बोलतोयस आत्ता... पुढं जाऊन पण हे लक्षात ठेव... म्हणजे झालं..... काही नाही होणार यार या देशाचं. - अरे, आम्ही निदान खोटं तर बोलणार नाही, लोकांनी रक्त सांडून, काम करून भरलेल्या टॅक्सवर मजा तर नाही मारणार.....खोटं तर नाही बोलणार... समीर.... माझ्या गावाशेजारची एक पोरगी IAS झाली, बोर्डात आली होती दहावी अन् बारावीला... सत्कार समारंभात बोलत होती, की तिच्या घराची परिस्थिती किती वाईट होती अन् कसा संघर्ष करून ती वर आली.... पण तिचा चुलत भाऊ DySP आहे हे तिनं नाही सांगितलं... तीच काय किती उदाहरणं देऊ तुला? आयला इकडे आमदार - खासदारांचे नातेवाईक... पण स्टेजवर कसं लहान गावातून संघर्ष करून वर आलो हे बरळायचं... जी खरी परिस्थिती आहे, ती सांगायला काय होतंय? का उगीच बिचाऱ्या नवीन पोरांची दिशाभूल करायची? अन् एवढाच संघर्ष केला, तर सिस्टममध्ये आल्यावर काय होतं तुम्हाला?'' - अक्ष्या आपला राग शब्दांवर काढत होता - अक्ष्या वैतागून बोलला.

''तुझ्यासारखं पब्लिक आहे आपल्या देशात हेच आपल्या देशाचं दुर्भाग्य.... बंद कर यार...! तुझ्याशी बोलायचं म्हणजे मलाच डिप्रेशन येतं-जातो यार मी...'' अण्णा रागानं अक्ष्यावर ओरडला अन् अण्णा रूमच्या बाहेर निघून गेला.

''अक्ष्या, शितावरून जरी भाताची परीक्षा करता येत असली, तरी तांदळाला भात होण्यासाठी गरम पाण्यात उकळावं लागत...! निदान आम्ही इथं राहून तरी प्रयत्न करू... तुझ्यासारख्या पळवाटा तरी नाही शोधणार...'' असं बोलून त्यापाठोपाठ समीर रूममधून निघून गेला.

''आयला अक्ष्या मूडची आयघातली ना...?'' सुऱ्या रागानं बोलला.

अक्ष्या, जया अन् सुऱ्या काही वेळ तिथेच बसले. कुणी कुणाशीच बोलत नव्हतं.**अण**

मी तावातावानं रागानं माझ्या रूमवर आलो...! टेबलवर ठेवलेलं 'पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशनचं पुस्तक उचलून जोरानं टेबलवर आपटलं, अन् आपल्या

टेबलवर ठेवलेल्या टार्गेट MPSC २००८ या नेमप्लेटकडे निराशेनं बघू लागलो.

हे काय यार? यासाठी करतोय का कॉम्पेटेटिव्ह आपण? माझ्याच मनाला प्रश्न सतावू लागला, कारण मी काहीतरी बदलायच्या उद्देशाने हे सगळं करत होतो. मला पुढे जाऊन पैसा खायचा नव्हता...

ते पुस्तक माझ्याकडे कितीतरी आशेनं बघत होतं... बोलत होतं की - स्वप्नील ऊठ... झाड मनाला... तुला अजूनही कितीतरी अशा या आव्हानांशी संघर्ष करायचा आहे भविष्यामध्ये...! ही तर सुरुवात आहे...

आपणही युवाशक्ती जमा करू जी देश बदलेल... स्वामी विवेकानंदांनी म्हटलं होतं ना, मला फक्त १००० तरुण द्या मी हे जग बदलवेन...

कुठं गेलेत यार हे १००० तरुण?

स्वातंत्र्यानंतर अजूनही नाही मिळाले हे १००० तरुण?

किती टाइम लागतो यार सिस्टम सुधरवायला...? पण नाही... हे जे आधी घासून पोस्ट काढून बसलेत ना, त्यांनाच नाही काही करायचं का? अन् मग असे कॅलिबर असणारे अक्ष्यासारखे कितीतरी तरुण वाया जातायेत हे कधी लक्षात येणारे या आपल्या सिस्टमच्या?

माहितीये ना साला कोण कोण करप्ट आहे- मग करा ना जेलमध्ये बंद... का त्यांना अजून घोटाळे करायला सोडलेत बाहेर?

किती गुंड आहेत समाजामध्ये? साला त्यापेक्षा जास्त पोलीस फोर्स आहे आपल्याकडे... हो ना? मग सरळ का नाही बंद करत गुंडांना?

एक नोटीस देऊ दे सरकारने पोलिसांना - सगळे भ्रष्टाचारी गजाआड होतील... त्याने कदाचित पुढील पिढी तरी अशी होणार नाही... निराशावादी!

२०२०चं स्वप्न बघणारे आपले कलाम अन् आम्ही...

आग सगळ्यातच असते, आहे... पण विझवावी लागते या नियमापुढे... काहीतरी बनण्यासाठी...!

अन् ही आग निघते मग कुणातरी जयासारख्याकडून...! काय चूक आहे त्याची जर त्यानं कुणातरी मुलीवर जिवापाड प्रेम केले.... काय चुकतंय काय आपल्या समाजाचं?

कुठे जात अन् मोर्चे घेऊन बसलेत आज....साला जपानने राखेतून देश निर्माण केला, अन् आपण या देशाची राख करायला निघालोय...

देश सुधारण्याची जबाबदारी देशातील प्रत्येक नागरिकावर आहे, हे कधी समजणार आहे या लोकांना? सगळ्यांच्या अपेक्षा फक्त प्रशासकीय अधिकाऱ्याकडून! हे पण खरं आहे की- जर या देशातील प्रत्येक पोलीस अन् प्रशासकीय अधिकारी खऱ्या ताकदीने उभे राहिले तर साला या 'सो कॉल्ड' गुंडांना चड्डी सांभाळायला वेळ नाही मिळणार... पण का नाही हे होत?

युवाशक्तीची ताकद फक्त मूव्हीज बघण्यासाठी नाहीये यार...

साला कदाचित १००० खरे ऑफिसर्स मला भेटले पुढे, तर जगाचं माहीत नाही, पण देश नक्की बदलेन...

'या जयासारखी, सुऱ्यासारखी - लाथाबुक्क्या मारायची ताकद आहे माझ्यात.... रस्त्यावर येऊन तोडफोड करायची ताकद आहे माझ्यात.... पण ह्याने काय होणार आहे?

एकदा पोस्ट निघू दे; मग बघ कशी सिस्टम सुधरवतो तो... भ्रष्टाचारी नेत्यांना कॉलरला पकडून बाहेर काढेन.

.... माझ्या मनाशीच मी बोलत होतो.

भांडणात काय ठेवलं आहे? ही दारू, गर्लफ्रेंड म्हणजेच कॉलेज लाइफ असतं का? आपलं काही कर्तव्य नाही का ह्या समाजाप्रति? हे कधीतरी जयाला, अक्ष्या अन् सुऱ्याला कळेलच... ! फक्त वेळ वाया गेल्यावर कळू नये म्हणजे झालं!

आज मी ही पोपटपंची करतोय, पण पुढे सिस्टममध्ये गेल्यानंतर मीही त्यांचाच एक भाग बनू नये, याची भीती वाटते आज मला...

❖

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

पुस्तक परिचय

रिक्त

महाविद्यालयीन जीवनात रत्नभूमी वर्तमानपत्रासाठी 'तरुणाई' नावाचं सदर प्रसिद्ध 'मेल्टिंग पॉट' या प्रसिद्ध झालेल्या कथासंग्रहाला कोमसापचं उत्कृष्ट कथासंग्रहाचं पारितोषिक.

लोकसत्ताच्या 'व्हिवा' पुरवणीसाठी 'ओ ड्यूऽऽड' ही अमेरिकेतल्या तरुण मुलांच्या जीवनावर आधारित लेखमालिका प्रसिद्ध.

श्री. व सौ. मासिकात 'कॅलिडोस्कोप' हे सदर प्रसिद्ध.

'तरुणाई' हे साप्ताहिक सदर रत्नभूमी वर्तमानपत्रात प्रसिद्ध.

लोकसत्ताच्या 'चतुरंग', 'लोकरंग' पुरवणीत सातत्याने लेखन.

मी मराठी, रत्नागिरी टाइम्स, प्रहार, साप्ताहिक सकाळ या वर्तमानपत्रातूनही अधूनमधून लेखन.

माहेर, साप्ताहिक सकाळ, श्री व सौ., रोहिणी या मासिक, साप्ताहिकांमधून कथा प्रसिद्ध होत असतात. श्री. व सौ., अनुराधा, मायबोलीच्या दिवाळी अंकात कथा प्रसिद्ध.

अमेरिकेतल्या विविध दिवाळी अंकांत कथा प्रसिद्ध झाल्या आहेत.

'अभिव्यक्ती' या स्वत:च्या संस्थेतून अमेरिकेत दरवर्षी व्यावसायिक रंगमंचावर एकांकिका सादरीकरण. या एकांकिकांसाठी लेखन, अभिनय, दिग्दर्शन आणि त्याचे इतरत्र प्रयोग.



लेखक

मोहना प्रभुदेसाई जोगळेकर

'रिक्त' कथासंग्रहातील कथाविषय, पात्र, घटना, काळ यांचे निराळे संदर्भ घेऊन येतात आणि त्यामुळेच दीर्घकाळ मनात रेंगाळत राहतात. पात्रांचा कथेतील घटनांबद्दल स्वत:चा दृष्टिकोन हेही कथांचं वैशिष्ट्यं. वाटेत घडलेल्या घटनेने बदललेलं आयुष्य, आईच्या निधनानंतर परदेशातून आलेली ती, स्वत:ची ओळख पटलेल्या दोन मुलींमुळे त्यांच्या घरात उठलेलं वादळ, मुलीवर आपल्या हातून अन्याय झाला हे अखेर तिच्यासमोर कबूल करणारे वडील, शाळकरी मुलाला त्याच्या पालकांनीच शाळेत प्रवेश घ्यावा असं वाटायला लागणारं वास्तव, जातीभेद करायचा नाही या निश्चयाने वेगळं पाऊल उचलणारी तरुणी, आई वडिलांच्या घटस्फोटाचं सावट मनावर असताना लग्न केलेली युवती, समाजसेवेच्या अनुभवातून झालेली द्विधा मन:स्थिती, अनाथ मुलासाठी एका तरुणीने उचललेलं अनोखं पाऊल, घरातील 'फुकट' गेलेला मुलगा, अशा असंख्य विषयांमधून व्यक्तिरेखांचं बारीक निरीक्षण कथेतील पात्रापात्रांतून डोकावत राहतं. सारीच पात्रं वाचकाला अलगद त्या-त्या काळात नेऊन सोडतात, कथेतील काळाशी, वातावरणाशी वाचक नकळत एकरूप होऊन जातो. 'रिक्त' कथासंग्रहातील प्रत्येक कथा पुढे काय ही उत्कंठा वाढविणारी आणि पुढील कथेबद्दल उत्सुकता ताणणारी आहे.

डोळे मिटून विचारात गढलेले अण्णा बेड्याच्या आवाजाने दचकले.

''कोण ते?'' उत्तर आलं नाही तसं खुर्चीला टेकवलेली काठी धरत ते उठले. आलेला इसम त्यांच्या पायावरच कोसळला.

''अहो, अहो काय करताय तुम्ही हे!'' अण्णांनी वाकून त्या माणसाला उठवलं. बसायला लावलं.

''मी, मी...'' आलेल्या गृहस्थाने बोलायला सुरुवात केली आणि अण्णा हताशपणे त्या माणसाकडे पाहत राहिले. दाबून ठेवलेल्या जखमेतून रक्त भळभळा वाहायला लागलं. तो दिवस जसाच्यातसा त्यांच्या डोळ्यांसमोर उभा राहिला.

अंगणात पेंगुळलेल्या डोळ्यांनी सगळे गाद्या आवरत होते. चादरीची घडी घालताघालता अण्णांचं लक्ष उंबरठ्यावर उभ्या राहिलेल्या शुभाकडे गेलं.

''काय गं? सौरभची वाट पाहतेयस?'' अण्णांनी तिच्या नजरेच्या दिशेने पाहत विचारलं.

''हो, आला कसा नाही अजून? सात वाजले.''

''मी वहाळापर्यंत जाऊन येतो. आईला सांग तुझ्या.''

''अण्णा, बरोबर घेऊन जा कुणालातरी.''

अण्णा हसले आणि निघालेच. शुभा विचार करत दारातच उभी राहिली. दोन दिवसांवर लग्न. आठ दिवस आधी यायचा होता दादा; पण कामामुळे त्याचं येणं लांबतच गेलं. अण्णांच्या मदतीला तो येऊ शकत नाही याचं त्याला खूप वाईट वाटत होतं. फोनवर रडायलाच लागला. अण्णांनी समजूत घातली. गावात आपल्याच घरचं कार्य समजून सगळी मदतीला येतात हे पटवून दिलं, तेव्हा त्याचा जीव शांत झाला. शेवटी काल निघाला. आतापर्यंत तो पोचायला हवा होता. अण्णांच्या बोलण्याने तिची तंद्री भंगली.

''अगं, इतका वेळ तू इथेच उभी?''

''काय झालं?''

''पार फाट्यापर्यंत जाऊन आलो. तुम्ही तरुण मुलं सांगितलेलं ऐकत नाही आणि असा जिवाला घोर लावता.''

अण्णांच्या चढलेल्या आवाजाने लग्नासाठी जमलेली घरातली सगळीच अंगणात जमा झाली. शुभाची आई अण्णांचा त्रागा बघून घाबरली. ''अहो, शांत व्हा बघू तुम्ही आधी. इथे इतके जण आहेत आणि गाड्याही आहेत. कुणीतरी निघेल बघायला.''

अण्णा कुरकुर करत फेऱ्या मारत राहिले. मांडवातले एक-दोघं निघणार इतक्यात कुणाचंतरी लक्ष फाटकाच्या दिशेने गेलं.

''पोलीस.'' सगळ्यांच्या नजरा त्याच दिशेने वळल्या. शांतता पसरली.

''या पोरे साहेब. काय म्हणताय?'' मनातल्या अशुभ शंका लपवत अण्णांनी विचारलं.

''अण्णा...''

''काय झालंय पोरे? तुम्ही घरच्यासारखे. पटकन बोला. माझा श्वास कोंडल्यासारखं वाटतंय.''

पोरेनी मान खाली घातली. कापऱ्या आवाजात ते म्हणाले, ''फार वाईट बातमी घेऊन आलोय.''

''पोरे, सौरभबद्दल आहे का हो?'' शुभाची आई एकदम रडवेलीच झाली.

''हो वहिनी. मुख्य कार्यालयातून फोन आला होता. त्याच्या स्कूटरला...''

''सौरभ कसा आहे?'' शुभाचे डोळे भरून आले. पोरेनी मान खाली घातली. शुभकार्यासाठी जमलेल्या माणसांसमोर सौरभची बातमी सांगायचं धाडस होत नव्हतं त्यांचं. अण्णांनीच पुन्हा विचारल्यावर कसेबसे ते पुटपुटले, ''ओळख पटवायला जायला हवं.''

पोरे काय बोलतायत ते कानावर आदळत होतं; पण त्यातला अर्थ हृदयापर्यंत पोचत नव्हता. अण्णा, शुभा आणि आई तिघं तिथेच बसून राहिले. नि:स्तब्ध. कुणालाच काय करावं ते कळत नव्हतं. हसत्या खेळत्या मांडवात स्मशानशांतता पसरली. सौरभच्या स्कूटरला अपघात कसा झाला, कुठे, कधी आणि नक्की काय झालं असेल याचा विचार करण्याचीही ताकद कुणामध्ये नव्हती. घामाने थबथबलेला शिंदे थरथर कापत होता.

''सरक, पटकन सरक.'' रस्त्याच्या कडेला थांबवलेल्या गाडीचा ताबा शिंदेला ढकलूनच गावडेने घेतला.

''थांब.'' शिंदेला जोरात ओरडायचं होतं पण घशात काहीतरी अडकल्यासारखं वाटत होतं. शब्द फुटतच नव्हता. गावडेने ट्रक सुसाट सोडला. शिंदे जोरजोरात हुंदके देऊन रडायला लागला.

''थांबव, थांबव गाडी.'' शिंदेकडे दुर्लक्ष करत जवळजवळ अर्ध्या तासाने गावडेने गाडी थांबवली. शिंदे उडी टाकत रस्त्याच्या कडेला धावला. भडभडा ओकून टाकल्यावर त्याला जरा बरं वाटलं. बाजूला पाण्याची बाटली घेऊन गावडे उभा होता. त्याच्या हातातली बाटली हिसकावून शिंदेने चूळ भरली आणि

रागारागाने त्याने गावडेला ढकललं. गावडे भडकला.

''च्यायला, अरे थांबलो असतो तर मेला असतास. पब्लिकने सोडलं नसतं तुला. तुझा जीव वाचवला तर माझ्यावरच काय उखडतोस.''

तिथल्या दगडावर शिंदे बसला आणि हमसून हमसून रडायला लागला.

''काय झालं हे माझ्या हातून?'' उभ्या असलेल्या गावडेकडे मान वर करून त्याने विचारलं. राहून राहून ती स्कूटर आणि त्यावरचा तो तरुण मुलगा त्याच्या नजरेसमोर येत होता.

''थांबवताच आला नाही ट्रक. त्या पोरट्यालातरी काय अवदसा आठवली? रात्री-अपरात्री स्कूटरवरून प्रवास, तोही घाटात? कुणी नेलं असेल का रे त्याला दवाखान्यात?''

गावडे बाजूला डोकं धरून बसला होता. तो काहीच उत्तर देत नाही हे बघून शिंदे पिसाळल्यासारखा ओरडला, ''ए, मी काय विचारलं? गाडी थांबव म्हणून काकुळतीला येऊन सांगत होतो ना हलकटा. पण पळून आलास तू. परत जाऊ आपण. मदत मिळाली नाही, तर मरणार ते पोरगं.''

गावडे काही न बोलता तसाच बसून राहिला. शिंदे एकटाच उठून ट्रकच्या दिशेने चालायला लागला. तो मुलगा जिवंत राहणं कठीण आहे हे मन नाकारत असलं, तरी त्याच्या लक्षात आलं होतं. ट्रकचा धक्का लागल्यावर स्कूटरवरून उडून बाजूच्या कठड्यावर आपटलेला देह त्याने डोळ्याने पाहिला होता. पोलिसांकडे जायला हवं. त्याला एकदम लघवीला जावंसं वाटायला लागलं. तो पुन्हा मागे वळला. गावडे बसलेला त्याच्या थोडं पुढे जाऊन तिथल्या झाडामागे तो उभा राहिला. ''शिंदे, पुन्हा मागे जाण्यात अर्थ नाही. मला नाही वाटत तो मुलगा तिथे असेल. कुणीतरी हलवलं असेल त्याला दवाखान्यात. नाहीच तर फोन करून पोलिसांना कळवलंतरी असेल.''

''मेला असेल का रे तो?''

गावडेने उत्तर दिलं नाही. ट्रकजवळ आल्यावर पुन्हा शिंदेच्या मनाने उचल खाल्ली. तो गाडी चालवायला बसला; पण त्याचं शरीर थंडी भरल्यासारखं कापायला लागलं.

''मी चालवतो.'' तरी शिंदे तिथेच बसून राहिला.

''शिंदे...''

''गावडे, मला पुन्हा तिथे जायचंय. तरुण मुलाला मारल्याचं पाप माझ्या माथी नकोय. कळायला हवं मला त्याचं काय झालं ते.''

द प्रायव्हेट पेपर्स ऑफ ईस्टर्न ज्युवेल

लेखक

मॉरीन लिंडले

अनुवाद

ऋजुता कुलकर्णी

किंमत : २८०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.

पेकिंग १९१४. प्रिन्स सू यांच्या सगळ्यात लहान उपस्त्रीची आठ वर्षांची मुलगी ईस्टर्न ज्युवेलने तिच्या वडिलांची त्यांच्या एका नोकराणीशी चाललेली रतिक्रीडा एका कोरीव आडोशामागून चोरून बघितली. त्यानंतर भविष्याच्या कृष्णच्छायांचं मळभच जणू दाटून आलं आणि ईस्टर्न ज्युवेलच्या वादळी आयुष्याचा प्रवास सुरू झाला... ईस्टर्न ज्युवेलचा शरीरसंबंधांमधला चौकसपणा लक्षात आल्यामुळे तिला टोक्योला त्यांच्याच एका दूरच्या नातेवाइकाकडे पाठवून देण्यात आलं. त्यानंतर वैराण आणि बर्फाळ अशा मंगोलियातल्या राजकुमाराशी तिचा तिच्या इच्छेविरूद्ध विवाह करून देण्यात आला. वारंवार एकटेपणामुळे तिला अस्वस्थ करणारे चमत्कारिक आभास आणि तशीच दु:स्वप्नं पडू लागली; पण ती स्वभावत:च धीट, बंडखोर आणि कोणाच्याही, कमीत कमी पुरुषांच्या तरी वर्चस्वाखाली राहण्याची तयारी नसलेली अशी होती. शांघायच्या झगमगत्या शहरात तिने तिच्या धाडसी स्वभावाचा उपयोग जपानसाठी गुप्तहेरगिरी करण्यात केला. त्यासाठी तिने स्वत:ची चिनी वंशपरंपरा आणि तिला एकेकाळी जे जे प्रिय होतं, त्या त्या सगळ्याला तिलांजली दिली. 'द प्रायव्हेट पेपर्स ऑफ इस्टर्न ज्युवेल' ही अतिशय वादळी, बहुरंगी, दुसरे महायुद्ध आणि तीन देशांच्या पार्श्वभूमीवर घडलेली सत्यकथा आहे.

‘‘ठीक आहे. जाऊ परत. पण बराच वेळ गेलाय. मला नाही वाटत तिथे कुणी असेल.’’ गावडेने गाडीचा ताबा घेतला. ट्रकमध्ये कुणीच बोलत नव्हतं. नेहमी जोरजोरात गाणी लावून तार स्वरात गप्पा मारणारे दोघं जीवघेण्या शांततेत घाटातली ती जागा येण्याची वाट पाहत होते. लांबून चक्काचूर झालेली स्कूटर दिसली आणि पुन्हा शिंदे थरथर कापायला लागला.

‘‘शिंदे, उतरून पाहायला जायचा विचारही करू नकोस. कुणी असलंच आजूबाजूला तर शंका येईल तुझ्या अवस्थेकडे पाहून.’’ ट्रकजवळ पोचला आणि काळ्याभोर रस्त्यावरचं रक्ताचं थारोळं पाहूनच शिंदे मनात काय समजायचं ते समजला.

‘‘आता?’’

‘‘गप्प बसायचं. पुरावे सापडले, तर येतीलच पोलीस दारात.’’

‘‘मला जायचंय पोलीस स्टेशनला.’’

‘‘शिंदे, तो जगलाही असेल. तसं असेल, तर तुझ्याकडे त्याच्या उपचाराचा खर्च मागतील त्याच्या घरचे. आहे तयारी? तुझी असेलही, पण पैसे आहेत इतके? भिकेला लागशील. माझं ऐक. काम आटपून नेहमीप्रमाणे परत जाऊ. बायकोशी, तुझ्या आईशी बोल आणि मग ठरव.’’

शिंदे गावडे सांगत होता ते ऐकत होता, पण ते त्याच्या मनात शिरत होतं की नाही ते त्याचं त्यालाच कळत नव्हतं. बधिर, बधिर होऊन गेलं होतं. शरीर, मन... सारंच. कधी एकदा घरी पोचतोय असं होऊन गेलं त्याला.

शिंदेने चाळीतल्या खोलीचं दार धाडकन उघडलं, तशी भिंतीला टेकून बसलेली त्याची म्हातारी आई धडपडत उठली.

‘‘किती घाई रे तुझी. पायावर पाणी घे. च्या टाकते. गावडे, तूपण बस रे बाबा. प्रवासातून आलात.’’

आई काय बोलतेय त्याकडे शिंदेचं बिलकूल लक्ष नव्हतं. तो मान खाली घालून खुर्चीत बसून राहिला.

‘‘काय रे? ठीक आहेस ना? गावडे, डोळे लाल झालेयत पोराचे.’’ शंका घेत शिंदेच्या आईने गावडेकडे पाहिलं.

उत्तर टाळत गावडे म्हणाला, ‘‘मावशी, आजचा पेपर देता?’’

शिंदेची आई हसली. ‘‘गावडे, तू कधी रे प्येपर वाचायला लागलास?’’

‘‘द्या ना मावशी.’’

‘‘कशाला हवाय पेपर भावोजी?’’ शिंदेची बायको तेवढ्यात आली.

''द्या तर खरं.'' इकडे-तिकडे पडलेली पान एकत्र करत तिने तो गठ्ठा गावडेच्या हातात दिला.

''चहा टाकते.'' आत जाताजाता तिने शिंदेकडे पाहिलं.

''म्हातारी कधीची वाट पाहतेय.'' शिंदेने फक्त मान वर करून तिच्याकडे पाहिलं.

''थकलेलं दिसताय. आणि डोळं का लाल झाले म्हणायचे? काय मारून आलात की काय?'' शिंदेने चमकून तिच्याकडे पाहिलं. मारून शब्दाचा अर्थ त्याने वेगळाच लावला होता, ते त्याचं त्यालाच जाणवलं.

''मी दारू पीत नाही हे माहितीये ना तुला. आणि शाळेत शिकवते, तर नीट बोल की जरा.'' शिंदेच्या बायकोने नाक मुरडलं आणि ती तरातरा आत गेली.

गावडेने हातातलं वर्तमानपत्र त्याच्यापुढे केलं.

''आहे बातमी?''

''बऱ्याच आहेत तशा बातम्या.'' शिंदेने वर्तमानपत्र ओढून घेतलं.

''अरे, वेळ, जागा लिहिली असेल ते पाहायचं ना.''

गावडे मुकाट बसून राहिला. शिंदेचा हात वर्तमानपत्र चाळतानाच कापायला लागला.

''शिंदे, माझं ऐक. आधी चहा घे. जरा ताजातवाना हो.'' गावडेने पुन्हा ते वर्तमानपत्र ओढून घेतलं. म्हातारी बोळकं झालेल्या तोंडाने हसली.

''आज एकदम दोघांचं प्रेम आलंय त्या कागदांवर. काय पराक्रम गाजवलायत की काय? नावं यायची हायेत का?''

''आई, जरा गप की गं.''

शिंदे हात पाय धुवायला मोरीच्या दिशेने वळला. म्हातारी टुकटुक नजरेने गावडेला निरखत राहिली. गावडेने तोंड वर्तमानपत्रात लपवलं; पण डोळ्यांसमोरच्या बातमीने त्याचा चेहरा खर्रकन उतरला. हातातलं वर्तमानपत्र टाकून तो खोलीच्या बाहेर जाऊन उभा राहिला. पाठीवर शिंदेची थाप बसली, तसा तो दचकून वळला.

''बातमी आली आहे.'' चाचरत त्याने शिंदेला सांगितलं. शिंदेच्या हातपायांतलं त्राण पुन्हा नाहीसं झालं.

हातात चहाचे कप घेऊन बाहेर आलेल्या शिंदेच्या बायकोला काहीतरी भयानक घडलेलं असावं, हे त्याच्या चेहऱ्याकडे पाहून लगेच लक्षात आलं. चहाचे कप बाजूला ठेवत शिंदेच्या हाताला धरून तिने त्याला आत आणून खुर्चीत

बसवलं. म्हातारीही तिच्या बाजूला येऊन उभी राहिली.

''काय झालं बाबा ते पटकन सांग. जीव टांगणीला लावू नको.''

शिंदे काहीच बोलला नाही. गावडेने हातातलं वर्तमानत्र त्या दोघींपुढे धरलं. शिंदेच्या बायकोने गावडेने बोट ठेवलेली बातमी रडत रडत सासूला जोरात वाचून दाखवली. म्हातारीने फोडलेला हंबरडा कुणालाच ऐकवेना. हतबुद्ध झालेल्या शिंदेच्या बायकोने घाईघाईत दार लावलं आणि ती सासूला सावरायला धावली. तिची पाठ थोपटत राहिली. स्वत:च्या डोळ्याला लागलेली धार पुसण्याचंही भान शिंदेच्या बायकोला नव्हतं. एक खणाच्या त्या खोलीवर अशुभाच्या चाहुलीने अवकळा आली. शिंदे दिवाणावर आडवा झाला. गावडेला काय करावं ते कळेना.

''भावोजी, तुम्ही सांगा नक्की काय झालं ते. निघेल काहीतरी मार्ग.''

गावडे बोलायला लागला तसं डोक्यावर हात घेऊन पडलेल्या शिंदेला सगळा घटनाक्रम तसाच्या तसा आठवायला लागला.

''टपरीवर चहा मारू.'' बाजूला बसलेल्या गावडेकडे पाहत शिंदेने म्हटलं.

''पेंगुळला असशील तर मी चालवतो.'' गावडे डुलकी काढून ताजातवाना झाला होता.

''घाट पार करू मग चालव; पण एक चहा मारू आधी.'' घाट सुरू झाल्याझाल्या लागणारी सावंतची टपरी त्यांच्या रोजच्या जाण्यायेण्यातली. ट्रक थांबवून दोघांनी चेहऱ्यावर पाणी मारलं. खळखळून चूळ भरली. कटिंग चाय आणायला सांगून दोघांनी खिशातल्या सिगरेटी काढल्या. शिंदेने खरं तर संध्याकाळी लवकर निघायचा बेत केला होता. कोल्हापुरला पोचायला असा कितीसा वेळ लागणार. पण घाटातून रात्रीचा प्रवास नकोच वाटायचा त्याला. दडपण यायचं. तरी गावडे येईपर्यंत अकरा वाजून गेले.

''च्यायला, गावडे कधी सुधारणार रे तू? सगळा माल कोल्हापुरला उतरवून परत निघायचं आहे लगेच. उद्या दुसरं भाडं घेतलंय मी. आता अडनिड्या वेळेला पोचायचं आणि निघायचंही तसंच.''

''तू ट्रक ड्रायव्हर झालास, पण साला नोकरदार लोकांसारखं चालू असतं तुझं. हे जाऊ न येऊ परत.'' शिंदे काही बोलला नाही. आता टपरीवर थांबल्यावर त्याला ते आठवलं.

''मीच चालवतो. तू जागा राहा म्हणजे मला झोप येणार नाही.'' गावडे काही बोलला नाही. दोघं गाडीकडे निघाले.

घाटात तशी शांतता होती. नेहमीइतके ट्रक दिसत नव्हते. शिंदेने वेग

दुसरी आवृत्ती

दिवा



लेखक

प्रमोदिनी वडके-कवळे

किंमत : २७०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.

गेल्या पन्नास-साठ वर्षांत भारतीय स्त्रियांचं मनोविश्व खूप बदललं आहे. वेगाने बदलत आहे. पण तरीही त्यांच्या भोवतीचं वातावरण मात्र पूर्ण बदललेलं नाही. समाजाच्या अपेक्षा बदललेल्या नाहीत.

जगण्याची आधुनिक शैली स्वीकारताना त्यातला पारंपरिक बाज मात्र स्त्रियांनीच सांभाळावा आणि मध्यममार्गी जगण्याच्या चौकटीतून बाहेर न पडताच त्यांनी जगाचा वेध घ्यावा, अशी समाजाची अपेक्षा असते. अशा तळ्यातमळ्यात जगणाऱ्या स्त्रियांचा आणि त्यांनी आपल्या परीने सोडवलेल्या काही सामाजिक गणितांचा वेध या कथांमधे घेतल्याचं जाणवतं. स्त्रियांनी आपल्या निर्णयक्षमतेची ताकद ओळखल्याची खूण या कथांमधून उमटलेली आहे.

सहजसुंदर भाषा आणि ओळखीचं वातावरण, यामुळे या कथेतली पात्रं परकी न वाटता अलगद मनात येऊन बसतात.

वाढवला. जागं राहण्याचा शिकस्तीने प्रयत्न करत असलेल्या गावडेने त्याला टोकलं, ''चहा चढला काय? सावकाश हाणा की राव.''

शिंदे काही बोलला नाही. गावडेचा डोळा लागला. शिंदेने गाणी सुरू केली. गाण्याच्या नादात घाट कधी संपेल ते कळणारही नाही, याची त्याला खात्री होती. घाटातलं देऊळ ओलांडलं की पुन्हा सपाट रस्ता सुरू. ट्रकचा वेग शिंदेच्या नकळत आता जास्तच वाढला. गाण्याच्या तालावर गुणगुणताना कधीतरी त्याच्या ते लक्षात आलं; पण वेळ निघून गेली होती. बाजूने गेलेली स्कूटर त्याच्या एकदम समोरच आली. सणसणून शिवी घालत त्याने ब्रेक दाबला. टायरचा जोरात आवाज झाला, तसा गावडेही दचकून जागा झाला. शिंदेने गाडी स्कूटरपासून बाजूला घेण्याचा असफल प्रयत्न केला. त्याच्या नजरेसमोर ती उडाली. त्याचा ट्रकही वेडावाकडा वळला. कसाबसा त्याने त्याच्यावर ताबा मिळवला. आताही तो प्रसंग दिसल्यासारखा दिवाणावर हात आडवा ठेवून झोपलेला शिंदे ताडकन उठला.

''गावडे माझ्याबरोबर चल पोलीस स्टेशनवर.''

गावडे शिंदेच्या बायकोला काय घडलं ते सांगत होता. अचानक उठून बसलेल्या शिंदेमुळे म्हातारी आणि शिंदेची बायको गडबडली. शिंदेच्या बायकोने अडवलं, ''आता काय बोलत होतो ते ऐकलं नाहीत तुम्ही? पोलीस स्टेशनवर चाललात? आमचं कसं व्हायचं मग? ते पोरगं गेलं आता. वाचलंत ना पेपरात? तुम्ही तुरुंगात गेलात तर आम्ही कसं जगायचं?''

''तुज्या पोराचा इचार कर बाबा. झालं ते तू काय मुद्दाम नाय केलंस. त्येचा जीव गेला, आता तुज्या संसाराचं वाटोलं नको करू. लहान हाये पोर. तू तुरुंगात गेलास तर एकटी कशी हाकनार संसार तुजी बायको?'' म्हातारीदेखील पोराला समजावायला लागली. शिंदे काही न बोलता बसून राहिला. गावडे त्याच्याकडे पाहत होता.

''शिंदे, तू सापडणार नाहीस पोलिसांना. ट्रक कुणाचा, कोणता हे कुणाला सांगता आलेलं नाही. घाई करू नकोस. एक जीव गेलाच आहे. आता तुझं आयुष्य उद्ध्वस्त का करून घेतोस? कबुलीच द्यायची, तर कधीही देता येईल. डोकं शांत होऊ दे तुझं आधी.''

शिंदे गावडेकडे काही न बोलता बघत राहिला.

''त्याच्या घरच्यांचं काय झालं असेल? तरुण होतं रे पोर.'' शिंदेला पडलेल्या प्रश्नाने प्रत्येकाच्याच मनात अचानक जग सोडून गेलेल्या त्या तरुणाचा

आणि त्याच्या घरातल्यांचा विचार मनात डोकावायला लागला. कशी असतील त्या घरातली माणसं? त्या मुलाचे आई-वडील, बहीण-भावंडं... काय झालं असेल त्यांचं ही बातमी कळल्यावर?

पुतळ्यासारखे बसलेले ते तिघं सौरभचा निष्प्राण देह मांडवात आल्यावर कोसळले. बेशुद्ध पडलेल्या शुभाच्या आईला जागचं उठताही येईना. शुभाच्या काकांनी पुढचं सारं केलं. शुभाच्या सासरच्या मंडळींशी कुणीतरी बोलणं भाग होतं. ते सारे येऊन भेटून गेले, तेव्हा शुभाला केतनच्या खांद्यावर डोकं टेकून मन मोकळं करायची अतीव इच्छा होत होती. केतनचे डोळेही तिचा सतत वेध घेत होते. प्रत्यक्षात मात्र आई-अण्णांबरोबर ती त्यांच्या बाजूला बसून होती. लग्न पुढे ढकलायचं ठरलं आणि मनावरचं मोठं ओझं उतरल्यासारखं झालं साऱ्यांनाच. केतनला शुभाची समजूत घालावी, तिच्याशी निदान चार शब्द एकांतात बोलता यावेत असं मनापासून वाटत होतं. शेवटी कुणाचं लक्ष नाही असं पाहून विहिरीच्या जवळ त्याने तिला गाठलं,

''शुभा, कशी आहेस?'' भरलेल्या डोळ्यांनी शुभाने त्याच्याकडे पाहिलं.

''सौरभ गेला रे. किती वाट पाहत होते मी. मला म्हणाला होता, 'केतनला सांगणार आहे. माझ्या बहिणीला त्रास दिलास तर गाठ माझ्याशी आहे.' हे सांगायला पोचलाच नाही तो इथे.'' केतनच्या छातीवर डोकं टेकून अश्रूंना वाट मोकळी करून द्यावीशी वाटत होती शुभाला; पण ती तिथेच हौदाच्या काठावर बसली. हुंदक्यांवर हुंदके देत. केतन पुढे झाला. त्याने तिचे हात हातात घेतले. कुणी आजूबाजूला नाही याची खात्री करत तिचं डोकं आपल्या पोटाशी धरून तो तिच्या केसांवरून हात फिरवत राहिला. शुभा हळूहळू शांत होत गेली.

''शुभा, संध्याकाळी निघू आम्ही कोल्हापूरला जायला परत. घरी लग्नासाठी नातेवाईक आलेले आहेत. सौरभचं कळल्याकळल्या निघालो; पण परत जावं लागेल लगेच. आता पुन्हा लग्नाची तारीख काय ठरतेय माहीत नाही. कोल्हापूरहून तळवड्याला मला किती वेळा येता येईल, तेही ठाऊक नाही. पण जप गं स्वत:ला. आणि पत्र लिही. मी वाट पाहीन. समजतंय ना मी काय म्हणतोय?''

केतनने इथून जाऊच नये असं वाटत होतं शुभाला. दोघं न बोलता बसून राहिले. केतनचं तिथे असणं तिला हवंहवंसं वाटत होतं. तितक्यात तिच्या हातावर हात ठेवत केतन म्हणाला, ''तुझे आई-बाबा खचलेयत. त्यांची समजूत घालणं कठीण आहे, पण मिळेल तो ट्रक ड्रायव्हर. होईल त्याला शिक्षा.''

शिंदेने तिखट नजरेने बायकोकडे पाहिलं.

‘‘शाळेत शिकवतेस ना तू? आणि गुन्हा कबूल करू नका म्हणून कसं सांगतेस. अं? कसं सांगतेस गं तू असं करायला?’’

शिंदेची बायको काही न बोलता तशीच बसून राहिली. तिला आपलं म्हणणं पटवून द्यावंसं वाटेचना.

‘‘मग काय तुला जेलात खितपत पडायला पाठवल व्हय ती?’’ म्हातारीने चिडून विचारलं.

‘‘कबुलीजबाब द्यायचाच तर काही दिवस थांबा. पोलिसांना लागला माग तर येतीलच ते घरी. तेव्हा सांगालच ना तुम्ही काय झालं ते; पण तसं झालं नाही तर आपल्या हातानेच कशाला धोंडा पाडून घ्यायचा?’’

‘‘वहिनींचं म्हणणं मलापण पटतंय.’’ गावडे म्हणाला.

शिंदे काही न बोलता पलंगावर बसल्या बसल्या जोरजोरात पाय हलवायला लागला. त्या दिवसापुरतं निभावलं या जाणिवेने शिंदेच्या बायकोला हायसं वाटलं. बाकी पुढचं पुढे...

म्हातारीला आणि बायकोला तो आता पोलिसांकडे जाणार नाही याबद्दल खात्री वाटायला लागली. त्याने ट्रकवर जाणं बंदच केलं होतं. हात थरथरायलाच लागायचे. दिवस सुरू झाला की हातात वर्तमानपत्र घेऊन त्या अपघाताबद्दल काहीतरी माहिती मिळेल, त्या मुलाबद्दलची सगळी माहिती कळेल या आशेवर बारीक नजरेने तो अक्षर न अक्षर पिंजून काढायचा. काही नाही तर पोलीस कधी ना कधीतरी उभे ठाकणारच याची त्याला खात्री होती. मनातल्या मनात तो उजळणी करायचा. कायकाय झालं ते सगळं खरं सांगायचं, असं त्याने मनाशी पक्कं केलं होतं. हा पहिलाच अपघात होता त्याच्या हातून. गाडीसमोर आलेलं कुत्रा-मांजरही मरणार नाही हेच पाहिलं होतं त्याने. मग माणूस मरावा असं कसं वाटेल, असं तोच पोलिसांना विचारणार होता. पण पोलिसांचा पत्ताच नव्हता. वाट बघून तो कंटाळला. शेजारपाजारचं तरी कुणी काही त्या अपघाताबद्दल बोलेल असं त्याला वाटायचं. त्यांच्याकडून काही कळतं का म्हणून ते आले की त्याचे कान टवकारायचे. अख्खा दिवस अंगणातल्या बाजेवर शिंदे बसून काढायचा. सुरुवाती सुरुवातीला शेजाऱ्या-पाजाऱ्यांना कुतूहल वाटायचं. त्यामुळे त्याच्या अपेक्षेप्रमाणे यायचेही ते. कामावरून आलेली गडीमाणसं त्याच्या बाजूला टेकायची; पण कधीच कुणीही त्या अपघाताबद्दल बोललं नाही. शिंदेही नुसता ऐकत राहायचा. शेजारपाजारच्या घरात कुणीतरी स्टोव्हवर नाहीतर चुलीवर भाकरी थापत बसलेलं असायचं. सगळ्यांचं बोलणं ऐकत तो तिकडे नजर लावून बसायचा. शिंदेची

विजया राजाध्यक्ष यांची पुस्तके

दुसरी आवृत्ती



आसपास घडणाऱ्या, साध्या वाटणाऱ्या घटना-प्रसंगांचे नेमके, वाचनीय वर्णन

अवती भवती

किंमत : १४०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

दुसरी आवृत्ती

या कथा म्हणजे अंतर्मुख करणारे वास्तवाच्या परिघातले अनुभवच

अस्वेरचे पर्व

किंमत : २२०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

तिसरी आवृत्ती

आयुष्याच्या उत्तरार्धातील अनुभवांचे उत्कट चिंतन

उत्तरार्ध

किंमत : २४०/-रु. । पोस्टेज : ५०/-रु.

बायको शाळेतून यायची तीच लगबगीने. हातातल्या भाजीच्या पिशव्या सांभाळत ती यायची. शिंदेच्या शेजारी बाजेवर बसलेले पुरुष दिसले, की तिचं डोकं फिरायचं. त्यांच्यावर तोंडसुख घेत ती तिथेच उभी राहायची. शिंदेचं अडीच वर्षाचं पोरगं आजूबाजूला खेळत असायचं. तेही मग तिच्या पदराला लोंबकळत राहायचं. शिंदे पोराला तिच्याकडून सोडवून घ्यायचा. जबरदस्ती मांडीवर बसवून ठेवायचा. थोड्या वेळात त्यालाच काट्र्याच्या किरकिरीचा वैताग यायचा. त्याच्या ढुंगणावर फटका हाणत तो तिथून त्याला घालवून लावायचा. ह्या सगळ्याची सवय सर्वांनाच होत चालली आणि नेमकं शिंदेचं मन पुन्हा खायला लागलं. त्या दिवशी त्याच्या बायकोचं ढणाणा धूर ओकल्यासारखं बोलणं सुरू झालं आणि शिंदे एकदम उठला. सगळे एकदम चिडीचूप झाले. कितीतरी दिवसांनी शिंदेची अशी हालचाल सर्वांनी पाहिली.

''तुझ्यामुळे असा बसून असतो मी.''

शिंदेची बायको आश्चर्याने पाहत राहिली. नवऱ्याने तिचा अपमानच केला होता. ती शिक्षिका होती. चांगलं शिकूनही नवरा ट्रक हाकत होता. आणि आता तर काहीच करेनासा झाला होता. पुन्हा कारणीभूत तीच? ती तडकली. ''मी शेण खा म्हणेन हो. खाल?''

सगळे फिसकन हसले. शिंदेही हसला. म्हणाला, ''बरं झालं विचारलंस. आलोच मी.''

तो एकदम घरात शिरला. भिंतीवर लावलेल्या आरशात डोकावत त्याने केस नीट केले. कपडे चढवले. आणि निघालाच तो. कुणाला काही बोलण्याची, विचारण्याची संधी न देताच...

शिंदे पोलीस चौकीत येऊन उभा राहिला. आता माघार नाही. बायको सांभाळेल संसार. आयुष्यभर टोचणी लागून राहण्यापेक्षा तुरुंगात गेलेलं बरं. त्या पोराच्या घरच्यांचे शिव्याशाप कायमचे आहेतच सोबतीला. निदान मनाची टोचणीतरी कमी होईल. खाली मान घालून शिंदे आत शिरला. खुर्चीच्या दांड्याशी चाळा करत बसलेल्या इन्स्पेक्टरने वर नजर करून पाहिली. त्या नजरेनेच शिंदेच्या पायाला कापरं भरलं.

''बसा.'' घोगऱ्या आवाजाने शिंदे आणखीनच घाबरला.

''पटकन काय ते सांगा. घरी जायचंय. ड्युटी संपत आली आहे.''

''ठीक आहे साहेब. उद्या येईन.''

शिंदेला उगाचच बरं वाटलं. वेळ टळल्यासारखं. तो सुटका झाल्यासारखा

तिथून लगबगीने बाहेर पडला. एका वेगळ्याच आनंदात घरी परत आला तो. त्यानंतरचे त्याचे काही दिवस खूप चांगले गेले. निदान पोलिसांपर्यंत जायचं धाडस केलं, यातच तो खूश होता. अधूनमधून हुक्की आल्यासारखा शिंदे उठायचा आणि चौकीच्या आसपास रेंगाळून यायचा. हळूहळू तेही कमी होत गेलं. वर्षं उलटली; पण शिंदेचं आयुष्य तसंच राहिलं. बाहेरच्या बाजेवर बसून वर्तमानपत्र पिंजून काढायचं, अधूनमधून चौकीपर्यंत जायचं. त्या तरुण मुलाने जग सोडलं, शिंदे जगात असूनही नसल्यासारखाच होता. साऱ्यांच्याच आता तो सवयीचा भाग झाला होता. आणि अचानक वर्तमानपत्रात वीस वर्षांपूर्वी गेलेल्या त्या मुलाचा फोटो चौकटीत त्याला दिसला आणि त्याची सगळी माहिती. शाळेच्या रौप्यमहोत्सवात त्याच्या कुठल्याशा मित्राने त्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ शिष्यवृत्ती जाहीर केली होती. दिवस, वेळ, जागा यावरून त्याने ताडलं. हाच तो मुलगा. तो लगबगीने तयार झाला. कुणालाही काहीही न सांगता शिंदे तळवड्याला पोचला. कोणत्याही प्रसंगाला सामोरं जायची तयारी ठेवत त्याने अंगणात बसलेल्या म्हाताऱ्या गृहस्थांना भेटण्यासाठी बेड्याची काठी सरकवली.

पहिल्यांदा आणि अखेरचं भेटलेल्या अण्णांचा आणि त्या माउलीचा शिंदेने निरोप घेतला. स्वत:चा मुलगा गेल्यासारखा तो त्या दोघांबरोबर रडला. बेडं बंद करून निघालेल्या शिंदेचे खांदे आणखीनच उतरले होते. स्वत:च्या पापातून, दु:खातून मोकळा व्हायला तो इथे आला होता. मुक्तीची वाट मिळाली असं त्याला वाटत होतं, पण ती वाट कधीच हरवली आहे, हेच त्या माउलीचे शब्द आर्त स्वरात सांगत होते. रडतारडता ती खिन्नपणे हसली होती, ''माझा लेक मी गमावला. पण तुझी आई रोज कणाकणाने स्वत:च्या मुलाचं मरणं पाहतेय, तुझ्याबरोबरीने ती रोज मरण भोगतेय हे कधी लक्षात आलं का बेटा तुझ्या? काही चुकांना प्रायश्चित्त नसतंच रे बाबा. त्या अपघातात सौरभ गेला आणि त्यानंतर किती माणसांच्या आयुष्याला वेगळं वळण मिळालं याचा विचार केलास? वीस वर्षांनी आम्हाला भेटून दोषमुक्त झाल्यासारखं वाटेलही तुला क्षणभर; पण भ्रम आहे तो तुझा. दोन कुटुंबातल्या सर्वांच्याच आयुष्यातला रस तुझ्या एका चुकीने शोषून घेतला, त्याचं काय करायचं रे बाबा? कुणाला करायची त्याबद्दल शिक्षा?''

आयुष्यातला एक प्रश्न निस्तरता निस्तरता दुसरा प्रश्न अक्राळविक्राळ चेहऱ्याने शिंदेसमोर उभा होता. शिंदे आता फक्त त्या वाटेवरचा पादचारी होता. अंतहीन, दिशाहीन वाट... ❖

अभिप्राय

देखणा दस्तऐवज



डॉ. आनंद यादव - एक साहित्यिक प्रवास

संपादक : डॉ. कीर्ती मुळीक
श्री. अप्पासाहेब जकाते-यादव

पृष्ठसंख्या : १९६

किंमत : रुपये ४९५/-

सरसकट ग्रामीण वगैरे न म्हणता एकूणच कथा, कादंबरी, काव्य, ललित गद्य, चरित्र, आत्मचरित्र, वगनाट्य, समीक्षा, विशेषत: साहित्य-निर्मितीची प्रक्रियादी असे सर्वच वाङ्मय प्रकार विलक्षण कलात्मकतेने नि कसदारपणे हाताळणारे डॉ. आनंद यादव यांना जाऊन वर्ष होऊन गेले. त्यांच्या प्रथम स्मृतिदिनाच्या आगेमागे त्यांची सुविद्य कन्या डॉ. कीर्ती मुळीक व बंधू अप्पासाहेब जकाते-यादव यांनी परिश्रमपूर्वक संपादित कलेले 'डॉ. आनंद यादव- एक साहित्यिक प्रवास' हे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे.

प्रस्तुत पुस्तकात प्राचार्य रा. रं. बोराडे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, इंद्रजित भालेराव, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. मंदा खांडगे, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. द. ता. भोसले, डॉ. तानाजी भोसले प्रभृतींचे डॉ. यादवांची प्रकृती व प्रतिभा, वाङ्मयीन प्रवास नि प्रतिबद्धता यांचा मार्मिक वेध घेणारे लेख आणि मुलाखती समाविष्ट आहेत. ग्रामीण साहित्य चळवळीतील यादवांचे लक्षणीय योगदान, सर्जनशील निर्मितीसाठी घेतलेले कष्ट, समीक्षा लेखनातील नवा दृष्टिकोन अशा विविध गोष्टींचा साकल्याने धांडोळा घेण्याचा प्रयत्न सर्वच लेखांतून दिसून येतो. डॉ. लवटे यांचा लेख नितांत तटस्थ आणि विलक्षण सूचक आहे. त्यातील बहुअर्थाशयी अशा विधानांचा साक्षेपी विस्तार केला, तर एक ग्रंथराज साकार होईल. डॉ. खांडगे यांनी यादवांच्या ललित गद्याची केलेली चिकित्सा भावणारी आहे.

'आनंदाचे डोही' हा लक्ष्मीकांत रांजणेंचा लेख खूपच हृदयस्पर्शी आहे. कीर्ती व अप्पासाहेब यांचे लेख यादवांच्या कौटुंबिक वातावरणातील ताणेबाणे, त्यांचा पिंडधर्म व त्यातील पीळ उलगडून दाखवतात. डॉ. कोतापल्ले यांचा लेख सर्वांत सरस व संतुलित आहे. डॉ. ठाकूर यांनी यादवांच्या कथाविश्वाचा काढलेला आलेख मनोज्ञ वाटावा. इतर लेखही आपापल्या मखरात ठीक आहेत.

या देखण्या अशा सर्वांगसुंदर ग्रंथराजाचं मुखपृष्ठ चंद्रमोहन कुलकर्णींनी ज्या सौंदर्यदृष्टीने सिद्ध केलं आहे, त्याला मात्र सलामच केला पाहिजे. या ग्रंथाच्या निमित्ताने अनिल मेहता आपल्या एका अत्यंत जिव्हाळ्याच्या लेखक-मित्राच्या ऋणातून अंशत: तरी मुक्त झाले आहेत, असे मुद्दामच म्हणावे वाटते.

– वसंत केशव पाटील

महाराष्ट्र टाइम्स, १-७-२०१८

❖

ग्रामीण साहित्य चळवळ अग्रणीचा साहित्यवेध

मराठीतील बहुचर्चित लेखक आनंद यादव यांच्या वाङ्मयीन कारकिर्दीचा आढावा घेणारा. 'डॉ. आनंद यादव : एक साहित्यिक प्रवास' हा ग्रंथ कीर्ती मुळीक आणि आप्पासाहेब जकाते यांनी संपादित केला आहे. या ग्रंथात एकूण १७ लेख संकलित केले आहेत. पैकी पाच लेख आनंद यादवांसंबंधी आहेत आणि बारा लेख त्यांच्या विविध साहित्यकृतींची, ग्रामीण साहित्य चळवळीची चर्चा करणारे आहेत. यात दोन मुलाखतींचाही अंतर्भाव आहे.

मराठीतील दलित साहित्य चळवळीनंतर ग्रामीण साहित्य चळवळीचा उदय झाला. या चळवळीतील अग्रणी म्हणून आनंद यादव यांचा उल्लेख होतो. सर्जनशील लेखक आणि ग्रामीण साहित्य चळवळीतील कार्यकर्ता अशी दुहेरी भूमिका त्यांनी निभावली. त्यांनी लेखनात विविध वाङ्मयप्रकार हाताळले. राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील अनेक सन्मान त्यांना मिळाले. ग्रामीण साहित्य चळवळीतील यादवांचे सहकारी नागनाथ कोत्तापल्ले, वासुदेव मुलाटे, रा. रं. बोराडे यांचेही लेख या ग्रंथात आहेत. इंद्रजित भालेराव यांनी यादवांच्या समग्र काव्यलेखनाचा परामर्श घेतला आहे. 'यादव शेतकरी कवी आहेत. त्यांची कविता शेतात प्रत्यक्ष राबणाऱ्या शेतकऱ्याची कविता आहे. शेतकरी वास्तवाचा सच्चेपणा या कवितेत आहे. कष्टकरी शेतकऱ्याच्या जीवनातील शृंगार, सौंदर्य, दु:ख, दारिद्र्य, संघर्ष याचे चित्रण या कवितेत आहे,' अशी निरीक्षणे भालेराव यांनी नोंदवलेली आहेत.

यादवांचे व्यक्तिचित्रण करणारा भालेराव यांचाच दीर्घ लेखही या ग्रंथात आहे. तारुण्याच्या उंबरठ्यावर असतानाच भालेरावांना यादवांचा सहवास लाभला. तो दीर्घकाळ टिकला. १५ वर्षे दोघांचा पत्रव्यवहार होता. प्रसंगपरत्वे त्यांच्या अनेक भेटी झाल्या होत्या. भालेरावांच्या या लेखात भारावलेपण असले, तरी एक प्रकारची तटस्थताही आहे. 'ग्रामीण साहित्य चळवळीपेक्षा शरद जोशींची शेतकरी संघटनेची चळवळ व्यापक झाली. परंतु ग्रामीण साहित्य चळवळीने या चळवळीशी समन्वय ठेवला नाही', अशी खंत भालेराव यांनी व्यक्त केली आहे.

मंदा खांडगे यांनी यादवांच्या ललित गद्याची आस्वादक चिकित्सा केली आहे. त्यांनी यादवांच्या ललित गद्यातील काव्यात्मकता अधोरेखित केली आहे.

यादवांच्या 'उखडलेली झाडे' या कथासंग्रहाची समीक्षा डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी केली असून, त्यांच्या आधीच्या कथासंग्रहापेक्षा या कथासंग्रहाचे वेगळेपण काय आहे, हे त्यांनी सप्रमाण निदर्शनास आणून दिले आहे. प्रारंभी आपल्या कथांमधून ग्रामीण जनजीवन चित्रित करणाऱ्या यादवांचा जाणीव विस्तार होत गेला, असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे आणि तो मान्य होण्यासारखा आहे.

रवींद्र ठाकूर यांनी यादवांच्या एकूणच कथालेखनाचा आढावा घेतला आहे. यादवांच्या कथालेखनाचा विकास विषयाच्या आणि आविष्काराच्या अंगाने कसा होत गेला, त्यासंबंधी ठाकुरांनी भाष्य केले आहे. 'आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या' (शुभांगी पातुरकर) व 'यादव आणि ग्रामीण साहित्य' (सुरेश देशपांडे) हे दोन लेख चिकित्सेऐवजी वर्णनात्मक अंगाने लिहिले गेले आहेत. पातुरकर यादवांच्या आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यांच्या प्रेमात इतक्या अडकून पडल्या आहेत की त्यांचे भारावलेपण या लेखातून ठायी ठायी जाणवते.

वासुदेव मुलाटे यांनी यादवांच्या 'ग्रामसंस्कृती' आणि 'साहित्यिक जडणघडण' या दोन ग्रंथांची मीमांसा केली आहे. यादवांच्या चिंतनशीलतेचा परीघ कसा विस्तारलेला होता; हे नमूद करतातच; परंतु नव्याने लिहू पाहणाऱ्या लेखकांसाठी ही पुस्तके कशी उपयुक्त आहेत, हेही ते नोंदवतात.

'बहुआयामी लेखक' (रवींद्र शोभणे) आणि 'साहित्यातले काटकोनी वळण' (सुनीलकुमार लवटे) या दोन लेखांतून यादवांची वाङ्मयीन वाटचाल उलगडण्यात आली आहे. त्यांच्या सर्वच लेखनाविषयी या लेखांतून काही मते मांडण्यात आली आहे. विशेषत: सुनीलकुमार लवटे यांनी यादवांच्या लेखनसामर्थ्याचा तिरकसपणे वेध घेतला आहे आणि जाता जाता एकूण वाङ्मयीन पर्यावरणासंबंधी भाष्य केले आहे.

'ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रवर्तक' या लेखात सुधाकर शेलार यांनी ग्रामीण साहित्य चळवळीची वाटचाल विस्तृतपणे मांडली आहे. ग्रामीण साहित्य चळवळीचा उदय, प्रेरणा आणि प्रयोजन यांचा आढावा घेऊन त्यांनी या चळवळीची भूमिका आणि सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक योगदान या अंगाने चर्चा करून या साहित्य चळवळीची नेमकी फलश्रुती काय आहे, त्याचा निर्देश केला आहे. हा निर्देश करताना या चळवळीतील अनेक लेखकांच्या मतांचा हवाला त्यांनी दिला आहे.

तानाजी पाटील आणि द. ता. भोसले यांनी घेतलेल्या यादवांच्या मुलाखतीमधून यादवांची लेखक आणि समीक्षक म्हणून असलेली भूमिका समोर आली आहे. यादवांच्या निर्मितीप्रक्रियेवरही या मुलाखतीतून प्रकाश पडतो. लेखकाचा जीवनानुभव, वाङ्मयप्रकारांची अपरिहार्यता, कलावादी दृष्टिकोन, लेखकाची सर्जनशीलता आणि चिकित्सक वृत्ती असे वेगवेगळे मुद्दे या मुलाखतीमध्ये चर्चिले गेले आहेत. साहित्याच्या अभ्यासाला ते पूरक असेच आहेत.

'आमचे बाबा' या लेखात कीर्ती मुळीक यांनी यादवांमधील वडील चित्रित केले आहेत. त्यांचा कुटुंबवत्सलपणा वर्णन करतानाच महाबळेश्वरच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान वडिलांना भूषवता आले नाही याची दुखरी बोच त्यांनी व्यक्त केली आहे. आप्पासाहेब जकाते यांनी यादवांचं मोठेपण, कर्तृत्व आणि कौटुंबिक जबाबदारीचं भान त्यांना कसं होतं, यासंबंधी भावना व्यक्त केल्या आहेत.

रा. रं. बोराडे यांनी यादवांशी असलेल्या मैत्रीच्या आठवणी जागवल्या आहेत. यादवांसोबत मतभेद असूनही त्यांनी त्या मतभेदांचा उल्लेख न करता, यादवांशी कशी मैत्री झाली, ग्रामीण साहित्य संमेलने कशी व कुठे आयोजित करण्यात आली आणि ग्रामीण साहित्य चळवळीची बांधणी कशी झाली, याचा ऊहापोह केला आहे. बोराडे लिहितात, 'ग्रामीण साहित्य परिषदेची घटना तयार झाली खरी, परंतु मनुष्यबळाअभावी तसंच आर्थिक पाठबळाअभावी ही घटना अमलात आली नाही. ग्रामीण साहित्य चळवळीला हळूहळू शैथिल्य येत गेलं...' लेखाच्या शेवटी ते लिहितात, 'मनात विचार आला, आनंद यादव अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या फंदात पडले नसते, तर त्यांना आणखी आयुष्य लाभलं असतं का?'

एकूणच 'डॉ. आनंद यादव : एक साहित्यिक प्रवास' हा ग्रंथ ग्रामीण साहित्याच्या अभ्यासकांना आणि लेखकांना तर उपयुक्त आहेच, परंतु त्या पलीकडे अभ्यास करणाऱ्यांनीही आवर्जून वाचावा असा आहे.

– डॉ. मनोहर जाधव

दैनिक लोकसत्ता (लोकरंग), १५-७-२०१८

❖

आवर्जून वाचावे


हाच माझा मार्ग...
सचिन पिळगांवकर


धागे | गुलज़ार
संपादन
अनंत दीक्षित


अशी मने असे नमुने
शिवाजी सावंत


साभाऱ्यांतले असाभाऱ्य
सुधा मूर्ती
अनुवाद
उमा कुलकर्णी

नारायण मूर्ती
मूल्य जपणारं एक अद्वितीय आयुष्य
मूळ लेखक | एन. चंद्रशेखरन्
अनुवाद | अंजली जरवंडे


तसलिमा नसरिन


सचिन तेंडुलकर
प्लेइंग इट माय वे
माझं आत्मचरित्र


पांडुरंग खानखोजे यांचे चरित्र
मी कधीही
मागणार
नाही!
सावित्री साळुंखी
अनुवाद
अवंती महाजन

फ्रेडरिक फोरसीथ
द फिस्ट ऑफ गॉड

Postal Reg. No. PCW/086/2018 – 2020
RNI. No. MAHMAR/2000/02739
No. SDO/Pune City/SR/3/2018 - Date : 10/01/2018
Posting at Marketyard, PSO, Pune 411037.
Publication Date : 09/08/2018 Posting Date : 11/08/2018

आवर्जून वाचावे









मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,